# द्विती-ा वर्ष कला

# राज्यशास्त्र - अभ्यासपत्रिका क्र. २

# भारतीय राजकीय व्यवस्था

**S.Y.B.A**

**REVISED SYLLABUS**

**POLITICS PAPER II**

**TITLE OF THE PAPER : INDIAN POLITICAL SYSTEM**

**SUB - TITLE : THE CONSTITUTIONAL FRAMEWORK**

**(SECTION - I)**

**Module I**

1 Constitution of India
- 1.1 Basic Features
- 1.2 Substantive Amendments and Relevant Case Laws (Amendments - 4th, 16th, 25th, 42nd, 44th, 52nd, 62nd, 73rd, 86th, 92nd)

**Module II**

2 Philosophy of the Constitution
- 2.1 Preamble
- 2.2 Fundamental Rights
- 2.3 Directive Principles of State Policy

**Module III**

3 Institutions Structure, Powers and Functioning
- 3.1 Parliament
- 3.2 Union Executive
- 3.3 Judiciary - Supreme Court of India

**Module IV**

4 The Federal Structure and its Dynamics
- 4.1 Centre - State Relations
- 4.2 Demands for Smaller States
- 4.3 Demands for Autonomy

**Assignment / presentations related to above modules**

**Suggested References :**


1. Basu, D.D., An Introduction to the Constitution of India, Wadhwa Publications, Nagpur, 2010.
2. Johari, J.C., The Constitution of India, Sterling Publications, New Delhi, 2009.
3. Pylee, M.V., Constitutional Government in India, S. Chand, New Delhi, 2011.
4. Kashyap, Subhash, Our Constitution, National Book Trust, New Delhi, 2009.
5. Kashyap, Subhash Our Parlaiment, National Book, Trust, New Delhi, 2008.

6. Baruah, Sayib, Ethnonationalism in India a Reader, Oxford University Press, New Delhi, 2010.
7. Rudolf, Llyod and Rudolf, Susan, In Pursuit of Laxmi, Chicago Press, 1987.

## (SECTION - II)

**Module I**

1 Electoral and Party Politics
- 1.1 Elections (1952, 1977, 1989, 1998, 2004)
- 1.2 Political Parties - National and Regional Parties
- 1.3 Coalition Governments

**Module II**

2 Social Dynamics of Indian Politics
- 2.1 Caste- Reservation
- 2.2 Religion - Communalism
- 2.3 Regionalism

**Module III**

3 Challenges to the Political System
- 3.1 Criminalisation of Politics
- 3.2 Terrorism
- 3.3 Naxalism

**Module IV**

4 Political Economy of India
- 4.1 Nehruvian Model to New Economic Policy
- 4.2 Economics Reforms
- 4.3 Social and Political Impact of Reforms

**Assignment / presentations related to above modules**
**Suggested References :**

1. Adeney, Katherine and Watte, Andrew, Contemporary India, Palgrave Macmillan, New York, Indian Reprint, 2011.
2. Basrur, Rajesh, (ed.), Challenges to Democracy in India, Oxford University Presss, New Delhi, 2009.
3. Mohanty, Amarnath, Justice, Democracy and State in India, Rouledge, New Delhi, 2011.
4. Singh, M.P., and Saxena, Rekha, Indian Politics, PHI Learning Pvt. Ltd., New Delhi, 2011.
5. Bhargava, Rajiv, The Promise of India’s Secular Democracy, Oxford University Press, 2010.
6. Chakraborty, Bidyut and Pandey, Rajendra, Indian Government and Politics, Sage Publications, 2009.

7. Jayal, Nirja Gopal and Mehta, Pratap Bhanu, The Oxford Companion the Politics in India, Oxford University Press, New Delhi, 2011.

8. Mishra, Rajkumar, Naxalite - Maoist Insurgency, Viking books, Jaipur, 2011

❖❖❖❖

# १

# भारतीय राज्यघटना

**प्रकरणाची रचना :-**

१.० उद्दिष्टे
१.१ प्रस्तावना
१.२ भारतीय राज्यघटना
१.३ भारतीय राज्यघटनेची मूलभूत वैशिष्ट्ये
१.४ सारांश
१.५ प्रश्न

## १.० उद्दिष्टे:-

प्रत्येक संस्था, संघटना विशिष्ट्य नियमांप्रमाणे कार्य करीत असते. राज्य ही राजकीय संस्था आहे. राज्याच्या मूलभूत नियमांना राज्यघटना म्हणतात. भारताचा नागरिक या नात्याने प्रत्येक विद्यार्थ्याला भारतीय राज्यघटनेची ओळख असायला हवी. राज्यघटनेची ओळख निश्चितच देशाचा जागृक नागरिक घडवित असते. त्यामुळेच राज्यघटनेचा अभ्यास करणे या प्रकरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

## १.१ प्रस्तावना :-

नागरिकत्वाच्या प्रशिक्षणाचा पाया भारतीय राज्यघटनेच्या अभ्यासाने घातला जातो. नागरिकांमध्ये जागृकता आणणे हेच राज्यघटनेच्या अभ्यासाचे ध्येय आहे. या प्रकरणात खालील बाबींचा अभ्यास आपण करणार आहोत.

१) भारतीय राज्यघटना प्रास्ताविक माहिती.

२) भारतीय राज्यघटनेची मुख्य वैशिष्ट्ये.

## १.२ भारतीय राज्यघटनेची प्रास्ताविक माहिती :-

भारतीय राज्यघटना घटना समितीने बनविली आहे. कॅबिनेट मिशन योजनेप्रमाणे प्रदेशांच्या कायदेमंडळांनी घटनासमितीच्या सभासदांची निवड केली होती. घटनासमितीमध्ये एकूण ३८९ सभासद होते. घटनासमितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद होते. घटनासमितीने

निरनिराळ्या देशांच्या राज्यघटनांचा आणि आपल्या देशाच्या परिस्थितीचा अभ्यास करुन घटना बनविली. घटना बनविण्यास २ वर्षे, ११ महिने, १८ दिवस एवढा कालावधी लागला. २६ जानेवारी १९५० पासून भारताची राज्यघटना लागू करण्यात आली. त्यामुळेच २६ जानेवारी गणराज्य दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.

## १.३ भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये (Features of the Indian Constitution)

### १.३.१ राज्यघटना म्हणजे काय?

राज्यघटनेच्या अनेक व्याख्या विविध विचारवंतांनी केल्या आहेत. सोप्या शब्दात राज्यघटना (Constitution) म्हणजे देशाचा मूलभूत व सर्वश्रेष्ठ कायदा होय.

### १.३.२ महत्त्व :-

राज्यघटना लोकशाही व्यवस्थेचा आधार आहे. प्रत्येक देशाची स्वतःची राज्यघटना असते. प्रत्येक देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थिती आणि देशाच्या गरजांप्रमाणे त्या देशाच्या राज्यघटनेला आकार आलेला असतो. राज्यघटनेमुळे राज्यात कायद्याचे राज्य निर्माण होते. राज्याला राजकीय स्थिरता, सातत्य प्राप्त होते. भारतीय राज्यघटनेच्या काही वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपामुळे जगातील इतर देशांच्या राज्यघटनांपेक्षा भारताची घटना वेगळी ठरते.

### १.३.३ भारताची राज्यघटनेची वैशिष्ट्ये :-

#### १) जगातील सर्वात व्यापक, विस्तृत आणि लिखित राज्यघटना (Written and Biggest Constitution) :-

जगातील आतापर्यंतच्या सर्व राज्यघटनांमध्ये भारताची राज्यघटना सर्वात मोठी आहे. भारताची राज्यघटना २२ भागात विभागलेली आहे. मूळ घटनेची ३९५ कलमे व ८ परिशिष्टे आहेत. इतर देशांच्या राज्यघटनेमध्ये पुढीलप्रमाणे कलमे आहेत. अमेरिका ७, कॅनडा १४७, ऑस्ट्रेलिया १२८, चीन १०६. इतर देशांच्या तुलनेने भारतीय राज्यघटना अतिशय व्यापक व विस्तृत आहे. १) सविस्तर प्रशासकीय तरतूदी २) इतर देशांतील राज्यघटनांच्या अनुभवाचा उपयोग ३) अनुसूचित जातीजमाती व इतर मागासवर्गीयांच्या समस्यांचे निराकरण ४) जम्मू काश्मीर, नागालॅंड, आसाम, सिक्किम या राज्यांसाठी विशेष तरतूदी ५) संघराज्य व घटकराज्यांसंबंधी सविस्तर तरतूदी ६) सविस्तर मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वांची तरतूद ७) निवडणुका, अल्पसंख्यकांचा प्रश्न, आणीबाणीविषयक तरतूदी इत्यादी विषयक सविस्तर तरतूदींमुळे भारताची राज्यघटना विस्तृत झाली आहे. भारतीय लोकांची राजकीय स्थिती लक्षात घेऊन घटना निर्मात्यांनी प्रत्येक गोष्ट स्पष्टपणे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

भारताची राज्यघटना लिखित आहे. भारतीय घटना समितीने अभ्यास करून घटना तयार केली आहे. ९ डिसेंबर १९४६ या दिवशी राज्यघटनेच्या निर्मितीच्या चर्चेस सुरूवात केली. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय राज्यघटना मंजूर करण्यात आली. भारतीय राज्यघटनेची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० पासून करण्यात आली. घटना समितीचे कामकाज २ वर्षे ११ महिने व १८ दिवस चालले. भारतीय राज्यघटना निर्मित (enacted)

आणि लिखित आहे. इंग्लंड देशाच्या घटनेप्रमाणे काळाच्या ओघात प्रथा परंपरातून निर्माण झाली नाही.

## २) घटनेची विविध उगमस्थाने (Constitutional provisions drawn from different sources) :-

भारतीय राज्यघटना निर्माण करताना घटनाकारांनी इतर देशांच्या राज्यघटनांचा सखोल अभ्यास केला. ज्या तरतूदी भारताच्या दृष्टीने त्यांना योग्य वाटल्या त्या तरतूदी भारतीय परिस्थिती आणि गरजांशी जुळवून स्वीकारल्या. उदा. अमेरिकेपासून संघराज्यकल्पना, उद्देशपत्रिकेची कल्पना, इंग्लंडपासून संसदीय पध्दत, आर्यलंडपासून मार्गदर्शक तत्त्वे इत्यादी स्वीकारण्यात आले. याशिवाय भारतीय घटनेवर गांधीतत्त्वज्ञानाचा प्रभाव, समाजवादी विचारांचा प्रभावही दिसून येतो.

## ३) परिदृढ आणि परिवर्तनीय राज्यघटनेचा मेळ (Combination of Rigid and Flexible Constitution) :-

ज्या घटनेमध्ये साध्या कायद्याप्रमाणे परिवर्तन होऊ शकते ती परिवर्तनीय घटना होय. उदा. इंग्लंड ज्या घटनेत घटनादुरुस्तीसाठी कठीण प्रक्रिया अवलंब करण्यात येते आणि घटनेत सहजासहजी परिवर्तन होऊ शकत नाही त्या घटनेला परिदृढ राज्यघटना म्हणतात, उदा. अमेरिका. भारताची राज्यघटना बहुअंशी परिवर्तनीय व अल्पअंशी परिदृढ आहे. भारतीय राज्यघटनेच्या ३६८ व्या कलमांमध्ये घटनादुरुस्तीच्या प्रक्रियेचा समावेश राज्यघटनेत आहे. त्या प्रक्रियेप्रमाणे घटकराज्याचे नाव, सीमा बदलणे, सर्वोच्च व उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या ठरविणे इत्यादींसाठी घटना दुरुस्तीची पध्दती अतिशय सोपी आहे. तर राष्ट्रपतींची निवडणूक, सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र केंद्र व घटकराज्यांची अधिकारविभागणी इत्यादीबाबतीत कठीण व परिदृढ पध्दतीची तरतूद आहे. म्हणजेच भारतीय राज्यघटनेत परिदृढ आणि परिवर्तनीय दोन्हींचा मेळ दिसून येतो.

## ४) घटनेचे वर्चस्व आणि संसदेचे सार्वभौमत्त्व यांचा मेळ (Parliamentary sovereignty reconciled with constitutional supremacy) :-

भारताची राज्यघटना लिखित आणि सर्वोच्च आहे. घटनेचे वर्चस्व आणि सर्वोच्चता सर्व भारतीय लोकांवर, संपूर्ण राजकीय व्यवस्थेवर आहे. घटनेचा भंग कुणीही करु शकत नाही. घटनेची स्थिरता देशाच्या व समाजाच्या प्रगतीच्या आड येऊ नये म्हणून संसदेला घटनादुरुस्तीचा अधिकार दिलेला आहे. त्यामुळे बदलत्या परिस्थितीप्रमाणे राज्यघटनेत दुरुस्ती करणे संसदेला शक्य झाले आहे. घटनादुरुस्तीच्या हक्कामुळे संसदेचे सार्वभौमत्त्व प्रस्थापित होते.

## ५) मूलभूत हक्कांची तरतूद (Provision of Fundamental Rights) :-

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते ३१ मध्ये मूलभूत हक्कांची यादी आणि मूलभूत हक्कांच्या रक्षणाची तरतूद केलेली आहे. भारतीय नागरिकांना विविध प्रकारचे

स्वातंत्र्य या हक्कांच्या रूपाने मिळाले आहे. समतेचा हक्क, व्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुध्दचा हक्क, सांस्कृतिक व शिक्षणाच्या हक्क, धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क नागरिकांना व्यक्तिमत्त्व विकासासाठी संधी मिळावी म्हणून देण्यात आले आहेत. याशिवाय या हक्कांवर अतिक्रमण झाल्यास घटनात्मक उपाययोजना या हक्कांद्वारे न्यायालयाकडून दाद मागण्याचा हक्कही देण्यात आला आहे. राज्यघटनेत मूलभूत हक्कांची सविस्तर यादी हे भारतीय राज्यघटनेचे विशेष वैशिष्ट्य आहे.

### ६) मूलभूत हक्कांवर मर्यादा घालण्याचा संसदेला हक्क (Fundamental Rights subject to reasonable regulation by legistature) :-

राष्ट्राची एकात्मता, ऐक्य राखण्याच्या दृष्टीने, सामाजिक सुरक्षा, न्याय, कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने मूलभूत हक्कांवर मर्यादा घालण्याचा हक्क संसदेला घटनेप्रमाणे देण्यात आला आहे.

### ७) न्यायालयीन पूनर्विलोकन आणि संसदीय सार्वभौमत्त्व यांची तडजोड (Reconciled Parliamentary Sovereignty and the power of Judicial Review of Judiciary) :-

भारतातील सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पूनर्विलोकनाचा अधिकार आहे. न्यायालय या अधिराकाप्रमाणे कायदेमंडळाने केलेले कायदे व कार्यकारी मंडळाची कृती घटनेप्रमाणे नसेल तर रद्द ठरवू शकते. घटनेप्रमाणे संसदेला घटनादुरुस्तीचा अधिकार देण्यात आला आहे. संसद या अधिकाराप्रमाणे घटनादुरुस्ती करून न्यायालयीन अधिकारांमध्ये योग्य बदल करू शकते. अशाप्रकारे एका बाजूला न्यायालयीन पुनर्विलोकनामुळे न्यायालयाचे वर्चस्व व दुसऱ्या बाजूस घटनादुरुस्ती अधिकाराप्रमाणे संसदेचे सार्वभौमत्त्व यांचा समतोल आपल्या घटनेने साधला आहे.

### ८) घटनेद्वारा सामाजिक समतेची हमी (Social equality also guaranteed by the constitution) :-

भारतीय घटनेने राजकीय आणि कायदेशीर समताच नाही तर सामाजिक समतेची हमीही दिली आहे. उदा. अस्पृश्यता निवारण, सार्वजनिक स्थळी जात, धर्म, लिंग, वंश इत्यादी आधारावर भेदभाव पाळण्यात येणार नाही इत्यादी तरतूदी करून घटनेने सामाजिक समतेची हमी दिली आहे. मानवनिर्मित भेदभाव नष्ट करणे आणि समता स्थापन करणे हे उद्दिष्ट त्यामागे आहे.

### ९) मूलभूत कर्तव्ये (Fundamental Duties) :-

१९७६ साली भारतीय घटनेत दहा मूलभूत कर्तव्यांचा समावेश केला आहे. घटनेने मूलभूत हक्कांची हमी दिली त्याचबरोबर मूलभूत कर्तव्यांचेही बंधन नागरिकांवर आवश्यक केले आहे. उदा. राष्ट्रध्वजाचा आदर राखणे, आपल्या राष्ट्राच्या सार्वभौमत्त्वाचे व एकात्मतेचे रक्षण करणे, राष्ट्रसेवेसाठी तयार असणे, पर्यावरणाचे संतुलन ठेवणे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे इत्यादी कर्तव्यांचा समावेश घटनेच्या चौथ्या भागात कलम ५१ अ मध्ये आहे.

### १०) **मार्गदर्शक तत्त्वे** (Directive Principles of State Policy) :-

राज्यकर्त्यांनी राज्य कसे चालवावे, शासन करताना कोणती ध्येयधोरणे समोर ठेवावीत या संबंधी मार्गदर्शन करणारी तत्त्वे भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागामध्ये ३६ ते ५१ कलमांमध्ये आहेत. कल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठी शासनाने कोणते कार्य करावे याबद्दलच्या सूचना या तत्त्वांमध्ये दिलेल्या आहेत.

### ११) **धर्मनिरपेक्ष राज्य** (India as a Secular State) :-

धर्मनिरपेक्ष राज्य हे भारतीय घटनेचे एक आगळे वैशिष्ट्य आहे. भारत अनेकधर्मिय देश आहे. सर्व धर्मांच्या लोकांना संरक्षण मिळावे त्याचबरोबर देशाचे ऐक्य कायम राहावे या दृष्टीने भारतात धर्मनिरपेक्ष राज्याची कल्पना स्वीकारली आहे. पाकीस्तानने इस्लाम धर्म राज्याचा धर्म म्हणून घोषीत केला आहे. भारताने राज्याचा असा कोणताही धर्म घोषीत केला नाही. सर्व धर्मांना समान वागणूक आणि संरक्षण भारतात आहे. शासनाचा धार्मिक व्यवहारात हस्तक्षेप नाही. सर्व नागरिकांना आपापल्या धर्मानुसार पूजा-अर्चा, श्रध्दा बाळगण्याचा अधिकार आहे.

### १२) **प्रौढ मतदानपध्दती** (The adoption of Universal adult suffrage):-

भारतीय राज्याचा विस्तारित भूप्रदेश, भारताची वाढती लोकसंख्या, दारिद्र, अशिक्षितता इत्यादी अडचणी असून सुद्धा भारतीय घटनाकारांनी भारतात प्रौढ मतदान पद्धती स्वीकारली आहे. भारतात निरक्षरता असूनही प्रौढ मतदानपद्धती स्वीकारणे हा घटनाकारांचा अतिशय धीट निर्णय होता. त्यामागे त्यांचा हेतू होता की जास्तीत जास्त लोकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळावी आणि खऱ्या अर्थाने भारतात लोकशाही प्रस्थापित व्हावी. प्रौढ मताधिकार म्हणजे जात, धर्म, लिंग, शिक्षण, मालमत्ता यापैकी कोणतीही अट न ठेवता प्रत्येक १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या भारतीय नागरिकाला मतदानाचा हक्क प्राप्त होणे. वयाची अट पूर्ण करणाऱ्या प्रत्येक भारतीय नागरिकाला राजकीय प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची संधी त्यामुळे प्राप्त झाली आहे.

### १३) **सांसदीय शासनपद्धती** (Parliamentary form of govt. with Republic):

सांसदीय शासनपद्धती म्हणजे कार्यकारी मंडळ (मंत्रिमंडळ) आणि कायदेमंडळ (संसद) यांचा घनिष्ठ संबंध असलेली शासनपद्धती होय. भारतीय शासनपद्धतीमध्ये पंतप्रधान व मंत्री लोकसभेचे सभासद असतात. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्यानंतर बहुमत प्राप्त पक्ष सत्तेवर येतो. संसद विविधमार्गांच्याद्वारे कार्यकारी मंडळांवर नियंत्रण ठेवते. संसदेला जबाबदार राहून कार्य करणे मंत्रिमंडळाची जबाबदारी असते. भारताच्या या संसदीय पद्धतीचा गणराज्य पद्धतीशी मेळ घालण्यात आला आहे. गणराज्य म्हणजे देशाचा सर्वोच्च प्रमुख, राष्ट्रपती, निर्वाचित (elected) असतो. इंग्लंडमध्ये संसदीय शासनपद्धती आहे. परंतु राजेशाही आहे. भारताच्या संसदीय पद्धतीत राज्यप्रमुख लोकनिर्वाचीत आहे.

## १४) केंद्राकर्षी प्रवृत्तीचे संघराज्य (A federal system with Unitary Bias) :

अमेरिकेत संघराज्य पद्धतीचे राज्य आहे. इंग्लंडमध्ये एककेंद्रपद्धतीचे राज्य आहे. परंतु भारतात केंद्राकर्षी प्रवृत्तीचे संघराज्य आहे. केंद्र शासन आणि राज्यशासन अशी दुहेरी व्यवस्था भारतात आहे आणि त्यांच्यात अधिकार विभागणी आहे. त्याशिवाय घटनेची सर्वोच्चता स्वीकारण्यात आली आहे. या वैशिष्ट्यांवरून भारतीय राज्याची चौकट संघराज्याची आहे हे स्पष्ट होते. परंतु भारताचे संघराज्य केंद्रात्मक प्रवृत्तीचे राज्य आहे. केंद्र व राज्य यांच्यातील अधिकारविभागणी केंद्राकडे झुकणारी आहे. एकच राज्यघटना, एकच नागरिकत्व, एकेरी न्यायव्यवस्था राष्ट्रपतींचा आणीबाणीचा अधिकार, राज्यपालविषयक तरतूद यावरून केंद्रसरकार शक्तिशाली आहे असे दिसून येते. भारतात अशा प्रकारच्या केंद्राकर्षी संघराज्याची निर्मिती केली आहे कारण भारत हा बहुभाषिक, बहुधर्मीय अनेक विविधता असलेला देश आहे अशा देशात विघटनवादी शक्तिंना तोंड देण्यासाठी केंद्राला जास्त अधिकार देण्यात आले आहेत. याशिवाय भारतात संघराज्य निर्माण करण्यापूर्वी भारत एककेंद्री राज्य होते, आणि भारतीय संघराज्य विकेंद्रात्मक प्रवृत्तीतून निर्माण झाले आहे. त्यादृष्टीने भारतात अर्धसंघराज्य किंवा केंद्राकर्षी प्रवृत्तीचे संघराज्य स्थापन केले आहे. जगातील इतर संघराज्यापेक्षा हे वेगळ्या स्वरुपाचे संघराज्य आहे.

## १५) स्वतंत्र्य व एकेरी न्यायालय (Single Independent and integrated Judiciary) :

भारतात एकेरी आणि स्वतंत्र न्यायमंडळाची स्थापना केली आहे. भारतीय न्यायमंडळ कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळाच्या वर्चस्वापासून व हस्तक्षेपापासून पूर्णपणे मुक्त आणि स्वतंत्र्य आहे. त्यासाठी राज्यघटनेत काही खास तरतूदी करण्यात आल्या आहेत. सर्वप्रकारचे दडपण भीती व दडपणांपासून मुक्त राहून न्यायाधीशांना कार्य करता यावे म्हणून स्वतंत्र न्यायव्यवस्थेची तरतूद करण्यात आली आहे. भारतात एकेरी न्यायव्यवस्था आहे. म्हणजे सर्वोच्च न्यायालय अंतिम न्यायालय आहे. त्यांच्या नियंत्रणाखाली उच्च न्यायालये, दुय्यम न्यायालये याप्रमाणे एकेरी एकाखाली एक याप्रमाणे न्यायालयीन साखळी आहे. सर्वोच्च न्यायालय अंतिम न्यायलय म्हणून कार्य करते.

## १६) एकेरी नागरिकत्व (Single citizenship) :

भारतात अमेरिकेप्रमाणे दुहेरी नागरिकत्व नाही. भारतात संघराज्यपद्धती असूनसुद्धा भारतातील विशिष्ट परिस्थितीचा विचार करुन एकेरी नागरिकत्वाची तरतूद केलेली आहे. राष्ट्रीय ऐक्य वाढावे हा त्यामागे उद्देश होता.

## १७) लोकांचे सार्वभौमत्त्व :

भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेतील सुरुवातीच्या शब्दांमध्येच लोक सार्वभौम आहे असे दिसून येते. भारताची राज्यघटना लोकांनी निर्माण केली आणि स्विकारली असा उल्लेख उद्देशपत्रिकेमध्ये आहे. म्हणजेच भारतीय गणराज्याचे पालकत्त्व भारतीय जनतेकडे आहे.

**१८) क्रांतीकारी स्वरूप :**

परंपरांगत परंपरा, रुढी, प्रथा ज्या लोकांचे अन्याय व शोषणास कारणीभूत होत्या अशा प्रथा परंपरा नष्ट करुन समता, न्याय, मानवता निर्माण करण्याच्या दृष्टीने भारतीय राज्यघटनेमध्ये अनेक तरतूदी केल्या आहेत. दूर्बल घटकांसाठी त्यांच्या उध्दारासाठी अनेक प्रकारच्या संधी त्यांना उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यादृष्टीने भारतीय राज्यघटनेचे स्वरुप क्रांतीकारी आहे.

## १.४ सारांश

भारतीय राज्यघटनेत तत्कालीन सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक अशा परिस्थितीचे प्रतिबिंब पडलेले आहे. भारतातील अनेक प्रकारची विषमता आणि विविधता लक्षात घेऊन भारताची एकात्मता, अखंडता व एकसंघता टिकवून ठेवण्यासाठी घटनेत प्राधान्य देण्यात आलेले आहे. अल्पसंख्यांक, मागास जाती, जमाती, महिला व इतर कमकुवत वर्गांना सुरक्षितता, आत्मविश्वास व समान सामाजिक दर्जा देण्याचा प्रयत्न केला आहे. जगातील अनेक राज्यघटनांचा अभ्यास करुन त्यातील महत्त्वपूर्ण बाबींचा स्वीकार करुन भारतीय सामाजिक, राजकीय परिस्थितीला अनुकूल अशा पद्धतीने त्यात बदल करुन त्यांचा भारतीय राज्यघटनेत समावेश केला आहे. भारतीयांची राजकीय जाणीव लक्षात घेऊन प्रत्येक बाब सविस्तर लिहिलेली आहे. परिदृढता आणि लवचिकता यांचा सुवर्णमध्य साधलेला आहे. म्हणूनच भारतीय राज्यघटना ही जगातील इतर राज्यघटनांपेक्षा वेगळी ठरते.

## १.५ प्रश्न :-

१) भारतीय राज्यघटनेच्या मुख्य वैशिष्ट्यांची चर्चा करा.
२) 'भारतीय राज्यघटना जगातील सर्वात मोठी व सर्वसमावेशक आहे' हे विधान स्पष्ट करा.

❖❖❖❖

# २

# महत्त्वाच्या घटनादुरुस्ती व सबंधित खटले

**प्रकरणाची रचना :**

२.० उद्दिष्ट्ये
२.१ प्रास्ताविक
२.२ घटना दुरुस्तीची आवश्यकता
२.३ भारतीय घटना दुरुस्तीचे मार्ग
२.४ महत्त्वपूर्ण घटनादुरुस्त्या व सबंधित खटले व कायदे
२.५ सारांश
२.६ प्रश्न

## २.० उद्दिष्ट्ये

राज्यघटना हा देशाचा मूलभूत कायदा आहे. इतर सर्व कायद्याचे उगमस्थान राज्यघटनाच असते. राज्यघटनेतील तरतूदींनाच घटनात्मक कायदा असे म्हणतात. तर इतर कायद्यांना सामान्य कायदे असे म्हणतात. सामान्य कायदा हा घटनात्मक कायद्यावर अवलंबून असतो. म्हणूनच घटनेत केलेल्या बदलाचा किंवा दुरुस्तीचा देशाच्या सार्वजनिकच नव्हे तर व्यक्तीच्या खाजगी जीवनावरही दीर्घकालीन परिणाम होतो. म्हणून काळाप्रमाणे राज्यघटनेत दुरुस्ती करणे आवश्यक असले तरी या दुरुस्तीचे उद्देश काय असावेत, राज्यघटनेत परिवर्तनाची आवश्यकता का असते? दुरुस्ती कशा प्रकारे केली जाते इ. संबंधी विद्यार्थ्यांना माहिती देणे हा या प्रकरणाचा उद्देश आहे.

## २.१ प्रस्तावना

२६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटना अमलात आली. म्हणून आपण २६ जानेवारी हा दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. घटना अमलात आल्यापासून ६२ वर्षात भारतीय राज्यघटनेत जवळपास ९७ वेळा दुरुस्त्या केलेल्या आहेत. म्हणजेच काळ आणि बदलत्या परिस्थितीस अनुकुलता-समन्वय साधण्यासाठी घटनेत दुरुस्तीची आवश्यकता असते. या प्रकरणात घटनादुरुस्तीची आवश्यकता, घटना दुरुस्तीचे मार्ग, करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण घटना दुरुस्त्या व त्या संदर्भातील पार्श्वभूमी, खटले, कायदे इ. सबंधी चर्चा करण्यात आलेली आहे.

## २.२ घटनादुरुस्तीची आवश्यकता

कोणत्याही राज्याची राज्यघटना ही त्या देशाच्या तत्कालीन घटना समितीने निर्माण केलेली असते. घटना निर्मितीच्या काळातील देशाची सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक इ. परिस्थितीचे घटक विचारात घेतले जातात. याशिवाय भविष्यकाळात येणाऱ्या संभाव्य समस्या, बदलणारी परिस्थिती यांचा अंदाज घेऊनही काही तरतूदी राज्यघटनेत केलेल्या असतात. परंतु भविष्यातील प्रत्येक स्थिती आणि परिस्थितीचा अचूक अंदाज बांधता येत नाही. म्हणूनच भविष्यकाळात निर्माण होणाऱ्या परिस्थितीला संविधान अनुकूल बनावे म्हणून राज्यघटनेतच तिच्यात बदल किंवा दुरुस्ती करण्याची तरतूद केलेली असते. तसेच दुरुस्तीचे उद्देश काय असावेत व दुरुस्तीचे अधिकार कोणाला, किती असावेत, दुरुस्ती करताना कोणत्या मार्गाचा अवलंब करावा, घटना दुरुस्तीच्या मर्यादा काय असाव्यात यासबंधी घटनेतच तरतूदी केलेल्या असतात.

भारतीय राज्यघटनेतही ३६८ व्या कलमाने घटना दुरुस्तीची प्रक्रिया स्पष्ट केलेली आहे. भारतीय घटनेच्या दुरुस्ती सबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना समितीतील समारोपाच्या भाषणात, "राज्यघटनेत ज्या तत्वांचा समावेश करण्यात आलेला आहे ती तत्त्वे म्हणजे आजच्या पिढीचे विचार आहेत. दुसऱ्या शब्दात असे सांगतो की, ती तत्त्वे म्हणजे घटना समितीच्या सभासदांचे विचार होत" असे स्पष्ट करुन अमेरिकन घटनातज्ञ श्री. जेफर्सन यांचे मत दिले "त्यांच्या मते, प्रत्येक पिढी ही एक स्वतंत्र देश होय, असे मानले पाहिजे. आपल्या पिढीला बहुमताच्या आधारे बांधून घेण्याचा अधिकार तिला मिळालेला असतो. परंतु एका देशातील लोकांना दुसऱ्या देशातील लोकांना बांधून ठेवण्याचा जसा हक्क नसतो. तशाच प्रकारे भावी पिढीला बांधून ठेवण्याचा या पिढीला हक्क नसतो" याचा अर्थच असा की भविष्य काळातील लोकांना त्या काळातील परिस्थितीनुरुप घटनेत दुरुस्ती करण्याचा अधिकार असला पाहिजे. याच दृष्टीकोनातून घटना समितीने घटनादुरुस्तीची तरतूद केलेली आहे.

भारतीय राज्यघटनेत घटना दुरुस्तीचा अधिकार संसदेला दिलेला आहे. असे असले तरी या अधिकाराचा वापर किती व कोणत्या संदभार्तत करावा. यावरुन संसद व सर्वोच्य न्यायालय यांच्यात वाद आहे. १९७३ मध्ये केशवानंद भारती खटल्यात निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने संविधानाच्या मूळ पायाभूत संरचनेत बदल करता येणार नाही असा निर्णय दिला. न्यायमूर्ती शेलेट व ग्रोवर यांनी मूळ पायाभूत संरचनेत पुढील बाबींचा समावेश केलेला आहे. त्यात संविधानाची सर्वोच्चता, देशाचे सार्वभौमत्व, एकात्मता, अखंडता, संविधानाचे धर्मनिरपेक्ष आणि संघराज्यात्मक स्वरुप, गणराज्य, लोकशाहीप्रधान शासनव्यवस्था, कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळातील सत्ता विभाजन, व्यक्तिंची प्रतिष्ठा, राज्याच्या कल्याणाची नितीनिर्देशक तत्वे यांचा पायाभूत संरचनेत समावेश केलेला आहे. न्यायमूर्ती जगमोहन रेड्डी यांनी संविधानातील उद्देशपत्रिका हीच घटनेची पायाभूत संरचना आहे असे स्पष्ट केले. यावरुन वरील बाबतीत प्रतिकूल असा बदल करण्याचा संसदेला अधिकार नाही असे स्पष्ट होते.

## २.३ भारतीय घटनादुरुस्तीचे मार्ग किंवा प्रक्रिया

भारतीय राज्यघटनेच्या ३६८ व्या कलमामध्ये घटनेच्या दुरुस्तीचे तीन मार्ग स्पष्ट केलेले आहेत. ते पुढीलप्रमाणे :

१) संसदेच्या साध्या बहुमताने.

२) संसदेच्या विशेष बहुमताने.

३) संसदेच्या विशेष बहुमताने आणि घटकराज्यांच्या बहुमताने.

**१) संसदेच्या साध्या बहुमताने घटनादुरुस्ती :**

या पद्धतीनुसार घटनादुरुस्तीचे विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात स्वतंत्रपणे मांडले जाते. प्रत्येक सभागृहाने उपस्थित सभासंदाच्या बहुमताने घटनादुरुस्ती विधेयक संमत केल्यानंतर व राष्ट्रपतीची त्यास संमती (सही) मिळताच घटना दुरुस्ती होते. साधारणपणे पुढील विषयांच्या संदर्भात साध्या बहुमताने घटनादुरुस्ती केली जाते. उदा. घटक राज्याच्या सीमा बदलणे, नविन राज्य निर्माण करणे, एखाद्या घटक राज्याची विधान परिषद संपुष्टात आणणे किंवा विधान परिषद निर्माण करणे, नागरिकत्वासबंधीचे कायदे, केंद्र किवा घटक राज्य सरकारची अधिकृत भाषा ठरविणे, संसद सदस्यांचे वेतन, भत्ते ठरविणे, त्यांचे विशेषाधिकार निश्चित करणे, सर्वोच्च न्यायालयाच्या इतर न्यायाधिशांची संख्या ठरविणे इ.

**२) संसदेच्या विशेष बहुमताने घटनादुरुस्ती :**

या पद्धतीनुसार घटना दुरुस्तीचे विधेयक प्रत्येक सभागृहात एकूण सदस्य संख्येच्या बहुमताने व उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सभासदांच्या $2/3$ बहुमताने मंजूर होणे आवश्यक असते, व अशा मंजूर झालेल्या विधेयकाला राष्ट्रपतीची संमती मिळाल्यानंतर घटनादुरुस्ती विधेयकाचे कायद्यात रुपांतर होते. म्हणजेच घटना दुरुस्ती होते.

घटनेतील मोठा भाग या प्रक्रियेद्वारा दुरुस्त केला जातो. मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्त्वे यामध्ये ह्या पद्धतीने दुरुस्ती केली जाते.

**३) संसदेच्या विशेष बहुमताने व घटकराज्यांच्या बहुमताने घटनादुरुस्ती :**

ही घटना दुरुस्तीची पद्धती अधिक कठीण आहे. या पद्धतीनुसार घटनादुरुस्तीचा ठराव संसदेच्या कोणत्याही सभागृहात प्रथम मांडता येतो. त्या प्रत्येक सभागृहाने सभासद संख्येच्या बहुमताने व उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सभासदांच्या $2/3$ बहुमताने मंजूर केल्यानंतर तो ठराव घटकाराज्यांच्या समत्तीसाठी पाठविला जातो. एकूण घटक राज्यांपैकी अर्ध्यापेक्षा अधिक घटकराज्यांनी तो ठराव मंजूर केल्यानंतर राष्ट्रपतीच्या समंतीने घटनादुरुस्ती विधेयक मंजूर झाले असे समजले जाते.

साधारणपणे पुढील विषयांच्या दुरुस्तीच्या संदर्भात या पद्धतीचा अवलंब केला जातो. उदा. राष्ट्रपतीची निवडणुक पद्धती, केंद्र सरकार व घटक राज्य यांच्यातील कार्यकारी सत्ता व अधिकार आणि परस्पर कायदेविषयक सबंध, उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र, संसदेतील घटक राज्यांचे प्रतिनिधित्व, घटना दुरुस्तीची प्रक्रिया कलम ३६८ इ. संदर्भात घटना दुरुस्ती करताना सर्व संमतीची आवश्यकता असल्याने या कठीण प्रक्रियेचा अवलंब केला जातो.

अशा प्रकारे वरील तीन पद्धतीने भारतीय राज्यघटनेत दुरुस्ती करता येते. यात अत्यंत सोप्या पद्धती पासून कठीण पद्धतीचाही स्वीकार केलेला आहे. यातूनच भारतीय राज्यघटनेने लवचिकता व परिदृढता यांचा सुवर्णमध्य साध्य केलेला आहे. म्हणूनच भारतीय राज्यघटना ही अंशतः लवचिक व अंशतः परिदृढ अशी आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) भारतीय राज्यघटना दुरुस्तीच्या विविध पद्धती सांगा.

---

---

---

---

## २.४ महत्त्वपूर्ण घटनादुरुस्त्या व सबंधित खटले

२६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटना अमलात आली आणि केवळ एका वर्षातच त्यात दुरुस्ती करण्याची गरज भासली. १९५१ मध्ये पहिली घटनादुरुस्ती करण्यात आली. भारतीय घटनेने जनतेला दिलेल्या मूलभूत अधिकारातील काही तरतूदी कल्याणकारी राज्याच्या अंमलबजावणीत अडचणी निर्माण करु लागल्याने कलम १५, १९, ३१, ८५, ८७, १७६ इ. कलमात दुरुस्ती करण्याची गरज भासल्याने पहिली घटनादुरुस्ती करण्यात आहे. अशा प्रकारे २०१२ पर्यंत भारतीय राज्यघटनेत ९७ घटनादुरुस्त्या करण्यात आल्या. त्यातील व्यक्तीच्या व्यक्तीगत व सार्वजनिक जिवनावर, देशाच्या राजकीय व्यवस्थेवर दूरगामी परिणाम करणाऱ्या काही महत्त्वपूर्ण घटनादुरुस्त्यांचा आढावा पुढीलप्रमाणे घेतलेला आहे.

### २.४.१ चौथी घटनादुरुस्ती (१९५५) :

भारतीय घटनाकारांनी नागरिकांचा संपत्तीचा अधिकार हा मूलभूत अधिकारात समाविष्ट केलेला होता. त्यानुसार प्रत्येक नागरिकाला संपत्ती संपादन करण्याचा, अधिकार प्राप्त झालेला होता. घटनेच्या मूळ मसूद्यात अशी तरतूद होती की, "कायद्याने तसा अधिकार दिल्याखेरीज कुणालाही व्यक्तिच्या मालमत्तेचे अपहरण करता येणार नाही; कोणत्याही स्थावर-जंगम मालमत्तेचे अपहरण करण्याचा अधिकार देणाऱ्या कायद्यात संपादित केलेल्या मालमत्तेबद्दल नुकसान भरपाई देण्याची तरतूद आणि त्या नुकसान भरपाईची रक्कम किंवा ती ठरविण्याची तत्त्वे, तसेच देण्याची तत्त्वे व रीत नमूद असणे आवश्यक आहे. खाजगी मालमत्तेचे अपहरण करणारा राज्य सरकारने पास केलेला कोणताही कायदा राष्ट्रपतीच्या मान्यतेसाठी राखून ठेवला जावा आणि त्यांची मान्यता मिळाल्यानंतरच तो अमलात यावा; घटना अमलात येण्यापूर्वी अठरा महिन्याच्या काळात राज्यांनी केलेला कोणताही कायदा घटना अमलात आल्यानंतर तीन महिन्याच्या आत राष्ट्रपतीच्या मान्यतेसाठी पाठविण्यात यावा" संपत्तीच्या या मूलभूत अधिकाराचा समाजवादी समाजरचना निर्माण करण्यात, जमिनदारीचे निर्मूलन करण्यात, अडथळे येऊ लागले. त्यामुळे संसदेने या हक्कांवर मर्यादा घालण्यास सुरुवात केली त्याच्यातून न्यायपालीका आणि संसद यांच्यात वाद उद्भवू लागले. संपत्तीच्या मूलभूत अधिकारामुळे नागरीकांना संपत्तीचा अमर्याद अधिकार प्राप्त झाला तर घटनेतील सार्वजनिक हितासाठी

खाजगी मालमत्ता ताब्यात घेण्याचा सरकारला असलेला अधिकार या दोन तत्त्वांमध्ये आंतर्विरोध होऊ लागला. जमिन सुधारणाविषयक कायदे राबवून जमिनदारी नष्ट करण्यासाठी सरकारच्या प्रयत्नात अडथळे निर्माण होऊ लागले. उत्तर प्रदेश आणि बिहार या सरकारांनी केलेले जमिनदारी निर्मूलनाच्या कायद्यांना उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. न्यायालयांनी हे कायदे अवैध ठरविले. परिणामता पहिल्या घटनादुरुस्तीत (१९५१) ३१ अ आणि ३१ ब ह्या दोन नव्या कलमांचा समावेश करुन हे कायदे अवैध ठरविण्याचा न्यायालयाचा अधिकार रद्द ठरविण्यात आला. या दुरुस्तीला शंकर प्रसाद विरुद्ध केंद्र सरकार (१९५२) या खटल्यात आव्हान दिले. परंतु न्यायालयाने संसदेचा हा अधिकार घटना संमत ठरविला. पुढे १९५४ साली सौ. बेला बॅनर्जी वि. पश्चिम बंगाल राज्य या खटल्यात मोबदल्याची रक्कम ठरविण्याच्या विधिमंडळाच्या अधिकाराला आव्हान देण्यात आले. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देताना असे म्हटले की, "विधिमंडळास मोबदला ठरविण्याची तत्त्वे निश्चित करण्याचा विवेकाधिकार असला तरी अशी तत्त्वे निश्चित करताना दिली जाणारी रक्कम ही 'मोबदला' असेल, म्हणजे संपादित संपत्तीच्या जवळपास सारखीच असेल अशी काळजी घेणे आवश्यक आहे". न्यायालयाच्या या निर्णयाने खाजगी संपत्ती सार्वजनिक हितासाठी ताब्यात घेण्याचा उद्देशच असफल ठरतो. या सर्व निर्णयांच्या प्रक्रियेतूनच १९५५ मध्ये चौथ्या घटनादुरुस्तीचे विधेयक मंजूर करुन घेणे संसदेस आवश्यक वाटले, आणि चौथी घटनादुरुस्ती अमलात आली.

१९५५ च्या चौथ्या घटनादुरुस्ती कायद्याने अनेक महत्त्वाच्या तरतूदी केल्या. घटनेच्या कलम ३१ व ३१(अ) या कलमात दुरुस्ती केली. त्यानुसार सार्वजनिक हितासाठी खाजगी संपत्ती शासनाने ताब्यात घेतली असेल व दिली जाणारी नुकसान भरपाई अल्प असेल तर त्या संदर्भात न्यायालयात जाता येणार नाही अशी तरतूद करण्यात आली. त्याचबरोबर अशीही तरतूद करण्यात आली की, एखाद्या व्यक्तीची संपत्ती राज्याने संपादित केली नसेल, पण फक्त काही काळाकरीता त्या संपत्तीची व्यवस्था व प्रबंध राज्याकडे असल्यामुळे व्यक्ती त्या संपत्तीला मुकली असेल तर मोबदला दिला जाणार नाही.

अशा प्रकारे सार्वजनिक हितासाठी, समाजवादी समाजरचना व कल्याणकारी राज्याची कल्पना अमलात आणण्यासाठी संपत्तीचा मूलभूत हक्क अडथळा ठरत होता. अमर्याद संपत्ती, जमीन असलेले जमीनदार या हक्काचा गैरफायदा घेत होते. सरकारच्या या संदर्भातील कायद्यांना न्यायालयात आव्हान देत होते व न्यायालयाचे निर्णय सरकारच्या विरोधात जात होते. ही कोंडी फोडण्यासाठी चौथी घटनादुरुस्ती करण्यात आली.

### २.४.२ सोळावी घटना दुरुस्ती (१९६३) :

भारताची अखंडता आणि एकात्मता टिकवून ठेवण्यासाठी १९६३ मध्ये घटनादुरुस्ती करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर प्रादेशीक वादाचा मुद्दा ऐरणीवर येऊ लागला. दक्षिणेत भारतीय गणराज्यातून फूटून निघून वेगळ्या तामिळनाडूची मागणी १९६० मध्ये झाली. मद्रास, केरळ आणि आंध्रप्रदेश यांचा वेगळा संघ व्हावा आणि त्याचे नाव द्रविडनाडू (द्रविडीस्तान) असावे. त्यातून तामीळ नॅशनल पार्टीने राज्यांचा भारतातून फूटून निघण्याचा हक्क मान्य व्हावा असा आग्रह धरला. १९६२ मध्ये अन्नादुराईने स्पष्ट सांगितले की, दक्षिणेकडील भारतीय हे उत्तरेकडील भारतीयांपेक्षा सर्व बाबतीत वेगळे आहेत. वांशिक, चेहरेपट्टी, सामाजिक, सांस्कृतिक दृष्टीने दक्षिण भारतीय लोक हे उत्तर भारतीयांहून भिन्न आहेत. म्हणून त्यांचे स्वतंत्र राज्य निर्माण व्हावे या मागणीचा जोर वाढला. याच पार्श्वभूमीवर १९६३ मध्ये १६ वी घटनादुरुस्ती करण्यात आली. त्यानुसार राज्यविधिमंडळ किंवा संसदेची निवडणूक लढविताना

भारतीय संघराज्याच्या संविधानाशी एकनिष्ठ राहून भारतीय सार्वभौमत्व व अखंडता यांचे रक्षण करण्याची शपथ घ्यावी लागते. त्यामुळे कायदेशीर व घटनात्मक दृष्टीने भारतीय संघराज्याशी एकनिष्ठ रहाण्याचे बंधन त्यांच्यावर आले. भारताशी एकनिष्ठ राहूनच निवडणुका लढविण्याचे बंधनही आले. थोडक्यात, भारतीय संघराज्यातून कोणत्याही प्रदेशाला फूटून बाहेर पडण्याचे स्वातंत्र्य, अधिकार नाकारण्यासाठी ही घटनादुरुस्ती करण्यात आली.

### २.४.३ पंचविसावी घटनादुरुस्ती (१९७१) :

पंचविसावी घटनादुरुस्ती संसदेचे घटनादुरुस्तीचे अधिकार, संपत्तीच्या मूलभूत अधिकारा संबधीची घटनात्मक दुरुस्ती व कायदे करण्याचे अधिकार आणि न्यायालयाचा न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार यांच्यातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर झालेली आहे. १९५५ मध्ये झालेल्या चौथ्या घटनादुरुस्तीच्या पार्श्वभूमीवर संसदेचे श्रेष्ठत्व १९६७ पर्यंत न्यायालयाने मान्य केले होते. गोलकनाथ खटल्यात न्यायालयाने आपली भूमिका बदलली. मूलभूत अधिकारांचा संक्षेप करणारा संसदेचा अधिकार नाकारण्यात आला. त्यामुळे संसदेच्या श्रेष्ठत्वालाच आव्हान मिळाले होते. न्यायालयांनी याच पार्श्वभूमीवर बँकाचे राष्ट्रीयीकरण बेकायदेशीर ठरविले. तसेच प्रीव्ही पर्स रद्द करणेही अवैध ठरविले. न्यायालयाचा हा दृष्टीकोन मुठभर लोकांच्या हातात झालेल्या संपत्तीच्या केंद्रीकरणाचे विकेंद्रीकरण करण्यात किंवा राज्याने कल्याणकारी राज्याची भूमिका घेण्यात अडथळा ठरत होती. म्हणूनच संसदेने पास केलेला कायदा केवळ वैधानिक दृष्टिकोनातून न पाहता तो बनविण्यामागील हेतू आणि बदलती सामाजिक परिस्थिती यांच्या दृष्टिकोनातून पहावा. न्यायालयाने राष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीच्या मार्गातील अडसर बनू नये असा प्रचार होऊ लागला. १९७१ मध्ये बँकाच्या राष्ट्रीयीकरणासबंधी न्यायालयांनी असे स्पष्ट केले की, सबंधित अधिनियमात मोबदल्याची तरतूद नसल्यामुळे तो मुलभूत हक्कांचा संक्षेप होतो.

वरील पार्श्वभूमीवर १९७१ मध्ये चोविसावी व पंचविसावी अशा दोन घटनादुरुस्त्या करण्यात आल्या. चोविसव्या घटनादुरुस्तीने अशे स्पष्ट केले की, ‘मूलभूत हक्क हिरावून घेणारा किंवा ते मर्यादित करणारा कोणताही कायदा राज्याला करता येणार नाही’ असे कलम १३ मध्ये स्पष्ट केले असले तरी ते ३६८ च्या कलमाला म्हणजेच घटनादुरुस्तीच्या प्रक्रियेला लागू होणार नाही. याचा अर्थ मूलभूत हक्काचा संकोच करण्याचा अधिकार संसदेला असेल.

याच पार्श्वभूमीवर १९७१ मध्ये पंचविसावी घटनादुरुस्ती करण्यात आली. या दुरुस्तीने संपत्तीच्या मूलभूत हक्कात प्रमुख दोन बदल करण्यात आले.

१) कलम ३१ मधील दुसरा परिच्छेद काढून त्याऐवजी शब्दरचना बदलवलेला परिच्छेद टाकला. ताब्यात घेतलेल्या मालमत्तेबद्दल ‘मोबदला’ द्यावा लागेल असा शब्द होता, त्याऐवजी ‘देयरक्कम’ असा शब्द टाकण्यात आला.
२) संपत्तीच्या हक्कासबंधीच्या कलमात ३१ (क) या नव्या कलमाची भर घातली. घटनेच्या १३ व्या कलमानुसार, मूलभूत हक्कांचा संक्षेप करणारा कायदा संसदेस करता येत नसे. पण नव्या ३१(क) अन्वये असे ठरविण्यात आले की घटनेतील ३१(ब) व ३१(क) कलमामधील धोरणाच्या प्रत्यक्षिकरणासाठी राज्याने केलेला कायदा जरी १४,१९ व ३१ या मुलभूत हक्का संबधीच्या कलमांचा भंग करीत असला तरी तो कायदा रद्द ठरविला जावू शकणार नाही आणि “अमुक एक कायदा ३९(ब) वा ३१(क) मधील धोरणाच्या पूर्तीसाठी आहे असे एकदा विधिमंडळाने जाहीर केले. म्हणजे मग ‘तो तसा नाही’ अशा कारणास्तव न्यायालयाकडे तक्रार केली जाऊ शकणार नाही”.

थोडक्यात, पंचविसाव्या घटनादुरुस्तीने संसदेला संपत्तीच्या मूलभूत हक्कांचा संकोच करणारा कायदा करण्याचा अधिकार मिळाला या सबंधी संसदेने केलेल्या कायद्याविरोधी न्यायालयात जाण्याचा अधिकार ही नाकारण्यात आला. तसेच ताब्यात घेतलेल्या संपत्तीची 'देयरक्कम' किती द्यावी हे ठरविण्याचा अधिकारही संसदेला मिळाला. अर्थात संसदेने या कायदे करण्याच्या अधिकाराचा वापर सार्वजनिक हिताच्या संदर्भातच करावयाचा आहे याचे नैतिक बंधन संसदेवर आहे.

### २.४.४ बेचाळीसावी घटनादुरुस्ती (१९७६) :

बेचाळीसावी घटनादुरुस्ती ही भारतीय राज्यघटनेतील सर्वात मोठी दुरुस्ती असून घटनेच्या निरनिराळ्या ४० कलमांमध्ये बदल करण्यात आले. जूनी चार कलमे काढून टाकली तर १३ नवीन कलमे व २ नविन प्रकरणे या घटनादुरुस्तीने घटनेत समाविष्ट केली. घटनादुरुस्ती सबंधी असलेल्या ३६८ कलमातही दुरुस्ती करण्यात आली.

१९७३ मध्ये केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्यसरकार या खटल्यात चोविस आणि पंचविसाव्या घटनादुरुस्तीला आव्हान देण्यात आले. सर्वोच्य न्यायालयाने या खटल्याचा निर्णय देताना गोलकनाथ खटल्यातील आपली भूमिका बदलली आणि संसदेचा राज्यघटनेच्या कोणत्याही कलमात बदल करण्याचा अधिकार मान्य केला. परंतु घटनेच्या मूलभूत चौकटीत बदल करण्याचा संसदेला अधिकार नसल्याचे स्पष्ट केले. या निर्णयाच्या पार्श्वभूमिवर संसद हीच सर्वश्रेष्ठ संस्था आहे आणि तिला घटनेच्या कोणत्याही कलमात बदल करण्याचा अधिकार आहे या उद्देशाशिवाय काही राजकीय उद्देशांनीही ४२ वी घटनादुरुस्ती करण्यात आली. १९७१ च्या निवडणूकीत इंदिरा गांधी यांना प्रचंड बहुमत मिळाले होते. घटनेत एवढी मोठी दुरुस्ती करण्यासाठी असलेले $^{२}/_{३}$ बहुमत त्यांना सहज मिळाले. अर्ध्या घटक राज्यांनीही घटनादुरुस्तीचे हे विधेयक पास केले आणि १८ डिसेंबर १९७६ रोजी राष्ट्रपतीनी सही केली.

ह्या घटनादुरुस्तीची व्याप्ती मोठी असून अत्यंत महत्त्वाच्या दुरुस्तीचा उल्लेख पुढील प्रमाणे करता येईल.

१) घटनेच्या उद्देशपत्रिकेत भारताचे वर्णन 'सार्वभौम लोकशाही गणराज' असा होता तो या दुरुस्तीने 'सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य' असा केला. सरनाम्यातच शेवटी 'राष्ट्राची एकता' या जागी 'राष्ट्राची एकता व अखंडता' असा शब्द प्रयोग करण्यात आला.

२) ३१(ड) हे नविन कलम टाकून राष्ट्रविरोधी कारवायांना प्रतिबंध करण्यासबंधीचा संसदेचा निर्णय न्यायालयीन पुनर्विलोनापासून मुक्त ठेवण्यात आला.

३) घटनेच्या चार अ नविन प्रकरणाद्वारे नागरीकांची १० कर्तव्ये नमूद करण्यात आली.

४) राष्ट्रपतीचे अधिकार कमी करुन मंत्रीमंडळाचा सल्ला राष्ट्रपतीवर बंधनकारक केला.

५) संसदेचा व विधानसभेचा कार्यकाळ पाच वर्षांऐवजी सहा वर्षे केला.

६) घटक राज्यातील राष्ट्रपती राजवटीची मुदत सहा महिन्याहून वाढवून एक वर्ष केली.

७) सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात घट करण्यात आली.

८) लोकसभा व विधानसभेचे कामकाज चालविण्यासाठी १०% गणपूर्तीची अट काढून टाकण्यात आली.
९) आतापर्यंत मूलभूत अधिकार हे नितिनिर्देशक तत्वांपेक्षा श्रेष्ठ समजले जात असत, परंतु आता नितिनिर्देशक तत्त्वांच्या आड मूलभूत अधिकार येणार नाहीत असे क्रम परिवर्तन झाले.

अशा प्रकारे संसदेला सर्वश्रेष्ठ स्थान देणारी, न्यायालयाचे अधिकार कमी करणारी तसेच राष्ट्रपतीलाही मंत्रीमंडळाचा सल्ला बंधनकारक ठरविणारी, संसदेचा कालावधी एक वर्षाने वाढविणारी व लोकशाही शासन व्यवस्थेचे हुकूमशाही शासनव्यवस्थेकडे जाणारे दिशानिर्देश करणारी ही घटनादुरुस्ती होती असेच स्पष्ट होते.

### २.४.५ चव्वेचाळीसावी घटनादुरुस्ती (१९७८) :

१९७६ मध्ये राष्ट्रीय आणीबाणी जाहिर करण्यात आली त्याच काळात ४२ वी घटनादुरुस्ती करण्यात आली. आणिबाणीच्या काळात नागरिकांचे मूलभूत अधिकारही स्थगित करण्यात आले. अनेक नामवंत विरोधी पक्ष नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आले. त्यामुळे काँग्रेस सरकार विरोधात लोकमत निर्माण झाले आणि १९७७ च्या निवडणुकीत काँग्रेसला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. याच निवडणुकीत विरोधी पक्षांनी ४२ वी घटनादुरुस्ती रद्द करण्याचे आश्वासन जनतेला दिले. विरोधी पक्ष म्हणजेच जनता पक्ष सत्तेवर येताच संसदेच्या पहिल्याच अधिवेशनात ४३ वे घटनादुरुस्ती विधेयक आणून ४२ वी घटनादुरुस्ती रद्द करण्याचा प्रयत्न केला. त्याच वर्षी इत्तर विरोधी पक्षांशी चर्चा करुन त्यांची संमत्ती मिळवून हिवाळी अधिवेशनात ४४ वे घटनादुरुस्ती विधेयक संमत करुन घेतले. ४२ व्या घटनादुरुस्तीने केलेल्या अनेक अक्षेपार्ह दुरुस्त्या रद्द करणे हाच या घटनादुरुस्तीचा मूळ उद्देश होता. या घटनादुरुस्तीने ४२ व्या घटनादुरुस्ती पूर्वीचे घटनेचे स्वरुप निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या घटनादुरुस्तीतील महत्त्वाच्या दुरुस्त्या पुढील प्रमाणे :

१) ३५९ कलमानुसार आणीबाणीच्या काळात मुलभूत अधिकार स्थगित होत असत इतकेच नव्हे तर नागरिकाचा जीविताचा हक्कही नाकारला जात असे, म्हणून आणीबाणीच्या काळात नागरिकाचे मुलभूत अधिकार (कलम २० व २१) स्थगित करता येणार नाही अशी ४४ व्या घटनादुरुस्तीने स्पष्ट केले.

२) प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेच्या बाबतीत २२(४) या कलमात दुरुस्ती करुन सबंधित न्यायालयाच्या न्यायाधिशाने नेमलेल्या सल्लागार मंडळाच्या संमत्तीशिवाय एखाद्या व्यक्तिला दोन महिन्यापेक्षा अधिक काळासाठी स्थानबद्ध करता येणार नाही अशी दुरुस्ती केली.

३) संपत्तीचा अधिकार हा मूलभूत अधिकाराच्या यादीतून काढून टाकला. तो केवळ कायदेशीर अधिकार राहीला. घटनेत ३०० अ हे नवीन कलम जोडून कायद्याच्या सत्तेशिवाय कोणत्याही व्यक्तीची संपत्ती हिरावून घेता येणार नाही अशी तरतूद करण्यात आली.

४) ४२ व्या घटनादुरुस्तीने मंत्रीमंडळाचा सल्ला राष्ट्रपतीवर बंधनकारक केला होता तो रद्द करुन राष्ट्रपती मंत्रीमंडळाचा सल्ला पुनर्विचारार्थ पाठवू शकतो, परंतु पुनर्विचारानंतर तोच सल्ला दिल्यास त्याला मान्यता देणे राष्ट्रपतीवर बंधनकारक केले.

५) लोकसभा व विधानसभेचा कार्यकाळ पुन्हा पाच वर्षाचा करण्यात आला.

६) संसदेसाठी गणसंख्या $\frac{१}{१०}$ सदस्य संख्या करण्यात आली.

७) न्यायालयाची प्रतिष्ठा पुनर्स्थापित करण्यासबंधी तरतूद करण्यात आली.

८) आणीबाणीच्या तरतूदीतही दुरुस्त्या करण्यात आल्या. उदा.

अ) आणीबाणी लावण्यासाठी केवळ 'अंतर्गत बंडाळी' हे कारण पुरेसे होते परंतु आता त्या ऐवजी 'सशस्त्र बंडखोरी' अशी शब्द रचना करण्यात आली.

ब) आणीबाणी लागू करण्याच्या मंत्रीमंडळाच्या सल्ल्यांचा पुनर्विचार करण्यास मंत्रिमंडळाकडे पाठविण्याचा राष्ट्रपतीला अधिकार मिळाला.

क) आणीबाणी जाहिर केल्यानंतर दोन महिन्याऐवजी एका महिन्यात त्यास संसदेची मान्यता द्यावी.

ड) संसदेने आणीबाणीच्या घोषणेस मान्यता दिल्यानंतर ती केवळ सहा महिने चालेल. पुढे चालू ठेवण्यासाठी पुन्हा सहा महिन्यासाठी मान्यता द्यावी लागेल.

अशा प्रकारे ४४ व्या घटनादुरुस्तीने बेचाळीसाव्या घटनादुरुस्तीने झालेले दुष्परिणाम नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

### २.४.६ बावन्नावी घटनादुरुस्ती (१९८५) :

पक्षांतर ही भारतीय राजकारणातील मोठी समस्या होती. एका पक्षाच्या माध्यमातून निवडून आलेला उमेदवार कोणत्याही पक्षात केव्हाही जात असे. विशेषतः विधानसभा व लोकसभेच्या निवडणुकीनंतर सत्ता हस्तगत करण्यासाठी इतर पक्षाच्या उमेदवारांना मंत्रीपद, किंवा पैसे असे अमिष दाखवून आपल्या पक्षात घेऊन बहुमत प्राप्त करण्याचा प्रयत्न केला जात असे. यातूनच कमालीची राजकीय अस्थिरता निर्माण होत असे यावर उपाय म्हणूनच १९८५ मध्ये राजीव गांधीच्या कारकिर्दीत पक्षातंर बंदी सबंधी कायदा करण्याची चर्चा सुरु झाली. त्याला विरोधी पक्षांचाही पाठिंबा मिळाला आणि ५२ वी घटनादुरुस्ती करुन संसदेने १९८५ मध्ये पक्षांतर विरोधी तरतूदी केल्या. यालाच पक्षांतर बंदीचा कायदा असेही म्हणतात. पक्षांतर विरोधी कायद्यानुसार राज्यघटनेतील १०२(२) आणि १९१(२) या कलमांमध्ये दुरुस्ती केली. तसेच घटनेच्या दहाव्या परिशिष्टाचा समावेश करुन त्यात पक्षांतर विरोधा सबंधी तरतूदींचा समावेश केला आहे. पक्षांतर विरोधी कायद्यानुसार पुढील कारणांवरुन एखाद्या विधिमंडळ किंवा संसद सदस्याचे सदस्यत्व रद्द होऊ शकते.

१) ज्या पक्षाचा उमेदवार म्हणून निवडून आला असेल त्या पक्षाचा त्याग करणे.
२) विधिमंडळाच्या कामकाजाच्या संदर्भात काढलेल्या आदेशाचे त्या पक्षाच्या सभासदाने पालन न करणे.
३) शिस्तभंगाची कारवाई म्हणून आपल्या पक्ष सदस्याची पक्षाने हकालपट्टी केली असेल.
४) निवडून आलेल्या सभासदाने दुसऱ्या पक्षात प्रवेश केला असेल.

वरील कारणांवरुन संसद किंवा राज्य विधिमंडळाच्या सदस्याचे सदस्यत्व रद्द करण्याचा अधिकार सबंधित गृहाच्या सभापतीस देण्यात आला आहे. अर्थात सभापतीच्या निर्णयाविरुद्ध उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा अधिकार त्या सभासदाला आहे.

असे असले तरी (१) एखाद्या पक्षाच्या $\frac{१}{३}$ सभासदांनी दुसऱ्या एकाच पक्षात प्रवेश केल्यास ते पक्षांतर न मानता त्यास पक्षाचे विलीनीकरण म्हटले जाईल व ते पक्षांतर विरोधी नसेल. (२) अपक्ष म्हणून निवडून आलेल्या सभासदाला कोणत्याही राजकीय पक्षाचे सभासदत्व स्वीकारता येत नाही. परंतु सहा महिन्याच्या आत कोणत्या पक्षाला पाठिंबा देणार हे निर्धारित करणे आवश्यक आहे.

अशा प्रकारे ५२ व्या घटनादुरुस्तीने पक्षांतरबंदी घालून राजकारणात स्थिरता आणण्याचा प्रयत्न केला आहे.

### २.४.७ बासष्ठांवी घटनादुरुस्ती (१९८९) :

अनुसूचीत जाती जमाती यांना विधानसभा आणि लोकसभा या लोकप्रतिनिधी सभागृहात योग्य प्रतिनिधित्व मिळावे यासाठी मूळ राज्यघटनेत तशी तरतूद करण्यात आलेली आहे. ही विशेष सवलत किंवा राखीव जागा या केवळ दहा वर्षासाठी देण्यात आलेल्या होत्या. परंतु अशा प्रतिनिधित्वाची आजही गरज भासत आहे. त्यासाठीच प्रत्येक दहा वर्षानंतर ३३४ व्या कलमात दुरुस्ती करुन ही मुदत दहा वर्षे वाढविलेली आहे. १९८९ मध्येही ही मुदत २००० पर्यंत वाढविण्यात आली. त्यानुसार 'अनुसूचीत जाती व जमाती तसेच ॲंगलो इंडियन समुदायाची लोकसभा आणि विधानसभेतील आरक्षणाची मुदत इ.स. २००० पर्यंत असेल' अशी घटनादुरुस्ती करण्यात आली.

### २.४.८ त्र्याहत्तरावी घटनादुरुस्ती (१९९३) :

बलवंतराय मेहता समितीच्या स्वीकारानंतर २ ऑक्टोबर १९५९ रोजी पंचायत राजची सुरुवात झाली. राष्ट्रीय स्तरापासून ग्रामीण स्तरापर्यंत लोकशाहीचे विकेंद्रीकरण व्हावे, समाजातील सर्व स्तरातील लोकांचा आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात सहभाग वाढावा हा पंचायत राज्याचा उद्देश होता. तो साध्य करण्यासाठी वेळोवेळी अनेक समित्या स्थापन करुन त्यांच्या शिफारशी अमलात आणण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु अपेक्षित परिणाम साध्य झाला नाही. राजीव गांधी पंतप्रधान झाल्यानंतर त्यांच्या असे लक्षात आले की, ग्रामीण विकासासाठी राष्ट्रीय स्तरावर एक रुपया खर्च केला तर त्यापैकी केवळ १५ पैसेच ग्रामीण स्तरापर्यँत पोहचतात म्हणजेच ८५ पैसे प्रशासकीय यंत्रणाच खाऊन टाकते. म्हणून राजकीय प्रशासकीय व आर्थिक दृष्टिकोनातून पंचायत राज संस्था मजबूत केल्याशिवाय ग्रामीण भागाचा विकास होणार नाही याचा त्यांना साक्षात्कार झाला व पंचायत राज्य व्यवस्थेसबंधी राजीव गांधी सरकारने १९८९ मध्ये ७३ व्या घटनादुरुस्तीचे विधेयक संसदेत मांडले. ते बहुमताअभावी संमत झाले नाही. त्यानंतर पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्या सरकारने १९९१ मध्ये हे विधेयक दोन्ही सभागृहात मंजूर करुन घेतले. २० एप्रिल १९९३ रोजी या घटनादुरुस्ती विधेयकास राष्ट्रपतीची संमती मिळाली.

७३ व्या घटनादुरुस्तीचे कायद्याने 'पंचायती' या शिर्षकाखाली 'भाग-९' हा नवा भाग राज्यघटनेत समाविष्ठ केला त्यात २४३(ए ) ते २४३ ओ अशी कलमे आहेत. याशिवाय घटनेला अकरावे परिशिष्ट जोडून त्यात पंचायत राज्याचे अधिकार स्पष्ट केले आहेत. ही घटनादुरुस्ती व्यापक स्वरुपाची आहे. काही महत्त्वाच्या बाबी पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) या घटनादुरुस्तीमुळे पंचायत राज्याला घटनात्मक दर्जा मिळाला.

२) प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी ग्रामसभा असेल गावाच्या विकासासबंधीचे निर्णय ग्रामसभा घेईल. अशी तरतूद केली. ग्रामसभेत त्या गावातील प्रत्येक प्रौढ व्यक्तीचा समावेश केला जातो.

३) पूर्वी ग्रामपंचायतीच्या निवडणुका सतत पुढे ढकलून तिचा कार्यकाळ कितीही वाढविता येत असे. या घटनादुरुस्तीनुसार हा कालावधी पाच वर्षाचाच राहील. अशी तरतूद केली.

४) अनुसूचित जाती जमातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात, तर महिलांना $\frac{१}{३}$ व ओबीसींना २७% राखीव जागांची तरतूद करण्यात आली.

५) ग्रामपंचायती आर्थिक दृष्टीने भक्कम करण्यासाठी वित्तीय आयोगाची स्थापना करण्यात आली.

६) पंचायत राज्याच्या आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी या संस्थांचे हिशेब ठेवणे, त्यांचे लेखा परिक्षण करणे यासबंधी तरतूदी करण्यात आल्या.

अशा प्रकारे ७३ व्या घटनादुरुस्तीने पंचायत राज्याला घटनात्मक दर्जा दिला, तसेच राजकीय स्थिरता प्राप्त झाली आणि या दुरुस्तीमुळेच पंचायत राज्याला आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले व स्त्रिया व शोषित वर्गाला सत्तेच्या परिधात प्रवेश मिळाला.

### २.४.९ चौऱ्यात्तरावी घटनादुरुस्ती (१९९३) :

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ग्रामीण आणि नागरी (शहरी) असे दोन भाग पाडले जातात. ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्वरुपात परिवर्तन केले. तर नागरी किंवा शहरी स्थानिक स्वराज्य संस्था मजबूत करण्यासाठी चौऱ्यात्तरावी घटनादुरुस्ती करण्यात आली. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नगर पंचायत, नगर परिषद, महानगरपालिका यांचा समावेश होतो. ७४ व्या घटनादुरुस्तीपूर्वी या संस्थांचे अस्तित्व राज्यशासनाच्या मर्जीवर अवलंबून होते. या संस्थांना सर्वात अधिक जबाबदाऱ्या परंतु अधिकार सर्वात कमी होते. म्हणून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक स्वायत्तत्ता व बळकटी मिळवून देणे व या संस्थांच्या कार्यातील शासनाचा हस्तक्षेप कमी करणे यासाठी विविध समित्या नेमल्या. १९८६ मध्ये एल.एम्. सिघवी समिती नेमण्यात आली या समितीच्या शिफारशींच्या अमंलबजावणीसाठी ६५ वे घटनादुरुस्ती विधेयक मांडण्यात आले. ते मंजुर होऊ शकले नाही. त्यानंतर १९९१ मध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा व संरक्षण बहाल करण्यासाठी चौऱ्यात्तरावे घटनादुरुस्ती विधेयक संसदेत मंजूर करण्यात आले.

७४ व्या घटनादुरुस्तीमुळे "नगरपालिका" या शिर्षकाखाली (भाग ९-अ) राज्यघटनेत समाविष्ठ करण्यात आला. यामध्ये २४३ (त) ते २४३ (य,छ) या कलमानुसार नगरपालिकांना घटनात्मक दर्जा, संरक्षण व सत्ता देण्यासबंधी तरतूदी करण्यात आल्या. तसेच याच कलमात नगरपालिकेची स्थापना, समित्या, नगरपालिकांचे अध्यक्ष, त्यांची निवड इ. तरतूदी करण्यात आल्या. तसेच समाजातील भिन्न वर्ग व स्त्रीयांसाठी राखीव जागा, राखीव पदे, त्यांचा कार्यकाळ, नियमित निवडणुका व त्यासबंधी निवडणुक आयोग, वित्तिय आयोग, इ. सबंधी तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. घटनेत बारावे परिशिष्ठ समाविष्ठ करुन त्यात स्थानिक नागरी संस्थांचे अधिकार स्पष्ट करण्यात आले.

थोडक्यात ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांप्रमाणेच नागरी स्वराज्यसंस्थांनाही घटनात्मक दर्जा व संरक्षण देऊन त्यांना भक्कम पायावर उभे करणे हा या घटनादुरुस्तीचा प्रमुख उद्देश आहे.

### २.४.१० ८६ वी घटनादुरुस्ती (२००२) :

भारतातील अनेक घटकराज्यांमध्ये विशेषतः ग्रामीण भागात आजही मोठ्या प्रमाणावर निरक्षरता आहे. भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये राज्याने वय वर्षे चौदापर्यंतच्या सर्व मुलांना मोफत शिक्षण देण्याची तरतूद करावी असे स्पष्ट केलेले असले तरी त्यासबंधी फारशी दखल घेतली गेली नाही, म्हणूनच २००२ मध्ये शह्यांशीवी घटनादुरुस्ती करुन शिक्षणाच्या हक्काचा मूलभूत हक्कात समावेश केला. तर २०१० मध्ये यासबंधी कायदा करण्यात आला. घटनादुरुस्तीच्या अधिनियम २००२ च्या कलम २ द्वारे

१) प्राथमिक शिक्षणाचा मूलभूत हक्कात समावेश केला. त्यानुसार घटनेत २१-अ हे कलम समाविष्ट करण्यात आले. त्यात असे स्पष्ट केले आहे की, “राज्यसंस्था तिने निश्चित केलेल्या रीतीने ६ ते १४ वयोगटातील सर्व मुला-मुलींना मोफत आणि सक्तीचे शिक्षण पुरवेल”.

२) मार्गदर्शक तत्त्वांमधील कलम ४५ च्या विषयात बदल केला त्यानुसार “सर्व मुलांच्या वयाची ६ वर्षे पूर्ण होईपर्यंत राज्यसंस्था त्यांना प्रारंभिक बाल्यावस्थेत संगोपण आणि शिक्षण पुरविण्याचा प्रयत्न करील.”

३) कलम ५१ - अ अंतर्गत नवीन मूलभूत कर्तव्यात अकरावे कर्तव्य जोडण्यात आले. त्यानुसार जो जन्मदाता असेल किंवा पालक असेल त्याने, आपल्या अपत्यास अथवा पाल्यास, त्याच्या वयाच्या सहाव्या वर्षापासून ते चौदाव्या वर्षापर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करुन द्यावी.

अशा प्रकारे सर्वांना शिक्षणाची संधी मिळावी, आर्थिक व सामाजिक अथवा अन्य कारणांमुळे कोणीही शिक्षणापासून वंचित राहू नये यादृष्टिने ही घटनादुरुस्ती अत्यंत महत्त्वाची आहे.

### २.४.११ ब्यांन्नवावी घटनादुरुस्ती (२००३) :

राज्यघटनेच्या कलम ३४४ (२) (क) मध्ये ‘संघराज्यीय प्रशासकीय प्रयोजनाकरिता हिंदी भाषेचा उत्तरोत्तर अधिक वापर करावा’ असे स्पष्ट केले असले तरी ३४४(१) या कलमात आठव्या परिशिष्टात समाविष्ट करण्यासबंधी किंवा त्यातील घटकराज्यांच्या किंवा प्रादेशीक भाषांच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी आयोग व संसदीय समिती नियुक्त करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला दिलेला आहे. त्यानुसार वेळोवेळी या सूचीत काही प्रादेशिक भाषांचा (घटक राज्याची भाषा) समावेश केलेला आहे. २००३ मध्ये ब्यान्नवावी घटनादुरुस्ती करुन बोडो, डोग्री (डोंगरी) मथिली (मैथिली) आणि संथाळी या भाषांचा समावेश करण्यात आला. आठव्या अनुसूचीत सध्या २२ भाषांचा समावेश केलेला आहे. ३५१ व्या कलमात स्पष्ट केल्याप्रमाणे भारताच्या संमिश्र संस्कृतीच्या सर्व घटकांना अभिव्यक्तीचे माध्यम उपयोगात आणता येईल अशी संधी उपलब्ध करुन देण्यासाठी ही घटनादुरुस्ती अत्यंत महत्त्वाची आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) चौथ्या घटनादुरुस्तीचे उद्देश व महत्त्व स्पष्ट करा.

२) शिक्षणाच्या मूलभूत हक्का सबंधी झालेल्या घटना दुरुस्तीची माहिती लिहा.

## २.५ सारांश

अशा प्रकारे भारतीय घटनाकारांनी भारतीय नागरिकांना, नवीन पिढीला काळ, परिस्थिती प्रमाणे घटनादुरुस्ती करण्याचा मार्ग घटनेतच सांगितलेला आहे.

सत्ताविभाजनाच्या तत्त्वानुसार कायदेमंडळ कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांना घटनेने समान पातळीवर ठेवले असले तरी घटनादुरुस्तीच्या माध्यमातून संसद सर्वश्रेष्ठ ठरविण्याचा व त्याला न्यायालयाकडून प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो.

भारतीय राज्यघटनेत आतापर्यंत ९७ घटनादुरुस्त्या झाल्या असल्या तरी भारतीय राजकीय व सामाजिक व्यवस्थेवर दीर्घकालीन परिणाम करणाऱ्या काही घटनादुरुस्तीचा आढावा यात घेतला आहे.

## २.६ प्रश्न

१) भारतीय राज्यघटनेतील घटनादुरुस्तीचे मार्ग सांगा.

२) भारतीय राज्यघटनेतील महत्त्वाच्या घटनादुरुस्तींचा आढावा घ्या.

३) संपत्तीच्या मूलभूत अधिकारात परिवर्तन करणाऱ्या घटनादुरुस्तींची चर्चा करा.

४) बेचाळीसावी घटनादुरुस्ती आणि ४४ वी घटनादुरुस्ती यांच्यातील विसंगती स्पष्ट करा.

५) स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा देण्यातील ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीचे योगदान स्पष्ट करा.

६) टीपा लिहा.

   १) ४२ वी घटनादुरुस्ती.

   २) ७३ आणि ७४ वी घटनादुरुस्ती.

❖❖❖❖

# ३

# भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान
# (Philosophy of the Indian Constitution)

**प्रकरणाची रचना :**

३.० उद्दिष्ट
३.१ प्रस्तावना
३.२ भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान
३.३ भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका
३.४ सारांश
३.५ प्रश्न

## ३.० उद्दिष्ट

कोणतीही संस्था किंवा संघटना विशिष्ट नियमाप्रमाणे कार्य करीत असते. ह्या नियमांची जी संहिता किंवा सूत्रबद्ध पद्धतीने केलेला नियमांचा संग्रह म्हणजेच त्या संस्थेची घटना होय. राजकीय व्यवस्था व राज्याचा कारभारही अशाच नियमांनी चालतो. त्या नियमांची संहिता म्हणजेच राज्यघटना होय. राज्यघटनेत त्या-त्या देशाच्या सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय परिस्थितीचे प्रतिबिंब पडलेले असते. त्यावर आधारीत राज्यघटनेने काही मूल्ये, तत्त्वे स्वीकारलेली असतात. त्यालाच राज्यघटनेचे तत्त्वज्ञान असे म्हणतात. भारतीय राज्यघटनेचेही काही विशिष्ट तत्वज्ञान आहे. त्याचा अभ्यास विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. भारतीय राज्यघटनेच्या तत्वज्ञानाची ओळख करुन देणे हे या प्रकरणाचे उद्दिष्ट आहे.

## ३.१ प्रस्तावना

भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी, विस्तृत आणि वैशिष्टपूर्ण राज्यघटना आहे. या देशाच्या राजकीय व्यवस्थेबरोबर नागरीकांच्या मूलभूत हक्क, कर्तव्ये, यांची सविस्तर मांडणी केलेली आहे. याशिवाय राज्यकारभार करताना ज्या तत्त्वांचे पालन करणे कायदेशीर बंधन नसले तरी नैतीक बंधन असणारी, कल्याणकारी राज्याच्या निर्मितीस चालना देणारी काही तत्त्वे राज्यघटनेत समाविष्ट केलेली आहेत. त्यालाच राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे असे म्हणतात. या सर्वाचा या प्रकरणात सविस्तर चर्चा केलेली आहे, ती विद्यार्थ्यांना विषय समजावून घेण्यास मदत करणारी आहे.

## ३.२ भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान (Philosophy of the Indian Constitution) अर्थ

प्रत्येक देशाच्या राज्यघटनेला स्वतःचे तत्वज्ञान असते. भारतीय राज्यघटनासुद्धा विशिष्ठ तत्त्वे व मूल्यांवर आधारित आहे. ही तत्त्वे व मूल्ये आपल्या राज्यघटनेचा पाया आहे. त्यालाच आपण भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान म्हणतो.

### ३.२.१ तत्त्वज्ञानावर प्रकाश टाकणारा ठराव :

घटनासमितीच्या पहिल्याच अधिवेशनात पंडीत नेहरूंनी भारतीय राज्यघटनेच्या ध्येयधोरणांविषयक ठराव मांडला होता. या ठरावात भारतीय राज्यघटनेची तात्वीक बैठक स्पष्ठ करण्यात आली होती.

ध्येयधोरण विषयक ठरावात (Objective resolution) खालील मूल्यांचा उल्लेख होता :-

१) भारतात एक स्वतंत्र, सार्वभौम, गणतंत्र निर्माण करणे.
२) भारताचे संघराज्य निर्माण करणे.
३) जनतेचे सार्वभौमत्व जाहीर करणे.
४) मूलभूत हक्कांची निर्मिती करणे आणि स्वातंत्र्य, समता, न्यायाची हमी लोकांना देणे.
५) भारतीय संस्थाने व विविधप्रांतांना सभसदत्व देणे.
६) अल्पसंख्यांक व मागासवर्गीयांना खास सवलती देणे.
७) भारताची एकात्मता राखणे.
८) जागतिक शांतता व मानवी कल्याणाला योगदान करून जगात मानाचे स्थान प्राप्त करणे.

राज्यघटनेच्या, ध्येयधोरण विषयक वरील ठरावामध्ये जे तत्त्वज्ञान दिसून येते तेच तत्त्वज्ञान भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेमध्ये (सरनामा Preamble) मध्ये स्पष्ठ झाले आहे.

## ३.३ भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका (Preamble of the Indian Constitution)

### ३.३.१ उद्देशपत्रिका म्हणजे :

राज्यघटनेची प्रारंभीची प्रस्तावना किंवा सारांश म्हणजे राज्यघटनेची उद्देशपत्रिका होय.

### ३.३.२ उद्देशपत्रिकेचे महत्त्व :

उद्देशपत्रिकेला भारतीय राज्यघटनेचा आत्मा म्हणतात कारण त्यावरून संपूर्ण राज्यघटनेचे तत्त्वज्ञान स्पष्ठ होते. स्वतंत्र भारतात घटनाकार कोणत्या प्रकाराचे राजकीय, सामाजिक, आर्थिक वातावरण निर्माण करू इच्छित होते याची जाणीव उद्देशपत्रिकेवरून होते.

### ३.३.३ भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका :

भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका खालीलप्रमाणे आहे.

"आम्ही भारतीय जनता, भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, प्रजासत्ताक, गणराज्य निर्माण करण्याचे आणि भारताच्या सर्व नागरिकांना


**न्याय** - सामाजिक, आर्थिक आणि राजकीय

**स्वातंत्र्य** - विचार, उच्चार, विश्वास, श्रद्धा, पूजा, उपासना यांचे

**समता** - दर्जा व संधीबाबत

**बंधुता** - व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राची एकात्मता राखणारी ही उद्दिष्टे प्राप्त करून देण्याचा आमच्या या घटनासमितीत आज २६ नोव्हेंबर १९४८ या दिवशी निर्धार करीत आहोत. ही घटना आमच्यासाठी तयार, मंजूर व स्वीकृत करून ती आम्हाला अर्पण करीत आहोत".

**राज्यघटनेचे तत्त्वज्ञान -** भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेवरून तीन गोष्टी स्पष्ट होतात.




### १) भारतीय राज्यघटनेचे उगमस्थान :-

भारतीय घटनेची निर्मिती भारतीय जनतेच्या इच्छेतून झाली आहे. लोकांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या घटनासमितीने घटनेची निर्मिती केली आहे. भारताची राज्यघटना ब्रिटिशांनी निर्माण केली नाही. उद्देशपत्रिकेतील सुरूवातीचे शब्द "आम्ही भारतीय लोक... ही घटना आमच्यासाठी तयार, मान्य व स्वीकृत करीत आहोत" या शब्दप्रयोगावरून स्पष्ठ होते की भारतीय घटनेचे उगमस्थान भारतीय जनताच आहे.

### २) भारतीय राज्याचे स्वरूप (Nature of the State) :-

उद्देशपत्रिकेच्या दुसऱ्या ओळीवरून भारतीय राज्याचे स्वरूप सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, प्रजासत्ताक, गणराज्य असल्याचे स्पष्ठ होते. भारत सार्वभौम आहे म्हणजे इतर कोणत्याही देशांचे नियंत्रण किंवा वर्चस्व भारतावर नाही. देशांतील सर्व व्यक्ती व संस्था यांच्यावर भारतीय राज्याची सत्ता आहे. परराष्ट्रांशी भारताचे संबंध ठरविण्याचा हक्क भारतीय राज्याला आहे. भारत ब्रिटिश राष्ट्रकुलसभासद राष्ट्रसंघा (British Common Wealth) चा सभासद आहे. परंतु यामुळे भारताच्या सार्वभौमत्वावर कोणतीही मर्यादा येत नाही. कारण हा स्वतंत्र राष्ट्राचा संघ आहे या संघाचे भारताचे सभासदत्व ऐच्छिक आहे. इंग्रजांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे एवढाच उद्देश या संघाचे सभासदत्व घेण्यामागे आहे.

**गणराज्य :-**

भारतात गणराज्य आहे म्हणजे भारतीय राज्याचा प्रमुख (राष्ट्रपती) अनुवंशिक नाही तर; लोकांनी निवडून दिलेला आहे. शासन लोकांनी निवडून दिलेले व लोकांसाठी कार्य करणारे आहे.

**प्रजासत्ताक (लोकशाही):-**

भारतात प्रजासत्ताक राज्यपध्दती स्वीकारण्यात आली आहे. भारतीय लोकशाही राज्यपध्दतीच्या दोन बाजू आहेत. १) लोकशाही एक शासनाचा प्रकार आहे. २) दुसरे म्हणजे लोकशाही शासनास आवश्यक लोकशाही समाजाची स्थापना. लोकशाही ही एक प्रतिनिधीक शासनपध्दती आहे. लोक आपले प्रतिनिधी निवडून देतात आणि ते प्रतिनिधी राज्यकारभार करतात. लोक या या प्रतिनिधीक शासनावर संसदेद्वारे प्रत्यक्ष नियंत्रण ठेवतात. प्रौढ मताधिकारांमुळे प्रत्येक नागरिकाला मतदाराचा अधिकार मिळतो. प्रौढ मताधिकाराच्या माध्यमातून जनता शासनात सहभागी होऊ शकते. २) लोकशाही समाजाची स्थापना करणे राजकीय लोकशाहीसाठी आवश्यक असते. त्यासाठी समान दर्जा व संधी, आर्थिक न्याय, संपत्तीचे समान वितरण, स्वातंत्र्य व समतेचा हक्क इत्यादीच्या तरतूदी राज्यघटनेत करण्यात आल्या आहेत. की ज्याच्यामुळे सामाजिक आणि आर्थिक लोकशाही भारतात निर्माण होऊ शकेल.

**समाजवाद :-**

भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेमध्ये 'समाजवाद' हा शब्द १९७६ च्या ४२ व्या घटनादुरूस्तीद्वारे समाविष्ट करण्यात आला आहे. संपत्ती आणि उत्पन्न यातील विषमता नष्ट करणे, सर्व लोकांना योग्य राहणीमानाचा दर्जा उपलब्ध करून देणे हा त्यामागे उद्देश होता. भारतीय समाजवाद खाजगी संपत्ती नष्ट करण्यास सांगत नाही परंतु खाजगी मालमत्तेच्या नियंत्रणावर भर देतो. संपत्ती व कारखान्यांचे संपूर्ण राष्ट्रीयीकरण न करता मिश्र अर्थव्यवस्था निर्माण करण्यावर भर देतो. १९९२ नंतर भारतीय समाजवादी व्यवस्था खाजगीकरण आणि उदारीकरणावर भर देत आहे.

**धर्मनिरपेक्ष :-**

१९७६ साली ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे 'धर्मनिरपेक्ष' हा शब्द भारतीय घटनेत समाविष्ट केला आहे. भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत रचनेचा तो एक भाग आहे. भारतीय राज्याने सर्व धर्मांना सारखेच संरक्षण दिले आहे. राज्याचा धर्म म्हणून कोणत्याही विशिष्ट धर्माला मान्यता दिली नाही. ळोकांना पुजाअर्चा, श्रध्दा, उपासना इत्यादीचे स्वातंत्र्य धार्मिक स्वातंत्र्याच्या हक्काद्वारे देण्यात आले आहे. याउलट पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, बर्मा, नेपाळ इत्यादी भारताच्या शेजारच्या राष्ट्रांनी विशिष्ट धर्माला मान्यता दिली. ही राष्ट्रे धर्मातीत राष्ट्रे आहेत. भारतीय राज्य धर्म निरपेक्ष राज्य आहे.

भारतीय राज्याचे स्वरूप कोणते आणि कसे आहे ते उद्देशपत्रिकेवरून स्पष्ट होते. भारतीय राज्यघटनेची मूलभूत रचना कोणत्या तत्त्वांवर आधारित आहे हेही त्यावरून लक्षात येते.

**३) भारतीय राज्यघटनेची उद्दिष्टे :**

उद्देशपत्रिकेवरून भारतीय राज्याची मुख्य उद्दिष्टे स्पष्ट होतात. न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, व्यक्तीची प्रतिष्ठा, राष्ट्राची अखंडता व एकात्मता राखणे भारतीय राज्याची मुख्य उद्दिष्टे आहेत.

**न्याय :**

सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात न्याय प्रस्थापित करणे भारतीय राज्याचे उद्दिष्ट आहे. व्यक्तिहित आणि समाजहिताचा मेळ म्हणजे न्याय. सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय भारतात प्रस्थापित व्हावा म्हणूनच मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे, सामाजिक क्षेत्रात भेदभाव न करणे, आर्थिक क्षेत्रात समान संधी व दर्जा उपलब्ध करून देणे, इत्यादी तरतूदी घटनेत करण्यात आल्या आहेत.

**स्वातंत्र्य :**

व्यक्तिच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास स्वातंत्र्याशिवाय शक्य नाही. म्हणून राज्यघटनेमध्ये विचार, उच्चार, संचार, पूजा, विश्वास, श्रध्दा, इत्यादी प्रकारचे स्वातंत्र्य मूलभूत हक्कांच्या स्वरूपात नागरिकांना दिले आहे. व्यक्ति व समाजाच्या विकासासाठी अशा तऱ्हेचे स्वातंत्र्य आवश्यक असते. स्वातंत्र्यामुळे व्यक्तिविकासाला पोषक वातावरण निर्माण होते.

**समता :**

समतेशिवाय स्वातंत्र्याला अर्थ नसतो. म्हणूनच भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्कामध्ये पहिलाच हक्क 'समतेचा' आहे. या हक्कानुसार कायद्यापुढे समानता, कायद्याचे सर्व नागरिकांना समान संरक्षण, प्रत्येकाला समान संधी व दर्जा देण्यात आला आहे. स्वातंत्र्य उपभोगण्याची व विकासाची समान संधी प्रत्येक नागरिकाला उपलब्ध करून देणे हा त्यामागे उद्देश आहे.

**बंधुता :**

प्रत्येक व्यक्तिला प्रतिष्ठा मिळावी, माणूस म्हणून जगता यावे, प्रत्येकाला मानवी वागणूक मिळावी, न्याय मिळावा यासाठी मार्गदर्शक तत्त्वांमध्ये अनेक तरतूदी करण्यात आल्या आहेत. राष्ट्राचे ऐक्य आणि एकात्मता राखणारा बंधुभाव निर्माण करणे भारतीय राज्याचे उद्दिष्ट आहे. भारत विविध धर्म, जाती, वंश असलेला देश आहे. या विविधतेतून भारतात एकता निर्माण व्हावी आणि राष्ट्राचे ऐक्य कायम राहावे यासाठी 'बंधुभाव' निर्माण करण्यावर भर आहे.

## ३.४ सारांश

भारतीय राज्यघटनेचे मूलभूत तत्त्वज्ञान उद्देशपत्रिकेमध्ये वरीलप्रमाणे मोजक्या शब्दात व्यक्त झाले आहेत. या तत्त्वांच्या उद्दिष्टप्राप्तीसाठीच मार्गदर्शकतत्त्वांची यादी, मूलभूत हक्क इत्यादी तरतूदी घटनेत आहे. देशाचे सार्वभौमत्त्व, ऐक्य व एकात्मता, धर्मनिरपेक्षता राखण्यासाठी मूलभूत कर्तव्याचाही समावेश घटनेच्या कलम ५१ 'अ' मध्ये १९७६ साली केला आहे.

**सारांश तक्ता**

उद्देशपत्रिका आणि भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान

- १ उद्देशपत्रिका म्हणजे काय ?
- २ मूळ स्वरूपातील उद्देशपत्रिका
- ३ घटनेचे तत्त्वज्ञान
  - १ घटनेचे उगमस्थान लोकांचे सार्वभौमत्त्व
  - २ राज्याचे स्वरूप
    - १) सार्वभौम
    - २) समाजवादी
    - ३) धर्मनिरपेक्ष
    - ४) लोकशाही
    - ५) गणराज्य
  - ३ घटनेचे उद्दिष्ट
    - १) न्याय
    - २) स्वातंत्र्य
    - ३) समता
    - ४) बंधुता
    - ५) राज्याची एकता व एकात्मता
- ४ निष्कर्ष

**आपली प्रगती तपासा :**

१) भारतीय राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेतून कोणती उद्दिष्ट्ये स्पष्ट होतात ?

## ३.५ प्रश्न

१) भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका स्पष्ट करा.

२) भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेच्या आधाराने भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान स्पष्ट करा.

३) भारतीय राज्यघटनेच्या तत्त्वज्ञानाची चर्चा करा.

४) टिपा लिहा.

   १) भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका.

   २) भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान.

❖❖❖❖

# ४

# मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे

**प्रकरणाची रचना :**

४.० उद्दिष्ट
४.१ प्रस्तावना
४.२ मूलभूत हक्क
४.३ मार्गदर्शक तत्त्वे
४.४ सारांश
४.५ प्रश्न

## ४.० उद्दिष्ट :

हक्क आणि कर्तव्यांचा अभ्यास करुन नागरिकांमध्ये जागृकता आणणे.

## ४.१ प्रस्तावना :

भारतीय राज्यघटनेमध्ये मूलभूत हक्कांची यादी आणि मार्गदर्शक तत्त्वांची यादी समाविष्ट आहे. भारतीय नागरिकांचे मूलभूत हक्क आणि स्वातंत्र्याची सविस्तर यादी राज्यघटनेत आहे. राज्याच्या धोरणविषयक मार्गदर्शन करणारी मार्गदर्शक तत्त्वेही राज्यघटनेत आहेत.

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागामध्ये कलम १२ ते ३५ नुसार नागरिकांना मूलभूत हक्कांची हमी देण्यात आली आहे.

## ४.२ मूलभूत हक्कांचा अर्थ :

मूलभूत हक्क म्हणजे नागरिकांसाठी आवश्यक असणारी मूलभूत स्वातंत्र्ये. भारतात ज्यांची हमी राज्यघटनेद्वारे देण्यात आली आहे. शासनकर्त्यांना घटनादुरुस्तीशिवाय त्यात परिवर्तन किंवा दुरुस्ती करता येत नाही. राज्यघटनेत मूलभूत हक्कांची यादी असल्यामुळे नागरिकांना त्यांच्या हक्क व स्वातंत्र्याची हमी मिळाली आहे.

### ४.२.१ मूलभूत हक्कांची आवश्यकता :

१) प्रत्येक व्यक्तीला सुसंस्कृत जीवन जगण्यासाठी आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी काही स्वातंत्र्ये आवश्यक असतात. त्याशिवाय व्यक्ती जीवन जगू शकत नाही. व्यक्तीजीवनास

आवश्यक स्वातंत्र्ये हक्क्यांच्या स्वरुपात नागरिकांना मिळतात. राज्याकडून हक्क स्वातंत्र्याच्या संरक्षणाची हमी मिळते तेव्हा अर्थपूर्ण जीवन जगणे व्यक्तीला शक्य होते. हक्कांमुळे सुसंस्कृत जीवन जगण्यास अनुकूल परिस्थिती नागरिकांना उपलब्ध होते. २) लोकशाही यशस्वी होण्यासाठी मूलभूत हक्कांची आवश्यकता असते. कारण या हक्कांमुळे लोकांना स्वातंत्र्य प्राप्ती होते. त्याचा उपयोग जागरूक लोकमत व लोकांचा विकास होण्यास लोकांचा शासनातील सहभाग वाढण्यास होते. ३) हक्कांमुळे लोकांना स्वातंत्र्याची हमी मिळते. भारतासारख्या धर्म, जात, भाषा इत्यादी विविधता असलेल्या देशांमध्ये लोकांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण होण्यासाठी, लोकांमध्ये सलोख्याचे, सामंजस्याचे वातावरण निर्माण होण्यासाठी, समाजात एकसंघता येण्यास हक्कांची हमी आवश्यक असते.

## ४.२.२ मूलभूत हक्कांची यादी :

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात कलम नं. १२ ते ३५ मध्ये मूलभूत हक्कांची यादी समाविष्ट आहे. मूळ भारतीय राज्यघटनेनुसार ७ मूलभूत हक्क होते परंतु ४४ व्या घटनादुरुस्तीनुसार राज्यघटनेतील संपत्तीचा हक्क मूलभूत हक्कांतून काढून टाकण्यात आला आहे. आता एकूण ६ मूलभूत हक्क आहेत. ते हक्क खालील प्रमाणे –

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| समतेचा हक्क कलम १४ ते १८ | स्वातंत्र्याचा हक्क कलम १९ ते २२ | शोषणाविरुद्धचा हक्क कलम २३ ते २४ | धर्मस्वातंत्र्याचा हक्क कलम २५ ते २८ | सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क कलम २९ ते ३० | संविधानिक किंवा घटनात्मक उपाय योजनेचा हक्क कलम ३२ |

## ४.२.३ समतेचा हक्क (Right to Equality):

भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्कांच्या यादीमध्ये पहिलाच मूलभूत हक्क समतेचा हक्क आहे.

**समतेच्या हक्काचे महत्त्व :**

समान संधी व दर्जा असल्याशिवाय समाजातील प्रत्येक व्यक्तीला विकास करणे शक्य नसते. लोकशाही व्यवस्था प्रस्थापित होण्यास समतेचा हक्क असणे अतिशय महत्त्वाचे आहे. या हक्कांशिवाय इतर हक्कांना काहीच अर्थ उरत नाही. राज्यघटनेच्या कलम १४ ते १८ या कलमांमध्ये या हक्कांचा समावेश आहे.

**समतेच्या हक्काच्या पाच बाजू (Five Aspects) आहेत.**

| कलम १४ | कलम १५ | कलम १६ | कलम १७ | कलम १८ |
|---|---|---|---|---|
| कायद्यापुढे समता | सार्वजनिक स्थळी भेदभाव नाही | समान संधी व दर्जा | अस्पृश्यता पाळणे गुन्हा | पदव्यांचे संपुष्टीकरण |
| equality before law | No discrimination at Public Places | (equal status and opportunity) | | |

### १) **कायद्यापुढे समता (Equality before law) :**

समतेच्या हक्कांची पहिली बाजू म्हणजे कायद्यापुढे समता होय. सर्व नागरिकांना कायद्याचे समान संरक्षण होय. कायद्यापुढे जात, धर्म, लिंग, इत्यादी आधारावर भेदभाव करण्यात येणार नाही. याचाच अर्थ कायद्याची सर्वोच्चता असेल. कायद्यापुढे श्रेष्ठ, कनिष्ठ असा भेदभाव असणार नाही. कायद्यापुढे सर्व नागरिकांना समाज वागविण्यात येईल.

**अपवाद :** राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, सभापती, पंतप्रधान यांना वेगळे स्थान काही बाबतीत असू शकेल.

### २) **सार्वजनिक स्थळी भेदभाव नाही (No discrimination at Public Places) :**

कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी उदा. स्टेशन, करमणूकीची जागा, विहीर, तलाव, रस्ता इत्यादी ठिकाणी धर्म, जात, लिंग, स्थान यावरून भेदभाव करण्यात येणार नाही.

**अपवाद :** सामाजिक व आर्थिक दृष्टीने मागासलेल्या वर्गांसाठी, स्त्रियांसाठी, लहानमुलांसाठी विशेष तरतूदी राज्य करू शकते.

### ३) **समान संधी व दर्जा (equal status and opportunity) :**

राज्यातील सरकारी नोकऱ्यांमध्ये नोकरीची समान संधी सर्व नागरिकांना देण्यात येईल. कोणत्याही पदावर नेमताना धर्म, जात, लिंग इत्यादी कारणांवरून भेद केला जाणार नाही.

**अपवाद :-** मागासलेल्या जाती जमातींच्यासाठी सरकारी नोकरीत पुरेसे प्रतिनिधीत्व देण्यासाठी राज्याला काही जागा राखून ठेवता येतात.

### ४) **अस्पृश्यता निवारण (Abolition of Untouchability) :**

अस्पृश्यता पाळणे कायद्याप्रमाणे गुन्हा मानला जातो. अस्पृश्यतेचे पालन करणारी व्यक्ती शिक्षेस पात्र ठरते. १९५५ साली अस्पृश्यता निवारण कायदा करण्यात आला आहे. या कायद्याप्रमाणे कोणत्याही व्यक्तीला अस्पृश्य म्हणून शाळा, दवाखाना किंवा इतर ठिकाणी प्रवेश नाकारता येणार नाही. अस्पृश्य व्यक्तीचा अपमान करणे, कनिष्ठप्रतीची वागणूक देणे, अस्पृश्यतेचे समर्थन करणे गुन्हा आहे.

### ५) **पदव्यांची समाप्ती (Abolition of Titles) :**

पूर्वी सरकारतर्फे रावसाहेब, रावबहादूर इत्यादी पदव्या दिल्या जात. पदवी बरोबरच त्या व्यक्तीला विशेष अधिकार देण्यात येत. त्यामुळे सामाजिक विषमता आणि भेदभाव निर्माण झाला होता. असा भेदभाव नष्ट करण्यासाठीच पदव्या देणे कायद्याने बंद केले आहे. आता शैक्षणिक व सैनिक क्षेत्रातील विशेष कामगिरीसाठी पदव्या देण्यात येतात पण त्यामुळे त्या व्यक्तीला विशेष अधिकार प्राप्त होत नाहीत.

**सारांश :** भारतातील जातीभेद, लिंगभेद इत्यादी मानवनिर्मित विषमता नष्ट करणे आणि राज्यात, समाजात समता स्थापित करणे हे या हक्कांचे मुख्य उद्दिष्ट आहे.

## ४.२.४ स्वातंत्र्याचा हक्क (Right to Freedom):

भारतीय राज्यघटनेतील दुसरा महत्त्वाचा हक्क म्हणजे स्वातंत्र्याचा हक्क होय.

**स्वातंत्र्याच्या हक्काचे महत्त्व :**

व्यक्तिगत स्वातंत्र्य हा लोकशाहीचा आधार आहे. हा हक्क सर्व हक्कांचा आत्मा आहे. या हक्कांशिवाय व्यक्तिचा विकास होणे शक्यच नाही. भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ ते २२ मध्ये या हक्कांचा विचार करण्यात आला आहे.

स्वातंत्र्याच्या हक्कांच्या विविध बाजू खालील प्रमाणे आहेत :-

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| कलम १९ नुसार खालील प्रकारचे स्वातंत्र्य भारतीय नागरिकाला प्राप्त झाले.<br>१) भाषण आणि विचार स्वातंत्र्य (Freedom of Speech & expression)<br>२) सभा भरविण्याचे स्वातंत्र्य (To Assemble Peacefully)<br>३) संस्था आणि संघ स्थापन करण्याचे (To form Associations or Unions)<br>४) संचार स्वातंत्र्य (Freedom of Movement)<br>५) भारताच्या कोणत्याही भागात वास्तव्य करण्याचे, स्थायी होण्याचे स्वातंत्र्य (To reside and settle in any Part of the Indian territory)<br>६) कोणताही व्यवसाय व व्यापार करण्याचे (To Practise any profession, trade or business) | कलम २० अपराधी व्यक्तीला दोष सिद्ध करण्याचे स्वातंत्र्य (Protection in respect of conviction for offences) | कलम २१ जीवित स्वातंत्र्य (Protection of life) | कलम २२ बेकायदेशीर अटकेबाबत (Protection against Arrest & Detention) |

**स्वातंत्र्याच्या हक्कांच्या बाजू :**

**स्वातंत्र्याच्या हक्काची पहिली बाजू :** कलम १९ प्रमाणे भारतातील प्रत्येक नागरिकाला ६ प्रकारचे स्वातंत्र्य आहे.
१) भाषणस्वातंत्र्य आणि विचारस्वातंत्र्य.
२) सभा घेण्याचे स्वातंत्र्य.
३) संस्था आणि संघ स्थापन करण्याचे स्वातंत्र्य.
४) संचार स्वातंत्र्य.
५) स्थायी होण्याचे वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य.
६) कोणताही व्यापार व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य.

या प्रत्येक स्वातंत्र्यावर काही मर्यादीत बंधने आहेत. अमर्यादीत स्वातंत्र्यामुळे अराजकता निर्माण होण्याचा धोका असतो. म्हणून स्वातंत्र्याच्या हक्कांवर काही बंधने घालण्यात आली आहेत.

१) **भाषण आणि विचार स्वातंत्र्य:** भाषण आणि विचार स्वातंत्र्यामध्येच मुद्रणस्वातंत्र्याचा हक्क अंतर्भुत आहे. या हक्कांवर खालील मर्यादा आहेत. राज्याचे संरक्षण, परराज्याशी असलेले मित्रत्त्वाचे संबंध, सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था ह्यांना बाधा आणणारे आणि भारताची एकात्मता, सभ्यता, नीतीमत्ता, कोर्टाचा अवमान करणाऱ्या, कोणाची बदनामी करणाऱ्या, गुन्ह्यास उत्तेजन देणाऱ्या भाषणांवर व विचारस्वातंत्र्यावर बंधने आहेत. कायदा करून 'योग्य ती बंधने' घालण्याचा अधिकार शासनाला आहे.

२) **सभा घेण्याचे स्वातंत्र्य:** शांततापूर्वक परंतु शस्त्राशिवाय सभा भरविण्याचे स्वातंत्र्य प्रत्येक नागरिकाला आहे. मिरवणुका व संमेलने नागरिकांना भरविता येतात. परंतु या हक्कावर भारताची एकात्मता, सार्वभौमत्त्व, सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी योग्य ती बंधने सरकार घालू शकते.

३) **संस्था आणि संघ स्थापन करण्याचा हक्क :** संस्था आणि संघ स्थापन करण्याचा हक्क भारतीय नागरिकांना आहे. त्यामुळे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्वरूपाच्या संघटना स्थापन करता येतात. परंतु एखाद्या संघ व संस्थेद्वारे सार्वजनिक शांततेला धोका उत्पन्न होत असेल किंवा भारताची एकात्मता, ऐक्य ह्यांना बाधा निर्माण होत असेल तर तो संघ अथवा संस्था बेकायदेशीर घोषित करण्याचा सरकारला हक्क आहे. उदा. १९७५ च्या आणीबाणीच्या काळी तत्कालीन शासनाने राष्ट्रीय स्वंयसेवक संघ (RSS) व इतर संस्था व संघटनांवर सार्वजनिक शांततेला धोका निर्माण करणारे म्हणून बंदी घातली होती.

४) **संचार स्वातंत्र्य :** भारतीय प्रदेशात सर्वत्र संचार करण्याचे स्वातंत्र्य आहे. परंतु हा हक्क अमर्यादित नाही. लोकहिताच्या आणि मागासलेल्या जातींच्या हिताच्या दृष्टीने योग्य ती बंधने सरकारला घालता येतात. कायद्याने स्थानबद्ध केलेल्या व्यक्तींचे संचारस्वातंत्र्य नष्ट होते. सरकारने 'सुरक्षित' म्हणून घोषित केलेल्या जागी सरकारच्या परवानगीशिवाय संचार करता येत नाही.

५) **स्थायी होण्याचे, वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य:** भारताच्या कोणत्याही भागात वास्तव्य करण्याचे आणि स्थायी होण्याचे स्वातंत्र्य आहे. परंतु सार्वजनिक हितासाठी या स्वातंत्र्यावर सरकार बंधने घालू शकेल.

६) **व्यवसाय स्वातंत्र्य :** कोणताही धंदा, व्यवसाय किंवा व्यापार करण्याचे स्वातंत्र्य नागरिकांना आहे. एखादा व्यवसाय करण्यासाठी विशिष्ट पात्रतेची अट सरकार घालू शकेल. एखादा व्यवसाय अंशतः अथवा पूर्णतः स्वतःकडे घेण्याचा अधिकार सरकारला आहे.

**व्यक्तिस्वातंत्र्याची हमी :**

घटनेच्या २०, २१ आणि २२ व्या कलमाप्रमाणे वरील १९ व्या कलमातील व्यक्तिस्वातंत्र्याची हमी देण्यात आली आहे.

**स्वातंत्र्याची हक्काची दुसरी बाजू :**

कलम २० - अपराधी व्यक्तिला दोष सिद्ध करण्याबाबत संरक्षण देण्यात आले आहे.

१) जो पर्यंत कायद्यानुसार एखाद्याने गुन्हा केला आहे असे सिद्ध होत नाही, तोपर्यंत त्या व्यक्तीला अपराधासाठी शिक्षा देता येत नाही.
२) एकाच गुन्ह्यासाठी एकापेक्षा जास्त शिक्षा दिली जाणार नाही.
३) कायद्याने सांगितलेल्या शिक्षेपेक्षा जास्त शिक्षा व्यक्तीला देता येत नाही.
४) स्वतःविरुद्ध साक्ष देण्यासाठी एखाद्याला भाग पडले जाणार नाही किंवा सक्ती केली जाऊ शकत नाही.

**तिसरी बाजू :** स्वातंत्र्याच्या हक्काची तिसरी बाजू म्हणजे जीवित स्वातंत्र्य होय.

कलम २१ - व्यक्तीच्या जीवित स्वातंत्र्याचे संरक्षण (Protection of life) देणारे आहे. कोणत्याही व्यक्तीचे जीवनस्वातंत्र्य अथवा वैयक्तिक स्वातंत्र्य कायद्याने ठरवून दिलेल्या पद्धतीशिवाय अन्य तऱ्हेने हिरावून घेतले जाणार नाही.

**चौथी बाजू :** कलम २२ - बेकायदेशीर अटकेपासून संरक्षण (Protection against Arrest and Detention) देण्यात आले आहे.

१) अटक झालेल्या व्यक्तीस, कोणत्या कारणांसाठी अटक झाली आहे हे जाणून घेण्याचा अधिकार आहे.
२) स्वतःच्या पसंतीनुसार वकीलाचा सल्ला घेऊन त्यांच्यामार्फत आपला बचाव करण्याचे स्वातंत्र्य व्यक्तीला आहे.
३) एखाद्या व्यक्तीला अटक केल्यानंतर चोवीस तासाच्या आत न्यायालयात हजर करणे आवश्यक असते. न्यायधीशाच्या परवानगीशिवाय अधिक काळ व्यक्तीला स्थानबद्धतेत ठेवता येत नाही.

परंतु प्रतिबंधकस्थानबद्धता कायद्यानुसार अटक झालेल्या व्यक्तीला वरील नियम लागू होत नाहीत.

**प्रतिबंधक स्थानबद्धता कायदा (Preventive Detention Act) :**

१९५० साली हा कायदा पास झाला. भारताच्या सुरक्षिततेला धोका उत्पन्न करणाऱ्या, राज्याशी शांतता आणि सुरक्षितता बाधा आणणाऱ्या, देशाच्या आवश्यक सेवांना विरोध करणाऱ्या

व्यक्तिंना ह्या कायद्यनुसार स्थानबद्ध करता येते. स्थानबद्ध केलेल्या व्यक्तिला कोणत्या कारणासाठी स्थानबद्ध केले ते सांगण्याचे बंधन सरकारवर नाही.

**उद्देश :**

व्यक्तीला एखाद्या गुन्ह्यासाठी शिक्षा देणे हा या कायद्याचा उद्देश नाही तर व्यक्तीला गुन्ह्यापासून प्रतिबंध करणे (To prevent from crime) हा उद्देश या कायद्याचा आहे.

ह्या कायद्याखाली अटक केलेल्या व्यक्तीला तीन महिन्यांपेक्षा जास्त काळासाठी स्थानबद्ध करता येत नाही.

**टीका :**

हा कायदा व्यक्तीस्वातंत्र्याला बाधक आहे. विरोधकांना नेस्तनाबूत करण्यासाठी या कायद्याचा उपयोग सत्ताधारी करू शकतात असे टिकाकारांचे मत आहे.

**समर्थन :**

भारतामध्ये फुटीर प्रवृत्तींना पायबंद घालण्याच्या दृष्टीने आणि भारताची एकता व स्वातंत्र्य राखण्याच्या दृष्टीने हा कायदा योग्य आहे. ह्या कायद्यामध्ये १९७१ साली (MISA मिसा) 'अंतर्गत सुरक्षा कायदा' १९८५ साठी (TADA टाडा) 'टेररीस्ट ॲन्ड डिसक्रीपटीव्ह ॲक्टीव्हिटीज ॲक्ट' याप्रमाणे बदल करण्यात आले होते.

**शोषणाविरूद्ध हक्क (Right against Expolitation)**

या हक्काच्या दोन बाजू आहेत.

१ — कलम २३
मानवाच्या क्रमविक्रयास बंदी

२ — कलम २४
१४ वर्षांच्या आतील मुलांना धोक्याच्या ठिकाणी कामास नेण्याची बंदी

**महत्त्व :**

भारतामध्ये फार पूर्वीपासून वेठबिगारी, देवदासी पद्धती होती. जमीनदारांचे नियंत्रण मजूर वर्गावर होते. मागासलेल्या जाती, स्त्रिया यांचे शोषण होत होते. अशा प्रकारचे शोषण बंद करण्यासाठी हा हक्क देण्यात आला आहे.

**हक्कांच्या बाजू :**

१) कलम २३ प्रमाणे माणसांची विक्री, वेठबिगारी, जबरदस्तीने काम करून घेणे, इत्यादीला प्रतिबंध आहे. या कलमाचे उल्लंघन करणाऱ्याला कायद्यानुसार शिक्षा आहे.

२) कलम २४ प्रमाणे १४ वर्षाच्या आतील मुलामुलींना खाणी किंवा धोक्याच्या ठिकाणी काम करण्यास बंदी आहे.

**मर्यादा :**

सार्वजनिक हिताच्या दृष्टीने विशिष्ठ परिस्थितीमध्ये सरकार लोकांकडून सक्तीने काम करून घेऊ शकतात. उदा. लष्करात भरती होण्यास सक्ती करणे.

### ४.२.५ धार्मिकस्वातंत्र्याचा हक्क (Right to freedom of Religion) :

धार्मिकस्वातंत्र्याच्या विविध बाजू

- कलम २५ – स्वमतानुसार कोणताही धर्म स्वीकारण्याचा, त्याप्रमाणे आचार प्रचार, उपासना, करण्याचे स्वातंत्र्य आहे.
- कलम २६ – धर्मसंस्था स्थापन करण्याचे स्वातंत्र्य
- कलम २७ – कोणत्याही धर्मांच्या प्रचारासाठी सक्तीने पैसा गोळा करण्यावर बंदी
- कलम २८ – शिक्षणसंस्थांमध्ये धार्मिक शिक्षण देण्यावर बंदी

**धार्मिकस्वातंत्र्यावर मर्यादा :**

१) हे स्वातंत्र्य सार्वजनिक सुव्यवस्था, नीती, आरोग्य याच्या आड येता कामा नये.

२) समाजसुधारणा करण्यासाठी आणि समाजविघातक कृत्यांना आळा घालण्यासाठी सरकार वाईट प्रथांवर बंदी घालू शकते.

**धार्मिकस्वातंत्र्याचे महत्त्व :**

भारत अनेक धर्मियांचा देश असल्यामुळे सर्व नागरिकांना धर्मस्वातंत्र्य देण्यात आले आहे. त्यामुळे सर्वच धर्मिय लोकांमध्ये सुरक्षिततेची व ऐक्याची भावना निर्माण होण्यास मदत झाली आहे. या हक्कामुळे भारतात धर्मनिरपेक्ष राज्याची स्थापना झालेली आहे.

### सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क
### (Cultural and Educational Rights)

या हक्काच्या बाजू

- कलम २९ – भारतातील प्रत्येक नागरिकाला स्वतःची भाषा, लीपी व संस्कृती ह्यांची जोपासना करण्याचा हक्क आहे.
- कलम ३० – या कलमाप्रमाणे भाषिक व धार्मिक अल्पसंख्यकांना शिक्षणसंस्था स्थापन करण्याचा व चालविण्याचा हक्क आहे. अशा संस्थामध्ये अल्प संख्यकांना त्यांच्या स्वतःच्या भाषेतून शिक्षण देण्याचा अधिकार आहे. अशा शिक्षणसंस्थांना अनुदान देतेवेळी राज्य कसलाही भेदभाव करणार नाही अशी तरतूद करण्यात आली आहे.

**या हक्काचे महत्त्व :**

भारतात अल्पसंख्यकांना संरक्षण मिळावे, त्यांना त्यांच्या संस्कृतीचे रक्षण करता यावे म्हणून हा हक्क देण्यात आला आहे. या हक्कामुळे अल्पसंख्यकांना न्याय तर मिळालाच त्याशिवाय भारतात 'विविधतेतून एकता' निर्माण होण्यास मदत झाली आहे.

### **४.२.६ घटनात्मक उपायांचा हक्क (Right to Constitutional Remedies) :-**

**महत्त्व :**

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२ प्रमाणे मूलभूत हक्कांचे संरक्षण करणारा घटनात्मक उपायांचा हक्क देण्यात आला आहे. हक्कांना संरक्षणात्मक हमी नसेल तर अर्थ उरत नाही. मूलभूत हक्कांवर आक्रमण झाले तर घटनात्मक उपाययोजनेच्या हक्काप्रमाणे नागरिक सर्वोच्च आणि उच्च न्यायालयात दाद मागू शकतात हा हक्क आपल्या राज्यघटनेचा आत्मा व हृदय आहे. मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासाठी नागरिकाला न्यायालयाकडे पाच प्रकारचे अर्ज करता येतात. हे अर्ज खालीलप्रमाणे आहेत.

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| बंदी प्रत्यक्षीकरण | परमादेश | प्रतिषेद | अधिकारपृच्छा | उत्प्रेक्षण |
| Hebeas Cropus | Mandamus | Prohibition | Quo - Warranto | Certiorari |
| बेकायदेशीर अटकेविरुद्ध संरक्षण | कर्तव्ये करण्यास भाग पडणारा आदेश देणे. | वरिष्ठ न्यायालय कनिष्ठ न्यायालयाला आदेश देतात. | बेकायदेशीर पदग्रहणाला आव्हानात्मक विचारणा | न्यायालयाचा आदेश |

१) **बंदी प्रत्यक्षीकरण :**

एखाद्या व्यक्तीला बेकायदेशीर अटक झाली असेल किंवा अन्यायपूर्वक दंड झाला असेल तर, अटकेचे कारण विचारण्यासाठी त्या व्यक्तीला अगर तिच्या नातेवाईकांना न्यायालयाकडे अर्ज करता येतो. अटक झालेल्या व्यक्तीस न्यायालयापुढे हजर करावे असा आदेश न्यायालय देते. त्यानंतर न्यायालय त्या व्यक्तीवर झालेल्या अन्यायाशी चौकशी करते. अटक बेकायदेशीर आहे असे सिद्ध झाल्यास त्या व्यक्तीची तात्काळ सुटका करावी असा आदेश न्यायालय देते. या तरतूदीमुळे कोणत्याही व्यक्तीला सरकार अगर कोणतीही संस्था बेकायदेशीररित्या अटकेत ठेवू शकत नाही.

२) **परमादेश (Madamus) :**

आम्ही आज्ञा देतो असा त्याचा अर्थ आहे. शासन किंवा एखादी व्यक्ती, संस्था आपल्या कर्तव्याचे पालन करीत नसल्यामुळे एखाद्यावर अन्याय होत असेल तर; तो अन्यास दूर व्हावा म्हणून न्यायालयाकडे हा अर्ज करता येतो. न्यायालय चौकशी करून त्याप्रमाणे ताबडतोब अन्याय नाहीसा करावा असा आदेश देते. उदा. फॅक्टरी ॲक्ट प्रमाणे कायद्यानुसार मजुराला नुकसान भरपाई द्यावी लागते. ती देण्याची टाळाटाळ मालक करीत असेल तर असा अर्ज न्यायालयाकडे करता येतो.

### ३) **प्रतिषेद** (**Prohibition**) :

उच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाला एखादा खटला चालविण्यास मनाई हुकूम देणे म्हणजे प्रतिषेद होय. कनिष्ठ न्यायालयाला एखादा खटला चालविण्याचा कायदेशीर अधिकार नसेल तर त्या खटल्याची सुनावणी स्थगित करण्यासाठी उच्च न्यायालयाकडे असा अर्ज करता येतो.

### ४) **अधिकारपृच्छा** (**Quo - Warranto**) :

बेकायदेशीर पदग्रहणाला आव्हानात्मक विचारणा करण्याचा हक्क या अर्जामुळे प्राप्त होतो. कोणतेही सरकारी किंवा सार्वजनिक पद पात्रता नसतांना जर कोणी व्यक्ती ते पद भूषवित असेल तर त्या व्यक्तीच्या पदग्रहणाला विचारणा करण्याचा अधिकार व्यक्तीला आहे. परंतु ज्या पदाच्या बाबतीत वाद असेल त्या पदाशी त्या व्यक्तीचे हितसंबंध गुंतलेले असावे. न्यायालयाने अर्ज मान्य केल्यास बेकायदेशीरपणे पद धारण करणाऱ्या व्यक्तीला ते पद सोडण्याची न्यायालय आज्ञा देते.

### ५) **उत्प्रेक्षण** (**Certiorari**) :

कनिष्ठ न्यायालयाकडे चालणारा खटला वरिष्ठ न्यायालयाने चालवावा अशी विनंती करणारा अर्ज म्हणजे उत्प्रेक्षण होय. या पाच प्रकारच्या अर्जाद्वारे कोणतीही व्यक्ती मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी न्यायालयात जाऊ शकते.

## ४.२.७ मालमत्तेचा किंवा संपत्तीचा हक्क (Right to Property) :

घटनेच्या ३१ व्या कलमाप्रमाणे भारतीय नागरिकांना संपत्तीचा हक्क होता. शासनाने या कलमांमध्ये अनेकदा दुरुस्त्या केल्या आणि या हक्कांवर मर्यादा टाकल्या होत्या. १९७८ साली ४४ व्या घटनादुरुस्ती कायद्याप्रमाणे हा हक्क मूलभूत हक्कातून काढून टाकण्यात आला. आता या हक्काला कायदेशीर हक्काचे स्वरूप देण्यात आले. सामाजिक न्याय आणि आर्थिक समता आणणे या उद्दिष्टांच्या आड हा हक्क येतो असे शासनाचे मत होते.

## ४.२.८ मूलभूत हक्कांचे मूल्यमापन (Evaluation of Fundamental Rights):

१) मूलभूत हक्कांच्या यादी वरून भारतातील मूलभूत हक्कांच्या स्वरूपाची कल्पना येते. भारतीय समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था आणि राज्यव्यवस्थेमध्ये समता, न्याय, मानवता आणण्याच्या दृष्टीने मूलभूत हक्कांचे स्वरूप व आशय आहे असे दिसते.

२) मूलभूत हक्क अनिर्बंध व अमर्यादित स्वरूपाचे नाहीत. समाजहित व देशहिताच्या दृष्टीने प्रत्येक हक्कावर मर्यादा आहेत.

३) हक्क स्थितीशील (Static) नाही तर गतीशील आहेत. देशाच्या बदलत्या परिस्थितीप्रमाणे मूलभूत हक्कविषयक तरतूदींमध्ये राज्यघटनेची मूलभूत चौकट न बदलता संसद त्यामध्ये दुरुस्ती करू शकते.

४) भारतीय घटनेने नागरिकांना फक्त हक्क दिले नाहीत तर, घटनात्मक उपाययोजना या हक्काद्वारे मूलभूत हक्कांची हमीही दिली आहे.

५) हक्कांचे स्वरुप सार्वजनिक आहे.  धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थान, वास्तव्य इत्यादी कारणांवरून भेद न करता प्रत्येक भारतीय नागरिकाला हक्क देण्यात आले आहेत.

६) आणीबाणीच्या काळात हे हक्क तहकूब केले जातात.

७) ५१ (अ) 'मूलभूत कर्तव्ये' समाविष्ट आहेत.  ही कर्तव्ये सर्वसाधारणपणे मूलभूत हक्कांच्या आड येत नाहीत.  परंतु एखाद्या हक्कांच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयात गेल्यास न्यायालय मूलभूत कर्तव्याच्या संदर्भात त्या हक्कांचा विचार करीत असते.

८) एखाद्या भागात मार्शल लॉ लागू केल्यास हक्क स्थगित होतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) मूलभूत हक्कांचा अर्थ सांगून समतेचा हक्क व त्यांचे महत्त्व विशद करा.
२) घटनात्मक उपाय योजनांच्या हक्कांची चर्चा करा.

## ४.३ राज्यनीतीची मार्गदर्शक तत्त्वे (Directive Principles of State Policy) :

भारतीय राज्यघटनेच्या ४ थ्या भागामध्ये कलम ३६ ते ५१ मध्ये या तत्त्वांचा समावेश आहे.

### ४.३.१ मार्गदर्शक तत्त्वांचा अर्थ :

शासन करतांना, कायदे करतांना, प्रशासकीय धोरणे व योजनांची अंमलबजावणी करतांना राज्यकर्त्यांना मार्गदर्शन करणारी तत्त्वे म्हणजे मार्गदर्शक तत्त्वे होय.

### ४.३.२ मार्गदर्शक तत्त्वांचे उद्दिष्ट :

१) कल्याणकारी राज्य निर्माण करणे :-  शांतता व सुव्यवस्था राखणारे पोलीस राज्य निर्माण करणे आणि त्यापुढे जाऊन लोकांना 'न्याय' देणारे, लोकांची सर्वांगीण प्रगती होण्यास आवश्यक परिस्थिती निर्माण करणारे राज्य निर्माण करणे मार्गदर्शक तत्त्वांचे उद्दिष्ट आहे.

२) आर्थिक आणि सामाजिक लोकशाही निर्माण करणे :-  राजकीय लोकशाही खऱ्या अर्थाने येण्यासाठी सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रामध्ये समता, न्याय, स्वातंत्र्य प्रस्थापित करणे आवश्यक असते.  अशी लोकशाही आणणे हे मार्गदर्शक तत्त्वांचे उद्दिष्ट आहे.

३) नागरिकांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारणे.

### ४.३.३ मार्गदर्शक तत्त्वांचे उगमस्थान (Sources of the Directive Principles) :

१) आयर्लंडच्या घटनेतून मार्गदर्शक तत्त्वांची कल्पना स्वीकारली आहे.

२) संयुक्त राष्ट्रसंघाचे मानवी अधिकारपत्र (Universal Charter of Human Rights) याचाही प्रभाव मार्गदर्शक तत्त्वांवर दिसून येते.

३) गांधी विचारांचा प्रभाव - ग्रामपंचायत, कुटीरउद्योग, नशाबंदी, शांतता व न्यायाचे धोरण इत्यादी. तरतूदींवर गांधीविचारांचा प्रभाव आहे.

४) १९३५ चा कायदा - ब्रिटिश सरकारतर्फे गव्हर्नर जनरलला जे सूचनापत्र असायचे त्याप्रमाणे सूचनात्मक स्वरूप या तत्त्वांचे आहे.

५) समाजवादी विचारसरणीचा प्रभाव

### ४.३.४ मार्गदर्शक तत्त्वांचे स्वरूप :

१) **नैतीक (Moral)**:- या तत्त्वांचे पालन करणे अथवा न करणे राज्याची नैतीक जबाबदारी आहे. राज्यकर्त्यांच्या इच्छेप्रमाणे या तत्त्वांची अंमलबजावणी होते.

२) **न्यायप्रविष्ठ नाही (Non-Justicible) :** राज्यकर्त्यांनी या तत्त्वांचे पालन केले नाही म्हणून त्यांच्यावर कोणतीही न्यायालयीन कारवाई करता येत नाही.

३) **आचरणसंहिता (Rule of Conduct) :** प्रशासक व राज्यकर्ते यांच्यादृष्टीने ही तत्त्वे म्हणजे 'अनुदेशपत्र' (Instrument of Instructions) आहेत. ही तत्त्वे राज्यकर्त्यांसाठी मूलभूत व महत्त्वाची कर्तव्ये आहेत. त्याकडे त्यांनी दुर्लक्ष केल्यास जनता निवडणूकीमध्ये त्यांना निवडून देत नाही. ही तत्त्वे म्हणजे राज्यकर्त्यांसाठी एकप्रकारे आचारसंहिता आहे.


४) **न्यायालयांसाठी आरसा :** न्यायालयाला या तत्त्वांच्या संदर्भात कायदेमंडळाच्या कायद्यांचा व कार्यकारी मंडळाच्या कृतीचा विचार न्याय देताना करावा लागतो.

५) **सर्वसमावेशक :** सत्ता कोणत्याही राजकीय पक्षाकडे असली तरी आणि त्या पक्षाची वैचारिक भूमिका व कार्यक्रम कोणताही असला तरी मार्गदर्शक तत्त्वांचा विचार सत्तेवर येणाऱ्यांना करावाच लागतो. कारण ते राज्याचे मौलिक सिद्धान्त आहेत.

### ४.३.५ मार्गदर्शक तत्त्वांचे वर्गीकरणः

**मार्गदर्शक तत्त्वांचे वर्गीकरण**

**(Classification of the Directive Principles)**




अभ्यासाच्या सोयीसाठी मार्गदर्शक तत्त्वांचे वर्गीकरण ४ भागात केले आहे.

१) **आर्थिक तत्त्वे :** आर्थिक स्वरुपाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये खालील तत्त्वांचा समावेश होतो.

अ) प्रत्येक भारतीय नागरिकाला उपजीविकेची साधने प्राप्त होतील अशी व्यवस्था सरकारने करावी.
ब) उत्पादनाची साधने व संपत्ती ह्यांचे विकेंद्रीकरण करावे.
क) प्रत्येक स्त्री - पुरुषाला समान कामासाठी समान वेतन दिले जावे.
ड) कामाच्या ठिकाणी न्याय आणि मानवी परिस्थिती निर्माण करणे. स्त्रियांना प्रसूती सहाय्य देण्याच्या दृष्टीने राज्याने योग्य ती व्यवस्था करावी.
इ) औद्योगिक संस्था, संघटना यांच्या व्यवस्थापनात कामगारांना सहभागी होता यावे यासाठी राज्य उपाययोजना करील.
ई) राज्य शेती व पशूसंवर्धन यांची योग्य व्यवस्था लावण्याचा प्रयत्न करील.
उ) पर्यावरणाचे संरक्षण व विकास आणि वनसंपत्ती व वन्य प्राण्यांचे रक्षण करण्याचा राज्य प्रयत्न करील.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३९, ४१, ४२, ४३, ४८ मध्ये आर्थिक स्वरूपाची मार्गदर्शक तत्त्वे नमूद केलेली आहेत.

२) **सामाजिक तत्त्वे :**

अ) १४ वर्षाखालील सर्व मुलांमुलीना मोफत व सक्तीचे शिक्षण द्यावे.
ब) आहार, पौष्टिकतेचा आणि राहणीमानाचा दर्जा उंचावणे व सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे राज्याचे कर्तव्य आहे.
क) राष्ट्रीय स्मारके, स्थाने आणि ऐतिहासिक वस्तूचे रक्षण करावे.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ४५, ४६, ४७ आणि ४९ मध्ये सामाजिक स्वरूपाची मार्गदर्शक तत्त्वे आहेत.

३) **राजकीय तत्त्वे :**

राज्यघटनेच्या कलम ४०, ४४, ५० व ५१ मध्ये राजकीय स्वरूपाची मार्गदर्शक तत्त्वे आहेत.

अ) राज्य ग्रामपंचायतीची स्थापना करून त्यांना आवश्यक ती सत्ता देईल.
ब) संपूर्ण भारतासाठी समान नागरी कायदा करण्याचा राज्य प्रयत्न करील.
क) न्यायमंडळाची कार्यकारी मंडळापासून फारकत.

४) **आंतरराष्ट्रीय तत्त्वे :**

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात राज्याने कोणती धोरणे स्वीकारावीत ते कलम ५१ मध्ये आहे. राज्यात आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता वाढविणे, राष्ट्राराष्ट्रांमध्ये न्याय व परस्परांविषयी आदरयुक्त संबंध राखणे.

## ४.३.६ मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी :

### आर्थिक स्वरूपाच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी :

पंचवार्षिक योजनाद्वारे देशाची आर्थिक प्रगती घडवून आणण्याच्या दृष्टीने राज्याने प्रयत्न केला आहे. मोठमोठे औद्योगिक प्रकल्प उभारले आहेत. स्वयंरोजगार, ग्रामोद्योगांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. देशातील संपत्तीचे केंद्रीकरण होऊ नये म्हणून शासनाने कूळकायदा, सावकारी नियंत्रण कायदा, जमीनदारी निर्मूलन कायदा केला. श्रीमंतावर प्राप्तीकर, संपत्तीकर लावला आहे. कामगारांचे कामाचे तास, वेतन, रजा, सुट्ट्या, निवृत्तीवेतन इत्यादीसारखी धोरणे व कायदे शासनाने केले आहेत. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांना कायद्याचा मोफत सल्ला मिळावा म्हणून शासनामार्फत सोय केली आहे.

### सामाजिक स्वरूपाच्या तत्त्वांची अंमलबजावणी :

१४ वर्षांखालील सर्व मुलामुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याच्या दृष्टीने शासनाने शाळा सुरू केलेल्या आहेत. प्रौढ शिक्षणयोजना राबविल्या. मागासलेल्या जातीच्या लोकांना शैक्षणिक फी माफी सवलत देण्यात येते. नोकऱ्यांमध्ये त्यांच्यासाठी राखीव जागा ठेवल्या आहेत. शासकीय रुग्णालये स्थापन केली.

### राजकीय स्वरूपाच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी :

पंचायतराज्यव्यवस्था प्रत्यक्षात आली. वारसा, दत्तक, विवाह, घटस्फोट इत्यादी बाबतीत हिंदूंच्या व्यक्तिगत कायद्यात सुधारणा केल्या आहेत. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता राहावी हे तत्त्व भारताने स्वीकारले आहे. वरीलप्रमाणे विविध कायदे व योजनांद्वारे शासनाने मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला.

### ४.३.७ मार्गदर्शकतत्त्वांच्या अंमलबजावणीत अडचणी :

१) आर्थिक अडचण. पैसा प्रत्येक योजना राबविण्यासाठी लागतो. अनेकदा आर्थिक अडचणींमुळे या तत्त्वांची अंमलबजावणी शक्य होत नाही. २) मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी शासनाने केलेले कायदे बरेचदा न्यायालयाने रद्द ठरविले आहेत. ही अडचण लक्षात घेऊन शासनाने ४२ वी घटनादुरुस्ती करून मूलभूत हक्कांपेक्षा मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीला शासन प्राधान्य देईल असे स्पष्ट केले. ३) शासन आणि प्रशासनातील लोकांमध्ये या तत्त्वांच्या अंमलबजावणीबाबतीत निष्ठा दिसून येत नाही.

### ४.३.८ मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वातील परस्पर संबंध :

मूलभूत हक्क नागरिकांना विविध प्रकारची स्वातंत्र्ये देतात. मार्गदर्शक तत्त्वे नागरिकांना स्वातंत्र्य उपभोगता यावे अशी परिस्थिती आणि वातावरण निर्माण करण्यास सहाय्य करतात. मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे यांचा घनिष्ठ संबंध आहे परंतु मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे एकमेकांच्या विरोधी आहेत काय ? दोन्ही एकमेकांना पूरक आहेत काय ? असे प्रश्न काही विचारवंत उपस्थित करतात. वास्तविकपणे मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे विषयक तरतूदी, एकत्रितरित्या, भारतीय राज्यघटनेचा आत्मा (Soul) आणि आधारभूत शीला (Cornerstone) आहेत. मूलभूत हक्कांमुळे नागरिकांना स्वातंत्र्याची हमी मिळते आणि मार्गदर्शक तत्त्वांमुळे हे स्वातंत्र्य उपभोगण्यास जी 'न्याय्य' परिस्थिती आवश्यक असते ती निर्माण होते. मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वांमुळे वैयक्तिक स्वातंत्र्य आणि सामन्यांचे हित दोन्हीचा मध्य साधला जातो. दोन्ही एकमेकांच्या विरोधी नाही तर एकमेकांना पूरक आहेत. परंतु दोन्हीच्या स्वरूपामध्ये भेद आहेत.

### ४.३.९ मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वांच्या स्वरूपात भेद :

| | मूलभूत हक्क | | मार्गदर्शक तत्त्वे |
|---|---|---|---|
| १) | निषेधात्मक स्वरुपाचे आहेत. (Negative) मूलभूत हक्कांमुळे सरकारच्या कृतीवर मर्यादा येतात. हक्कांना बाधा येईल असे शासनाने वागू नये हा अर्थ त्यात आहे. | १) | सकारात्मक (Positive) स्वरुपाचे आहेत. सरकारने अमूक गोष्टी कराव्या असा आदेश देणारे मार्गदर्शक तत्त्वांचे स्वरुप आहे. |
| २) | न्यायप्रविष्ठ (Justiciable) आहेत. मूलभूत हक्कांवर अतिक्रमण झाल्यास त्या विरुद्ध न्याय मागण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे. त्यासाठी नागरिक न्यायालयाकडे जाऊ शकतात. | २) | न्यायप्रविष्ठ नाहीत (Non-Justiciable) शासनाने या तत्त्वांचे पालन केले नाही तर त्यासाठी शासनाला कुणीही न्यायालयात खेचू शकत नाही. |
| ३) | मूलभूत हक्क मर्यादित आहेत. (Limited) नागरी स्वातंत्र्य उपलब्ध करुन देणे एवढेच त्यांचे स्वरुप आहे. | ३) | मार्गदर्शक तत्त्वांचे स्वरुप (awider) व्यापक आहे. समाजहिताचा, स्वातंत्र्य, समता, न्याय व्यक्तिची प्रतिष्ठा इत्यादी सर्वांचा विचार या तत्त्वात आहे. |
| ४) | मूलभूत हक्कांची अंमलबजावणी करणे राज्याची कायदेशीर जबाबदारी आहे. (Legal responsibility) | ४) | मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करणे शासनाची नैतीक जबाबदारी आहे. (Moral responsibility) |
| ५) | मूलभूत हक्कांचे उद्दिष्ट लोकशाही राज्य (democractic state) निर्माण करणे आहे. | ५) | मार्गदर्शक तत्त्वांचे उद्दिष्ट कल्याणकारी राज्य निर्माण करणे आहे. (Welfare state) |

| | | | |
|---|---|---|---|
| ६) | मूलभूत हक्क आणीबाणीच्या परिस्थितीत स्थगित होतात. | ६) | मार्गदर्शक तत्त्वे आणीबाणीच्या परिस्थितीत स्थगित होत नाहीत. |
| ७) | मूलभूत हक्कांपेक्षा मार्गदर्शक तत्त्वांना अधिक प्राधान्य. मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीमुळे मूलभूत हक्कांवर उदा. कलम १४, १९, ३१ समता, स्वातंत्र्य, संपत्तीचा हक्क व कायद्यांना न्यायालयात आव्हान करता येणार नाही असे घटना दुरुस्ती स्पष्ट करण्यात आले आहे. | ७) | मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीस अधिक प्राधान्य वास्तवात देण्यात येते. |
| ८) | मूलभूत हक्कांचा संबंध नागरिकांशी आहे. | ८) | मार्गदर्शक तत्त्वांचा संबंध शासनाशी व राज्याशी आहे. |

## ४.४ सारांश

मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे दोन्हीच्या स्वरूपात फरक असला तरी दोघांचे ध्येय एकच आहे. भारतीय लोकशाहीच्या यशस्वीततेसाठी दोन्हींची गरज आहे.

## ४.५ प्रश्न :

१) भारतीय राज्यघटनेमध्ये समाविष्ठ 'मूलभूत हक्कां'ची माहिती द्या.
२) समतेचा आणि स्वातंत्र्याचा हक्क सविस्तर स्पष्ठ करा.
३) मार्गदर्शक तत्त्वे यावर सविस्तर चर्चा करा.
४) मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे परस्पर साम्यभेदांचे विवेचन करा.
५) टिपा लिहा :- १) मूलभूत कर्तव्ये
२) घटनात्मक उपाययोजनेचा हक्क
३) मार्गदर्शक तत्त्वे

❖❖❖❖

# ५

# संस्था-संरचना अधिकार व कार्यवाही

## (Institutions Structure, Powers & Functioning)

## संसद

**प्रकरणाची रचना :**

५.० उद्दिष्टे
५.१ प्रस्तावना
५.२ संसदेची रचना
५.३ संसदेचे अधिकार आणि कार्ये
५.४ संसद सदस्यांचे विशेषधिकार
५.५ कायद्याची प्रक्रिया
५.६ सारांश
५.७ प्रश्न

### ५.० उद्दिष्टे

कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ या संसदीय लोकशाही शासन व्यवस्थेतील महत्त्वाच्या संस्था आहेत. भारतीय संसदीय शासन व्यवस्थेतही त्यांना आधारभूत घटक मानलेल्या आहेत. या तीनही संस्था आपापल्या क्षेत्रात स्वतंत्र आहेत तरीही त्या परस्पर सबधांत आहेत. संसदीय लोकशाही शासन व्यवस्थेत कार्यकारीमंडळ कायदेमंडळाला जबाबदार असते तर कायदेमंडळाने केलेल्या कायद्याची घटनात्मकता तपासून बघण्याचा (पुनर्विलोकनाचा) अधिकार न्यायालयाला आहे. असे असूनही कोणत्याही संस्थेने दुसऱ्या संस्थेच्या अधिकार क्षेत्रात हस्तक्षेप करु नये अशी अपेक्षा असते. या तीन संस्थांच्या कार्यवाहीवरच संसदीय लोकशाही शासन व्यवस्थेचे यशापयश अवलंबून असते. म्हणून भारतीय संसदेची रचना, अधिकार, कार्ये समजून घेणे हे या प्रकरणाचे उद्दिष्ट आहे.

### ५.१ प्रस्तावना

शासनाच्या कायदे करण्याऱ्या शाखेला म्हणजेच केंद्रीय कायदेमंडळाला 'संसद' (Parliament) म्हणतात. भारतीय संसद ब्रिटिश पार्लमेंटप्रमाणे सार्वभौम नाही. भारतीय राज्यघटनेच्या मर्यादेतच संसदेला कार्य करावे लागते. भारतात सांसदीय शासनपद्धती असल्यामुळे कायदेमंडळ आणि कार्यकारीमंडळ यांचा घनिष्ठ संबंध आहे.

## ५.२ संसदेची रचना

भारतीय राज्यघटनेच्या भाग पाचमधील कलम ७९ ते १२२ मध्ये संसदेसंबंधीच्या तरतूदी करण्यात आल्या आहेत. संसदेची रचना खालीलप्रमाणे आहे :

**संसदेची रचना**

**(Composition of Parliament)**

- राष्ट्रपती
- लोकसभा
- राज्यसभा

संसदेची द्विगृही रचना करण्यात आली आहे. संसदेमध्ये राष्ट्रपती, राज्यसभा आणि लोकसभा या दोन सभागृहांचा समावेश होतो. भारताचे राष्ट्रपती संसदेचा अविभाज्य घटक आहेत. राष्ट्रपती संसदेचे सभासद नाही परंतु ते संसदेचे एक अविभाज्य अंग आहे. ते संसदेच्या कामकाजात भाग घेत नाहीत परंतु कोणतेही विधेयक राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीशिवाय कायदा होऊ शकत नाही. भारतीय संसद द्विगृही आहे. १) लोकसभा २) राज्यसभा या दोन गृहांचा संसदेमध्ये समावेश होतो.

### ५.२.१ लोकसभेची रचना (House of People)

**यात खालील मुद्दे येतात :**

- १ लोकसभेची सभासद संख्या
- २ सभासदांची निवड पद्धती
- ३ सभासदांची पात्रता
- ४ सभासदांचा कार्यकाल
- ५ लोकसभेचा पदाधिकारी

लोकसभा संसदेचे कनिष्ठ सभागृह आहे. लोकांचे प्रतिनिधीत्व करणारे गृह म्हणजे लोकसभा होय. लोकसभेतील सभासदांना 'खासदार' (M. P.) म्हणतात.

#### लोकसभेची सभासद संख्या

लोकसभेची एकूण सभासदसंख्या ५५२ आहे. राज्यघटनेच्या कलम १ प्रमाणे या सभागृहाची सदस्यसंख्या ५०० ठरविण्यात आली होती. परंतु १९७३ च्या कलम ३१ व्या घटनादुरुस्तीप्रमाणे लोकसभेची सदस्यसंख्या ५५० आणि अँग्लोइंडियन जमातीचे दोन प्रतिनिधी नियुक्त करण्याचा राष्ट्रपतींना अधिकार आहे. घटकराज्ये व केंद्रशासित प्रदेश यांच्यात लोकसंख्येच्या आधारे जागांचे वाटप करण्यात येते. घटकराज्याचे ५३०, केंद्रशासित प्रदेशांचे २० आणि अँग्लोइंडियन जमातीचे २ या प्रमाणे लोकसभेची सभासदसंख्या ५५२ आहे.

#### लोकसभेची निवडणूक

प्रत्यक्षपणे, प्रौढ मतदान पद्धतीने भारतीय नागरिकांकडून लोकसभेचे प्रतिनिधी निवडले जातात. ही निवडणूक गुप्तमतदान पद्धतीने होते. वयाची १८ वर्षे पूर्ण झालेला प्रत्येक भारतीय नागरिक मतदान करण्यास पात्र असतो. परंतु ज्या मतदारसंघातून तो मतदान करणार आहे त्या मतदार संघात त्याचे वास्तव्य आणि मतदारयादीत त्याचे नाव असावयास पाहिजे.

राज्यामध्ये प्रादेशिक मतदार-संघ लोकसभेच्या निवडणुकीसाठी ठरविण्यात येतात. प्रत्येक राज्याला राज्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देण्याच्या दृष्टीने हे मतदारसंघ ठरविले जातात. शक्यतो प्रत्येक मतदारसंघाची लोकसंख्या व तेथे दिल्या गेलेल्या लोकसभेच्या जागा यांचे प्रमाण सर्व राज्यांना समान राहील याची काळजी घेण्यात येते. लोकसंख्येच्या आधारे देशाची ५५० मतदारसंघात विभागणी करण्यात येते आणि प्रत्येक मतदारसंघातून एक प्रतिनिधी निवडण्यात येतो.

**लोकसभा सदस्यत्वासाठी पात्रता :** १) भारताचा नागरिक असावा. २) त्याचे वय २५ वर्षापेक्षा कमी नसावे. ३) शासकीय सेवेतील कर्मचारी, सरकारतर्फे आर्थिक लाभ प्राप्त करणाऱ्या व्यक्ती, न्यायालयाने गुन्हेगार ठरविलेल्या व्यक्ती निवडणूकीसाठी उभ्या राहू शकत नाहीत. ४) संसदेने वेळोवेळी लावलेल्या अटी पूर्ण कराव्या. ५) राखीव जागेतून निवडणूक लढविणारा उमेदवार हा ज्या जाती जमातीसाठी ती जागा राखीव असेल त्याच जातीजमातीचा असला पाहिजे.

**लोकसभेचा कार्यकाल :**

५ वर्षे आहे. १९७६ साली ४२ व्या घटनादुरुस्तीप्रमाणे हा कार्यकाल ६ वर्षे करण्यात आला होता. परंतु १९७९ मधील ४४ व्या घटनादुरुस्तीने हा कार्यकाल पुन्हा ५ वर्षे केला आहे. देशात आणीबाणीची परिस्थिती जाहीर केल्यास लोकसभेचा कार्यकाल एकावेळी एक वर्षासाठी वाढविला जातो.

**लोकसभेचा पदाधिकारी :**

लोकसभेचे अध्यक्षपद धारण करणाऱ्या व्यक्तीला सभापती (स्पीकर) म्हणतात. लोकसभा सदस्यांमधूनच सभापतीची निवड करण्यात येते. सभागृहाचे अधिवेशन चालू असतांना सभापती अध्यक्षस्थानी असतो.

**सभापतीची कार्ये :**

सभागृहात शांतता व शिस्तीचे वातावरण ठेवून सभागृहाची प्रतिष्ठा सांभाळणे हे त्यांचे मुख्य काम आहे. सभागृहाचे कामकाज पार पाडण्यासाठी शिस्तभंग करणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार सभापतीला आहेत. कार्यक्रम पत्रिकेनुसार सभागृहाचे कामकाज चालविणे, विधेयकावर चर्चा घडवून आणणे, ते मताला टाकून मतमोजणी करणे, स्वीकृत विधेयकावर स्वाक्षरी करून पुढील कारवाईसाठी ते विधेयक पाठविणे, प्रश्नोत्तराच्या तासाला सर्व सभासदांना बोलण्याची संधी देणे, गणसंख्या पूर्ण आहे की नाही ते पाहणे, दोन्ही सभागृहाच्या संयुक्त अधिवेशनाच्या वेळी अध्यक्षस्थान स्वीकारणे, सभागृहात खूपच गोंधळ झाल्यास सभागृहाचे कामकाज स्थगित करणे इत्यादी कार्ये सभापतींना करावी लागतात.

**सभापतीचे स्थान व भूमिका :**


सभासदांनी सभागृहात उपस्थित केलेल्या सूचना निकालात काढण्याचा सभापतीला अधिकार आहे व त्यावर सभापतीचा निर्णय अखेरचा असतो. सभापतींच्या निर्णयाला कोणत्याही न्यायलयात आव्हान देता येत नाही. सभापती स्वतः कामकाजात भाग घेत नाही. परंतु निर्णायक मत देण्याचा त्यांना अधिकार आहे.

भारतातील सभापतींचे पद इंग्लंडमधील सभापतींच्या धर्तीवर निर्माण केलेले आहे. इंग्लंडमध्ये सभापतीला आपले काम तटस्थपणे व निपक्षपातीपणे करता यावे यासाठी सभापतीची निवड एकमताने केली जाते. इंग्लंडमध्ये एखाद्या सदस्याची सभापती म्हणून निवड होताच तो सदस्य आपल्या पक्षाचा राजीनामा देतो. भारतात हे संकेत पाळले जात नाहीत.

### ५.२.२ राज्यसभा :

राज्यसभेची रचना खालीलप्रमाणे आहे :

राज्यसभेची रचना (Council of States)




**१)** राज्यसभा संसदेचे वरिष्ठ सभागृह आणि घटकराज्याचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह आहे.

### २) राज्यसभेची सभासदसंख्या :

२५० आहे. त्यापैकी २३८ सभासद घटकराज्यांकडून निवडून दिले असतात आणि १२ सभासद राष्ट्रपतींकडून नियुक्त केले जातात कला, साहित्य, समाजसेवा, विज्ञान इत्यादी क्षेत्रात नावाजलेल्या व्यक्तींची नियुक्ती राज्यसभेमध्ये राष्ट्रपती करतात. ज्या व्यक्ती सहसा निवडणूकीच्या राजकरणात पडत नाहीत. परंतु त्यांच्या ज्ञानाचा देशाला उपयोग व्हावा या हेतूने त्यांना राज्यसभेवर नेमले जाते.

### ३) राज्यसभेची निवडणूक :

राज्यसभेची निवडणूक अप्रत्यक्ष पद्धतीने होते. विधानसभा सदस्य राज्यसभेच्या सदस्यांची निवड करतात. राज्यसभेच्या सदस्यांच्या निवडणूकीसाठी प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या क्रमदेय मतदान पद्धतीचा अवलंब करण्यात येतो. कोणत्या घटकराज्याने किती प्रतिनिधींची राज्यसभेसाठी निवड करावयाची हे त्या राज्याच्या लोकसंख्येच्या आधारावर ठरविण्यात येते. उदा. उत्तरप्रदेश राज्याचे ३४ सदस्य, आसाम राज्याला ७ सदस्य, महाराष्ट्राला १९ सदस्य राज्यसभेसाठी निवडून देता येतात. अमेरिकेप्रमाणे प्रत्येक राज्याला समान प्रतिनिधीत्व भारतात देण्यात आले नाही.

### ४) राज्यसभेचा कार्यकाल :

राज्यसभा हे स्थायी सभागृह आहे. लोकसभेप्रमाणे राज्यसभा दर पाच वर्षाने बरखास्त होत नाही. राज्यसभेतील सभासद इंग्लंडचा लॉर्डस सभागृहातील सभासदांसारखे वांशिक किंवा आजन्म सभासद नसतात. अमेरिकेच्या सिनेटप्रमाणे सहा वर्षासाठी राज्यसभेच्या सभासदांना निवडून देण्यात येते. एकाचवेळी राज्यसभेच्या सर्व सभासदांचा कार्यकाल संपत नाही. दर दोन

वर्षांनी ज्या सभासदांचा सहा वर्षे कार्यकाल संपला असे १/३ सभासद निवृत्त होतात व त्यांचे जागी तेवढेच नवीन सभासद येतात. सभासद निवृत्त होतांना एकाचवेळी एकाच घटक राज्यातील सर्वच सभासद निवृत्त होत नाही. यामुळे जुन्या आणि नव्या सभासदांचा मेळ या सभागृहात असतो.

**राज्यसभा सदस्यत्वासाठी पात्रता :**

१) ती व्यक्ती भारताची नागरिक असावी. २) वय ३० वर्षांपेक्षा कमी नसावे. ३) संसदेने कायद्याद्वारे ठरविलेली पात्रता त्याच्याकडे असावी. उदा. उमेदवाराचे नाव संबंधित घटकराज्याच्या संसदीय मतदारसंघामध्ये असावे, सरकारी नोकर, शासकीय लाभांचे पद धारण करणारी व्यक्ती असू नये, न्यायालयाने दोषी ठरविलेली व्यक्ती सहा वर्षेपर्यंत अपात्र समजण्यात येते.

**राज्यसभेचा पदाधिकारी :**

भारताचे उपराष्ट्रपती राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. अमेरिकेतही उपराष्ट्रपती सिनेटचे अध्यक्ष असतात परंतु अमेरिकेतील उपराष्ट्रपतीप्रमाणे भारताचे उपराष्ट्रपती राज्यसभेचे सदस्य नसतात. सभागृहामध्ये शांतता पाळणे, चर्चा घडविणे इत्यादी कार्य ते करतात. राज्यसभा आपल्या सदस्यांमधूनच एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करते.

**आपली प्रगती तपासा :**

१) भारतीय संसदेची रचना स्पष्ट करा.

२) लोकसभेच्या सभापतीची कार्य व भूमिका विशद करा.

## ५.३ संसदेचे अधिकार व कार्ये (Functions of Parliament)

संसदेचे अधिकार व कार्ये खालीलप्रमाणे विभागात येतात.

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कायदे विषयक अधिकार (Legislative Powers) | मंत्रिमंडळ निर्मिती | कार्यकारी व प्रशासकीय अधिकार (Control of the cabinet & Adminis-trative Powers) | आर्थिक अधिकार (Financial Powers) | न्यायालयीन अधिकार (Judicial Powers) | घटनेविषयी (About constitution) | निवडणूक विषयक | लोकांचे प्रतिनिधीत्व करणे | आणीबाणी विषयक |

**५.३.१ कायदेविषयक अधिकार :** शासनाची कायदे करणारी शाखा म्हणजे कायदेमंडळ होय. कायदेमंडळाचे म्हणजेच संसदेचे मुख्य कार्य म्हणजे कायदे करणे होय.

संसदेला खालील विषयांच्या बाबतीत कायदे करण्याचा अधिकार आहे.

अ) केंद्रसूचीमध्ये समाविष्ट विषयांवर कायदे करण्याचा अधिकार संसदेला आहे.

ब) समवर्तीसूचीमध्ये असलेल्या विषयावर कायदे करण्याचा अधिकार संसद व राज्याच्या कायदेमंडळाला आहे. परंतु संसदेने केलेले कायदे घटकराज्याने त्याच विषयावर केलेल्या कायद्यांपेक्षा श्रेष्ठ मानले जातात.

क) राज्यसूचीतील विषयांवरही संसद पुढील परिस्थितीत कायदे करू शकते.

१) ज्यावेळी देशात आणीबाणी असते. २) राज्यसभेने २/३ बहुमताने ठराव पास करून तशी विनंती केल्यास ३) दोन किंवा अधिक घटकराज्यांच्या विधिमंडळांनी तशी इच्छा व्यक्त केल्यास ४) परराष्ट्राबरोबर केलेला करार किंवा तहाच्या कार्यवाहीसाठी आवश्यकता असेल तेव्हा संसद राज्यसूचीतील विषयांवरही कायदे करीत असते. कायदे करणे हे संसदेचे प्रमुख कार्य आहे. सर्वसामान्य विधेयक प्रथम संसदेच्या कोणत्याही सभागृहासमोर मांडतात. विधेयकाचे कायद्यात रूपांतर होण्यासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहांची संमती आवश्यक असते.

**५.३.२ मंत्रिमंडळ निर्मिती :** लोकसभेच्या निवडणूका झाल्यानंतर लोकसभेत बहुमत मिळालेल्या पक्षाला मंत्रिमंडळ निर्मिती करण्यास सांगितले जाते. मंत्रिमंडळ आणि पंतप्रधान म्हणजेच कार्यकारीमंडळ संसदेमधून त्यांची निर्मिती होते.

**५.३.३ कार्यकारी व प्रशासकीय अधिकार :** भारताच्या संसदीय शासनप्रणालीमध्ये संसदेचे हे कार्य अतिशय महत्त्वपूर्ण आहे. मंत्रिमंडळ लोकसभेचा विश्वास असेपर्यंतच अधिकारपदावर असतात. लोकसभा विविध मार्गाने मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवते. उदा. प्रश्न विचारणे, शासकीय धोरणांवर टीका करणे, कामरोको प्रस्ताव (Adjournment Motion) आणणे, सभागृहाबाहेर निघून जाणे, सभागृहात गोंधळ माजविणे, निंदाव्यंजक ठराव पास करणे, सरकारवर अविश्वास ठराव आणणे (No Confidence Motion) इत्यादी विविध मार्गाने मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवून लोकमत जागृत करणे हे संसदेचे कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. मंत्रिमंडळ संसदेला जबाबदार राहून कार्य करीत असते. खऱ्या अर्थाने जबाबदार शासनपद्धती आपण संसदेचे कार्य ठरते.

**५.३.४ आर्थिक अधिकार :** सर्वतऱ्हेच्या आर्थिक विधेयकांना संसदेची संमती आवश्यक असते. देशाच्या अर्थव्यवस्थेवर संसदेचे पूर्ण नियंत्रण असते. संसदेच्या संमतीशिवाय मंत्रिमंडळ एक पैसाही खर्च करू शकत नाही. खर्च नेमका कोणत्या कारणासाठी केला जातो, केला जातो किंवा नाही हे पाहण्याचा अधिकार संसदेला आहे. अंदाजसमिती, महालेखापाल यांच्याद्वारे संसद हा खर्च तपासते विविध करांची आकारणी आणि वसुली, पंचवार्षिक योजनांना मान्यता देणे, अंदाजपत्रक मंजूर करणे इत्यादी. कोणतेही धनविषयक विधेयक प्रथम

लोकसभेतच मांडण्यात येते. एखादे विधेयक धनविधेयक आहे की नाही हे ठरविण्याचा अधिकार लोकसभेच्या सभापतींना असतो.

**५.३.५ न्यायालयीन अधिकार :** राष्ट्रपती, सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे न्यायधीश, निवडणूक आयुक्त यांच्याबाबतीत चौकशी करण्याचा आणि त्यांना पदच्युत करण्याचा संसदेला अधिकार आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांनी तशातऱ्हेचा ठराव मंजूर करावा लागतो.

**५.३.६ घटनेविषयी :** राज्यघटनेच्या कलम ३६८ मध्ये विशद करण्यात आलेल्या पद्धतीनुसार राज्यघटनेत दुरुस्ती करण्याचा अधिकार संसदेस आहे. घटना दुरुस्तीबाबतचे विधेयक संसदेच्या कोणत्याही सभागृहात मांडले जाते. दोन्ही सभागृहाची स्वतंत्र मंजुरी त्यासाठी आवश्यक असते.

**५.३.७ निवडणूक विषयक :** राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतींची निवड करणे.

**५.३.८ लोकांचे प्रतिनिधीत्व :** लोकांच्या दुःखांना वाचा फोडणे. संसदेतील वादविवाद, प्रश्नउत्तरे, चर्चा, आरोपप्रत्यारोप इत्यादीमुळे लोकांना विविध विषयांची माहिती मिळते. त्यातूनच लोकमत जागृत करणे, संघटीत करणे, लोकांची दुःखे अशा अपेक्षा व्यक्त होतात.

**५.३.९ आणीबाणीविषयक :** राष्ट्रपतीने घोषीत केलेल्या आणीबाणीच्या घोषणेला संसदेची मंजूरी आवश्यक असते.

**५.३.१० निष्कर्ष :** संसदेची अधिकार कार्ये म्हणजेच लाकेसभा आणि राज्यसभेची अधिकार कार्ये होय.

## ५.४ संसद सदस्यांचे विशेषाधिकार (Privilages of Parliament and its members)

संसद आणि संसद सदस्यांची प्रतिष्ठा जोपासली जावी याकरिता राज्यघटनेत विशेष तरतूदी करण्यात आल्या आहेत. या तरतूदी दोन भागात विभागता येतात.

संसदेचे विशेषाधिकार सामूहिकपणे (As Collective Body)

१) सभागृहातील संभाषण व कामकाजावृत्त छापू न देण्याचा अधिकार

२) सभागृहात प्रेक्षक गॅलरीत एखाद्याला प्रवेश नाकारण्याचा

३) सभागृहाची अप्रतिष्ठा करणाऱ्याला शासन करण्याचा अधिकार

४) मंत्र्याकडून जर सभागृहाची दिशाभूल करण्यात आली, हेतूपुरस्सर चुकीची माहिती दिली असेल तर त्यांच्याविरुद्ध हक्कभागांचा ठराव पास करणे.

संसद सदस्यांना वैयक्तिकपणे असणारे अधिकार (enjoyed by the member individually)

१) भाषणस्वातंत्र्य - सभागृहातील प्रतिनिधींना पूर्ण भाषणस्वातंत्र्य आहे. विचार, मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे. याबाबतचा कोणत्याही न्यायालयात त्यांच्यावर कारवाई करता येत नाही.

२) अटकेपासून स्वातंत्र्य - संसदेच्या अधिवेशनाच्या ४०दिवस आधी व नंतर दिवाणी दाव्यासाठी शंसद सदस्यांना अटक करता येत नाही.

**विधिसमित्या (Legislative Committees):** संसदेमध्ये कायदे करण्याच्या कार्यामध्ये मदत करण्याऱ्या खालील समित्या आहेत.

**१) प्रदत्तविधेयक समिती (Committees on Subordinate Legislation) :**

कायदे करतांना त्यात ढोबळमनाने तरतूदी केल्या जातात. त्या कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी निरनिराळे नियम करण्याचे अधिकार सत्ताधारकांना दिलेले असतात. हे नियम मूळ कायद्यांशी विसंगत असणार नाहीत यावर लक्ष ठेवण्याचे काम ही समिती करते.

### २) प्रवरसमिती (Select Committees) :

एखाद्या विधेयकावर चर्चा सुरू असतांना ते विधेयक प्रवर समितीकडे पाठविले जावे असा ठराव सभागृहाने मंजूर केल्यास अशी समिती नेमली जाते. या समितीच्या सभासदांची संख्या ठरलेली नाही. ती संख्या विधेयकाचा विषय व महत्त्व पाहून वेळेवर ठरविली जाते. त्या विशिष्ट विधेयकाच्या बाबतीत अनुभवी व तज्ञ सभासद या समितीवर सभागृहाकडून घेतले जातात. विधेयकाची तपशीलवार छाननी करणे हे काम ही समिती करते. एका वेळेला एकापेक्षा जास्त प्रवरसमित्या असू शकतात. समित्या फक्त त्या त्या विधेयकापुरत्याच असतात.

**निष्कर्ष :**

अंदाजसमिती व सार्वजनिक उद्योगसमिती या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समित्या आहेत. राज्यसभेच्याही लोकसभेप्रमाणे समित्या असतात.

## ५.५ कायद्याची प्रक्रिया (Law - Making Procedure)

कायदे करणे संसदेचे मुख्य कार्य आहे. कोणताही कायदा पास होण्यासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहांची मंजुरी एखाद्या विधेयकाला (Bill) आवश्यक असते. त्यानंतर त्यावर राष्ट्रपतींची सही झाली की त्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते.

**विधेयकाचे प्रकार :-** विधेयकांचे दोन भागात वर्गीकरण करता येते.

१ सर्वसाधारण विधेयके (Ordinary Bills)

२ आर्थिक विधेयके (Money Bills)

**५.५.१ प्रक्रिया : कायदा बनण्याची प्रक्रिया होतांना विधेयक प्रत्येक गृहात खालील पाच अवस्थांतून जाते.**

विधेयकाच्या पाच अवस्था

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| पहिले वाचन विधेयकाची प्रस्तावना (Introduction Of the Bill) विधेयकाच्या पहिल्या अवस्थेत सभागृहाच्या अध्यक्षाच्या संमतीने विधेयक कोणासही गृहात मांडता येते. याला विधेयकाचे प्रथम वाचन म्हणतात. | दुसरे वाचन विधेयकावर कलमावर चर्चा (Discuss-ion of the Bill) या अवस्थेत विधेयकावर सविस्तर चर्चा करण्यात येते. | समिती अवस्था (Committe e stage) या अवस्थेत विधेयक त्या विषयीच्या संबंधीत निवड समितीकडे पाठविण्यात येते समिती त्या विधेयकांचा खोलवर अभ्यास करते. | समितीच्या अहवालावर चर्चा (Detailed discussion on the Report of the Committ ee) या अवस्थेत समिती आपला अहवाल गृहाला सादर करते. त्यावर गृहात चर्चा होते. | तिसरे वाचन. या अवस्थेत विधेयक मंजूर करून दुसऱ्या गृहात पाठविण्यात येते. |

एका गृहातून विधेयक पास झाले की ते विधेयक दुसऱ्या गृहाकडे पाठविण्यात येते. दुसऱ्या सभागृहामध्ये ते विधेयक या पाच अवस्थातून जाते. त्यानंतर ते राष्ट्रपतींच्या सहीसाठी पाठविण्यात येते. राष्ट्रपतींच्या सहीनंतर त्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते.

**५.५.२ आर्थिक विधेयके :**

अर्थविधेयक कशाला म्हणावे यासंबंधी घटनेच्या कलम ११० मध्ये स्पष्ठीकरण आहे. एखादे विधेयक अर्थविधेयक आहे किंवा नाही याविषयी वाद उपस्थित झाल्यास ते विधेयक आर्थिक विधेयक आहे हे लोकसभेचा सभापती ठरवितो. अर्थविधेयकांची कायदा बनण्याची प्रक्रिया सर्वसाधारण विधेयकाप्रमाणेच आहे. परंतु खालील बाबी अर्थविधेयकाबाबतीत सर्वसाधारण विधेयकापेक्षा वेगळ्या आहेत.

१) राष्ट्रपतींच्या पूर्वसंमतीनेच अर्थविधेयक मांडले जाते.
२) अर्थ विधेयके फक्त लोकसभेतच मांडण्यात येतात.
३) लोकसभेने अर्थविधेयक पास केल्यानंतर ते राज्यसभेकडे पाठविण्यात येते. राज्यसभेला ते विधेयक १४ दिवसांच्या आत लोकसभेकडे परत पाठवायचे असते.
४) राज्यसभेने जर अर्थविधेयकांच्या बाबतीत काही शिफारसी सुचविल्या तर त्या मान्य करणे अथवा न करणे पूर्णपणे लोकसभेवर अवलंबून असते.

### ५.५.३ लोकसभेच्या तुलनेत राज्यसभेचे घटनात्मक स्थान (Constitutional position of the Rajya-Sabha) :

संसद राज्यसभा आणि लोकसभा दोन्ही गृहांची मिळून तयार होते. संसदेच्या एका गृहाला (राज्यसभेला) वरिष्ठ गृह व एकाला (लोकसभेला) कनिष्ठ गृह म्हणतात. संसदेचे राज्यसभा हे सभागृह लोकसभेपेक्षा अधिकाऱ्यांच्या दृष्टीने काही बाबतीत कमी आहे. अमेरिकन सीनेटप्रमाणे राज्यसभा शक्तिशाली गृह नाही तसेच इंग्लंडच्या हाऊस ऑफ लॉर्डसप्रमाणे कमी दर्जाचेही नाही. राज्यसभा आणि लोकसभा यांच्या कार्य व भूमिकेची तुलना करता असे आढळते की राज्यसभेपेक्षा लोकसभेला खालील बाबतीत जास्त अधिकार आहेत :-

१) सर्वसाधारण विधेयके संसदेच्या कोणत्याही सभागृहात मांडता येतात. तरीही साधारणपणे बहुतेक विधेयके लोकसभेतच मांडण्यात येतात. एखाद्या विधेयकाच्या बाबतीत लोकसभा व राज्यसभा यांच्यात वाद निर्माण झाल्यास संयुक्त अधिवेशन राष्ट्रपती बोलवितात. संयुक्त अधिवेशनात निर्णय बहुमताने घेण्यात येतात. लोकसभेची सभासदसंख्या जास्त असल्यामुळे संयुक्त अधिवेशनात निर्णय लोकसभेच्या बाजूने लागतो.

२) अधिविधेयकांच्या बाबतीत लोकसभेला जास्त अधिकार आहेत. अर्थविधेयके प्रथम लोकसभेतच मांडण्यात येतात. राज्यसभेत कधीही नाही. लोकसभेने अर्थविधेयके पास केल्यानंतर ते राज्यसभेच्या संमतीसाठी पाठविण्यात येते. राज्यसभेला १४ दिवसांच्या आत ते विधेयक लोकसभेकडे परत पाठवायचे असते. अर्थविधेयकाच्या बाबतीत राज्यसभेने सुचविलेल्या शिफारसी लोकसभेने स्वीकारल्या पाहिजे असे बंधन लोकसभेवर नाही. यावरून असे दिसते की १४ दिवस विलंब लावणे एवढाच अधिकार अर्थविधेयकाच्या बाबतीत राज्यसभेला आहे.

३) मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवणे संसदेचे महत्त्वाचे कार्य आहे. याबाबतीत लोकसभा व राज्यसभा यांच्या अधिकारात फरक आहे. राज्यसभेत मंत्र्यांना प्रश्न विचारले जाऊ शकतात, अविश्वासाचा ठराव पास केला जाऊ शकत नाही. लोकसभा विविध मार्गाच्या द्वारे मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवू शकते त्यामुळे मंत्रिमंडळ खऱ्या अर्थाने लोकसभेला जबाबदार असते. अशाप्रकारे लोकसभेच्या तुलनेने राज्यसभेला कमी अधिकार असल्याचे स्पष्ठ होते. याचा अर्थ राज्यसभा हे गृह कुचकामी आहे किंवा निरुपयोगी आहे असे नाही. राज्यसभेलाही काही विशेष अधिकार आहेत.

### ५.५.४ राज्यसभेला असलेले विशेष अधिकार :-

भारताच्या संघराज्यपद्धतीत राज्यसभा राज्यांचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह असल्यामुळे राज्यसभेला त्या संदर्भात विशेष अधिकार प्राप्त होतात.

१) राज्यसभेने २/३ बहुमताने ठराव संमत केला तरच संसद राज्यसूचीतील विषयांवर कायदा करू शकते.

२) घटनादुरुस्ती विधेयक राज्यसभेने मंजूर केले नाही तर घटनादुरुस्ती होऊ शकत नाही. कारण घटनादुरुस्ती विधेयकांच्या बाबतीत संयुक्त अधिवेशनाची तरतूद नाही. उदा. ६४ व ६५ वी घटनादुरुस्ती राज्यसभेमध्ये बहुमत मिळू शकले नाही त्यामुळे होऊ शकल्या नाहीत.

३) राज्यसभा काही प्रमाणात लोकसभेवर नियंत्रण ठेवते. एखादे विधेयक लोकसभेतून पास झाल्यानंतर राज्यसभेकडे जाते. राज्यसभा त्या विधेयकांमध्ये त्रुटी किंवा उणिवा असल्यास त्या लोकसभेच्या निर्दशनास आणून देते.

## ५.६ सारांश

लोकसभेचा कार्यकाळ पाच वर्षाचा असतो तर राज्यसभाही स्थायी स्वरुपाचे सभागृह आहे. लोकसभाही प्रत्यक्ष लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे सभागृह आहे. म्हणून आर्थिक बाबतीत लोकसभेत अधिक अधिकार आहेत. असे असले तरी कायद्याच्या निर्मितीसबंधी दोन्ही सभागृहांना सारखेच महत्त्व आहे. अनेक वेळा लोकसभेत सत्ताधारी पक्षाचे बहुमत असते तर राज्यसभेत विरोधी पक्षाचे बहुमत असू शकते. अशावेळी बहुमताच्या जोरावर सरकार आपल्या सत्तेचा गैरवापर करीत असेल तर राज्यसभा त्यावर नियंत्रण आणू शकते अशा प्रकारे लोकसभा आणि राज्यसभा ही संसदेची दोन्ही सभागृहे महत्त्वपूर्ण आहेत.

## ५.७ प्रश्न :-

१) संसदेची रचना सांगा आणि संसदेच्या अधिकारांची चर्चा करा.
२) लोकसभेची रचना आणि कार्ये सांगा.
३) थोडक्यात टीपा लिहा
   १) सभापती.
   २) संसदसदस्यांचे विशेषाधिकार.
   ३) कायद्याची प्रक्रिया.
   ४) संसद समित्या.
   ५) राज्यसभेचे विशेष महत्त्व.

❖❖❖❖

# ६

# केंद्रीय कार्यकारीमंडळ

**प्रकरणाची रचनाः**

६.० उद्दिष्ट्ये
६.१ प्रस्तावना
६.२ राष्ट्रपती - अधिकार, सत्ता, भूमिका
६.३ पंतप्रधान - अधिकार, सत्ता, भूमिका
६.४ मंत्रिमंडळ
६.५ सारांश
६.६ प्रश्न

## ६.० उद्दिष्ट्ये

भारतीय संघराज्यात केंद्रसरकार आणि घटक राज्याचे सरकार अशी दोन सरकारे असतात. असे असले तरी केंद्र सरकारला घटनेने अधिक अधिकार दिलेले आहे. संपूर्ण भारत देशाच्या कारभाराची जबाबदारी केंद्र सरकारवर असते. या कार्यकारीचा घटनात्मक प्रमुख राष्ट्रपती असतो तर वास्तववादी प्रमुख पंतप्रधान असतो. या दोन्ही पदांच्या अधिकार व कार्ये यासबंधी विद्यार्थ्यांना माहिती करुन देणे ही या पाठाची उद्दिष्ट्ये आहेत.

## ६.१ प्रस्तावना :

आधूनिक काळात शासन व्यवस्थेचे अनेक प्रकार आढळतात. राजेशाही, एक पक्षीय राजवट, लष्करशाही, हुकुमशाही आणि लोकशाही हे त्यातील चटकन समोर येणारे प्रकार! लोकशाहीतसुद्धा दोन प्रकार आहेत :- अध्यक्षीय पद्धत (अमेरिकेन प्रारुप) आणि ब्रिटिश पद्धत (ब्रिटिश प्रारुप). आपल्या घटना समितीत भारताने कोणती शासन पद्धती स्वीकारवी या बद्दल बरीच वादावादी झाली आणि शेवटी आपण संसदीय पद्धत स्वीकारली.

अगदी बारकाईने बघितले तर असे आढळेल की संसदीय पद्धतीतही दोन उप-प्रकार आढळतात. एक म्हणजे 'राजेशाही - लोकशाही' (ब्रिटन) आणि दुसरी म्हणजे 'प्रजासत्ताक - लोकशाही' (भारत वगैरे). हे दोनी उपप्रकार संसदीय शासन पद्धतीचे असले तर राज्याशास्त्राच्या अभ्यासकांना यातील फरक समजला पाहिजे. राजेशाही - लोकशाहीमध्ये शासनाचा प्रमुख राजा किंवा राणी असतात तर सरकारचा प्रमुख लोकनियुक्त प्रतिनिधी (पंतप्रधान) असतो. प्रजासत्ताक - लोकशाहीमध्ये शासनाचा प्रमुख (राष्ट्रपती) आणि

सरकारचा प्रमुख (पंतप्रधान) या दोन्ही व्यक्ती लोकनियुक्त असतात. त्यांच्या निवडणूकीच्या पद्धतीत वेगळेपण असते. पंतप्रधान एका मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करतो व सत्तारूढ पक्षाचा ज्येष्ठ नेता असतो. राष्ट्रपती अप्रत्यक्ष निवडणूकीद्वारे निवडून येतो. आपल्या देशाचा राष्ट्रपती लोकसभा आणि राज्यसभेतील खासदार आणि सर्व विधानसभांतील आमदार निवडून देतात. विद्यमान राष्ट्रपती श्री. प्रणव मुखर्जी भारतीय प्रजासत्ताकात १५ वे राष्ट्रपती आहेत. अमेरिकेतील राष्ट्राध्यक्ष आणि भारताचे राष्ट्रपती यांच्या अधिकारांत, जबाबदाऱ्यांत खूप फरक आहे. अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष "कार्यकारी राष्ट्रपती" असतो. त्याच्या हातात सर्व महत्त्वाचे अधिकार एकवटलेले असतात. 'अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष' हे अतिशय शक्तीशाली पद आहे. भारताचा राष्ट्रपती त्या मानाने नामधारी असतो.

## ६.२ भारताचे राष्ट्रपती

आपल्या घटनेतील कलम ५३ नुसार 'भारतातील केंद्र सरकारचे अधिकार राष्ट्रपतींना दिलेले आहेत.' मात्र राष्ट्रपती स्वतःहून हे अधिकार वापरू शकत नाही. यासाठी त्यांच्या दिमतीला अधिकारी वर्ग असतो. शिवाय हे अधिकार घटनेतील तरतूदीनुसार वापरावे लागतात.

कलम ५४ नुसार राष्ट्रपतींची निवड अप्रत्यक्ष पद्धतीने केली जाते. यासाठी लोकसभा व राज्यसभेतील सर्व खासदार आणि देशांतील विधानसभांचे आमदार मतदार म्हणून मतदान करतात.

कलम ५५ नुसार राष्ट्रपतींच्या निवडणूकीत दोन महत्त्वाच्या तत्त्वांचे पालन केले जाईल. एक म्हणजे भारतीय संघराज्यातील प्रत्येक घटक राज्याला समान प्रतिनिधीत्व मिळावे. दुसरे म्हणजे घटक राज्यात यासाठी समानता निर्माण केली जाईल.

भारतीय घटनेतील रचना अशी आहे की भारताच्या राष्ट्रपतींच्या नावाने कारभार करण्यात येतो पण राष्ट्रपती स्वतः कारभार करत नाही.

### ६.२.१ राष्ट्रपतींचे अधिकार आणि कार्य :

वर दिलेल्या माहितीमुळे एवढे एव्हाना स्पष्ट झाले की भारताचा राष्ट्रपती ब्रिटनच्या राजासारखा असतो. भारताच्या राष्ट्रपतींचे अधिकार आणि कार्य व्यवस्थित समजून घेण्यासाठी कलम ५३ साठी आणि कलम ७४ यांचे एकत्र वाचन केले पाहिजे. आपल्या राष्ट्रपतींना भरपूर अधिकार असतात. त्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येते.

**अ) कार्यकारी अधिकार :**

(१) कलम ५३ नुसार भारत सरकारचे सर्व अधिकार राष्ट्रपतींकडे असतात. त्याचप्रमाणे कलम ७७ नुसार भारत सरकारचा कारभार राष्ट्रपतींच्या नावाने चालतो. (२) देशाचा कार्यकारी प्रमुख या नात्याने राष्ट्रपती अनेक महत्त्वाच्या नेमणूका करतात. उदा. ॲटर्नी - जनरल, युपीएससीचे अध्यक्ष आणि सभासद इत्यादी. (३) कलम ५३ नुसार राष्ट्रपती भारतीय सैन्याचे सर्वोच्च सेनापती असतात. त्यांच्या हाताखाली नौसेना, भूसेना आणि वायूसेना असते. राष्ट्रपती देशाच्या वतीने युद्ध घोषित करू शकतात, शांतता करार करू शकतात.

अर्थात या साठी संसदेची संमती असावी लागते. (४) कलम ७८ नुसार राष्ट्रपतींना देशाच्या कारभाराबद्दल माहिती घेण्याचा हक्क आहे. (५) परराष्ट्राशी असलेला संबंधाचा विचार करता राष्ट्रपतींना आपल्या देशाचे परदेशातील राजदुत नेमण्याचा हक्क आहे. त्याचप्रमाणे परदेशाने आपल्या देशात पाठवलेल्या राजदुतांना मान्यता देण्याचा हक्क आहे.

**ब) संसदीय अधिकार :**

कलम ७९ नुसार दोन सभागृह आणि एक राष्ट्रपती असलेली संसद असेल. राष्ट्रपती संसदेचे सभासद नसले तरी त्यांना संसदीय अधिकार असतात. (१) ते संसदेचे अधिवेशन सुरू करतात, स्थगित करू शकतात. ते लोकसभा विसर्जित करू शकतात. (२) कलम ८५ नुसार राष्ट्रपती संसदेला दोन अधिवेशनात सहा माहिन्यांपेक्षा जास्त काळ गेला नाही, याची खात्री करतात. (३) एखाद्या बिगर - वित्तविषयक विधेयकाबद्दल वाद असेल तर राष्ट्रपती लोकसभा आणि राज्यसभा यांचे संयुक्त अधिवेशन बोलवू शकतात. (४) प्रत्येक सार्वत्रिक निवडणूकीनंतर अस्तित्वात आलेल्या लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनांचे उद्घाटन राष्ट्रपती करतात. त्याचप्रमाणे दरवर्षी लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनाचे उद्घाटन राष्ट्रपती करतात. या उद्घाटनपर भाषणात राष्ट्रपती सरकारच्या परराष्ट्रीय, राष्ट्रीय धोरणातील महत्त्वाचे मुद्दे मांडतात. (५) कलम ८६ नुसार संसदेत चर्चा सुरू असलेल्या विधेयकाबद्दल राष्ट्रपती संसदेला 'निरोप' पाठवू शकतात. (६) संसदेच्या दोन्ही सभागृहाने संमत केलेले प्रत्येक विधेयक राष्ट्रपतींकडे स्वाक्षरीसाठी जाते. राष्ट्रपती वित्तविषयक विधेयक परत पाठवू शकत नाही. त्याचे कारण सर्व वित्तविषयक विधेयके राष्ट्रपतींच्या परवानगीनंतरच सभागृहात मांडली जातात. मात्र राष्ट्रपती बिगर - वित्त विधेयक परत पाठवू शकतात. (७) राष्ट्रपतींना राज्यसभेवर बारा खासदार नेमण्याचा हक्क आहे. साहित्य, कला, समाजकारण वगैरेसारख्या क्षेत्रांत अतुलनीय कामगिरी केलेल्या व्यक्तींना अशाप्रकारे राज्यसभेवर नेमतात. आर. के. नारायण (साहित्य), शबाना आझमी (चित्रपट) ही या संदर्भात चटकन आठवणारी नावे. (८) वित्त विधेयकांप्रमाणे काही बाबी अशा आहेत की पूर्वपरवानगी आवश्यक असते. उदा. नवीन राज्य निर्माण करणारे विधेयक किंवा विद्यमान राज्यांच्या सीमा बदलणारे विधेयक (कलम ३).

**क) वित्त अधिकार :**

(१) कोणतेही वित्त विधेयक राष्ट्रपतींना दाखविल्याशिवाय संसदेत सादर करता येत नाही. कलम ११२ नुसार राष्ट्रपती दरवर्षी संसदेत वार्षिक अंदाजपत्रक सादर केले जाईल, याची काळजी घेतील. (२) राष्ट्रपती दर पाच वर्षांनी वित्त आयोग नेमतील. केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यातील उत्पन्नाचे वाटप कसे असावे, याबद्दल वित्त आयोग सूचना करते. (३) राष्ट्रपती आणीबाणीची परिस्थिती हाताळण्यासाठी करावराच्या खर्चाला मंजुरी देतात. महापूर, भूकंप, त्सुनामी वगैरेसारख्या संकटांचा सामना करण्यासाठी यातून राष्ट्रपती खर्च भागवतात.

**ड) न्यायालयीन अधिकार :**

(१) जर एखाद्या न्यायमुर्तीच्या विरोधात महाभियोगाची कारवाई झाली तर त्या न्यायामुर्तीच्या बडतर्फीचा आदेश राष्ट्रपती काढतात. (२) राष्ट्रपती उच्च न्यायालयांच्या न्यायामुर्तीच्या बदल्या करतात. (३) राष्ट्रपतींना फाशीची म्हणजेच मृत्यूदंडाची शिक्षा झालेल्या गुन्हेगाराची शिक्षा कमी करण्याचा अधिकार आहे.

**ई) राज्यांबद्दलचे अधिकार :**

(१) राज्यपालांनी राष्ट्रपतींच्या विचारार्थ पाठवलेले विधेयक मंजुर किंवा नामंजूर करणे. (२) राष्ट्रपती राज्यांच्या राज्यपालांची नेमणूक करतात. राज्यपाल राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत पदावर राहू शकतात. (३) राष्ट्रपती राज्यपालांना सूचना पाठवू शकतात. या सूचना पाळणे बंधनकारक आहे.

**फ) आणीबाणीतील अधिकार :**

आणीबाणीच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी राष्ट्रपतीना काही खास अधिकार देण्यात आले आहेत :- (१) देशात जर युद्ध, अंतर्गत सशस्त्र बंडामुळे आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली तर राष्ट्रपती संपूर्ण देशभर किंवा देशाच्या काही भागात आणीबाणी जाहीर करू शकतात. (कलम - ३५२) (२) जर भारतीय संघराज्यातील एखाद्या घटक राज्याचा कारभार घटनेनुसार सुरू नसेल तर राज्यपालांच्या अहवालाचा आधार घेत किंवा अहवाल नसला तरी राष्ट्रपती ते राज्य सरकार बडतर्फ करू शकतात. त्यानंतर त्या राज्यात राष्ट्रपतींची राजवट सुरू होते. (कलम ३५६) (३) जर देशाचे आर्थिक स्थैर्य धोक्यात आले असेल तर राष्ट्रपती 'आर्थिक आणीबाणी' घोषित करू शकतात. मात्र आर्थिक आणीबाणी एक महिना ठेवता येते. पण संसदेच्या ठरावाद्वारे वाढवता येते. (कलम ३६०)

**६.२.२ राष्ट्रपतींची भूमिका :**

एका बाजूने असे दिसते की राष्ट्रपतींना भरपूर अधिकार आहेत. पण दुसऱ्या बाजूने असेही दिसते की राष्ट्रपती एखाद्या रबर स्टॅम्पसारखे आहेत. आपल्या राज्यघटनेनुसार राष्ट्रपतींना सल्ला देण्यासाठी, राज्यकारभारात मदत करण्यासाठी मंत्रिमंडळ असेल अशी तरतूद केलेली आहे. राष्ट्रपतींची भूमिका समजून घेण्यासाठी घटनेतील खालील तरतूदी समजून घेतल्या पाहिजे.

**अ) कार्यकारी अधिकार :**

(१) कलम ५३ नुसार भारत सरकारचे सर्व अधिकार राष्ट्रपतींकडे असतील. हे अधिकार ते थेट वापरतील किंवा त्यांना कनिष्ठ असलेल्या अधिकारी वर्गाकडून वापरतील. याचप्रमाणे कलम ७५ नमुद करते की 'इतर मंत्री, (पंतप्रधानांचा अपवाद वगळता) राष्ट्रपती पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार नेमतील'. (२) कलम ७४ नुसार राष्ट्रपतींना मदत करण्यासाठी, त्यांना सल्ला देण्यासाठी पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ असेल. ही स्थिती १९७६ सालापर्यंत होती. हे कलम काळजीपूर्वक वाचल्यास जाणवते की मंत्रिमंडळ 'राष्ट्रपतींना सल्ला' देते. कायद्याचा दृष्टीकोन स्वीकारण्यास सल्ला नाकारतो येतो. १९५० - १९७६ दरम्यान अशी परिस्थिती आली नाही की जेव्हा राष्ट्रपतीनी सल्ला नाकारला होता. मात्र मंत्रिमंडळाचा सल्ला राष्ट्रपती नाकारू शकतात का, याबद्दल वाद होताच. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी ४२ वी घटनादुरूस्तीद्वारे यात स्पष्टता आणली. १९७६ सालानंतर असे मान्य झाले की मंत्रिमंडळाचा सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक असेल. ४४ व्या घटनादुरुस्तीनुसार मंत्रीमंडळाने दिलेला सल्ला राष्ट्रपती पुनर्विचारासाठी मंत्रिमंडळीकडे परत पाठवू शकतात. परंतु पुन्हा तोच सल्ला दिल्यास तो मान्य करावाच लागतो. (३) भारतीय राज्यघटनेत राज्यांत राष्ट्रपतींच्या राजवटीची तरतूद

आहे. मात्र केंद्रात एक क्षणभरसुद्धा राष्ट्रपतींची राजवट आणता येत नाही. केंद्रात राष्ट्रपतींना सल्ला देण्यासाठी पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ नेहमी असेल, अशीच तरतूद आहे. (४) कलम ७४(२) नुसार मंत्रिमंडळाने राष्ट्रपतींना कोणता सल्ला दिला, त्यात काय नमूद केले होते वगैरे विचारण्याचा कोणाला अधिकार नाही.

**आपली प्रगती तपासा :**

१) भारताच्या राष्ट्रपतीचे अधिकार व भूमिका थोडक्यात स्पष्ट करा.

२) भारताच्या राष्ट्रपतीचे कायदेविषयक अधिकारांची चर्चा करा.

## ६.३ पंतप्रधान

आधी उल्लेख केल्याप्रमाणे आपली संसदीय शासन पद्धती ब्रिटिशांच्या शासन पद्धतीप्रमाणे आहे. यात पंतप्रधानांच्या हातात खरी सत्ता असते. म्हणूनच संसदीय पद्धतीत पंतप्रधानाना अतोनात महत्त्व असते. खालील तरतूदीवरून हे स्पष्ट होईल.

### ६.३.१ मंत्रिमंडळाचा प्रमुख :

कलम ७४ नुसार राष्ट्रपतींना सल्ला देण्यासाठी पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ असेल. ४२ वी घटनादुरुस्ती, १९७६ नुसार यात बदल झाला आणि मंत्रिमंडळाने दिलेला सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक असेल, असा बदल झाला. 'पंतप्रधानांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळ' हे शब्दप्रयोग स्पष्ट करतो की मंत्रिमंडळात पंतप्रधानांचे स्थान सर्वोच्च असेल.

### ६.३.२ पंतप्रधानांची नेमणूक :

संसदीय शासन पद्धतीनुसार बहुमत मिळालेल्या पक्षाच्या नेत्याला पंतप्रधान करावे लागते. मात्र जेव्हा कोणत्याच पक्षाला बहुमत मिळालेले नसेल तेव्हा मात्र राष्ट्रपती कोणाला पंतप्रधान करायचे याचा निर्णय घेऊ शकतो. असा प्रसंग १९८९ साली आला होता. लोकसभा निवडणूकीनंतर कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहूमत नव्हते. परिणामी राष्ट्रपतींनी व्ही. पी. सिंग यांना पंतप्रधान केले.

### ६.३.३ मंत्रिमंडळ बनवणारा :

पंतप्रधानांची नेमणूक जरी राष्ट्रपती करत असले तरी इतर मंत्र्यांची नेमणूक पंतप्रधानांच्या सल्ल्याने केली जाते. कलम ७५(१) स्पष्टपणे नमूद करते की इतर मंत्री पंतप्रधानांच्या सल्ल्याने नेमले जातील.

### ६.३.४ मंत्रिमंडळाचा कार्यकाल :

कलम ७५(२) नुसार 'मंत्री राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत मंत्रिपदावर राहतील.' यात प्रत्यक्षात 'पंतप्रधानांची मर्जी' ही वस्तूस्थिती असते. पंतप्रधान एखाद्या मंत्र्याला काढू शकतात, पदोन्नती देऊ शकतात, पदानवती देऊ शकतात. एखाद्या मंत्र्याने राजीनामा दिला तर तो त्या मंत्र्याचा राजीनामा असतो. पण पंतप्रधानांनी राजीनामा दिल्यास तो साऱ्या मंत्रिमंडळाचा राजीनामा समजला जातो. यातून पंतप्रधानपदाचे महत्त्व स्पष्ट होते.

### ६.३.५ सामूहिक जबाबदारी :

कलम ७५(३) नुसार मंत्रिमंडळ सामुहिक जबाबदारीच्या तत्वानुसार काम करेल. हे सर्व पंतप्रधानाद्वारेच शक्य आहे. आधी उल्लेख केल्याप्रमाणे एखाद्या मंत्र्याने राजीनामा दिल्यास तो व्यक्तीगत राजीनामा असतो. पण पंतप्रधानांनी राजीनामा दिल्यास साऱ्या मंत्रिमंडळाचा राजीनामा समजला जातो.

### ६.३.६ संसद, राष्ट्रपती आणि मंत्रिमंडळ यांच्यातील कडी / दुवा :

संसद, राष्ट्रपती आणि मंत्रिमंडळ यांच्यातील दुवा म्हणून पंतप्रधान महत्त्वाची भूमिका बजावतात. कलम ७८ नमुद करते की पंतप्रधान राष्ट्रपतींना शासनाच्या महत्त्वाच्या निर्णयांची माहिती देतील, राष्ट्रपतींना मागितलेली माहिती पूरवतील, राष्ट्रपतींच्या सूचना मंत्रिमंडळासमोर मांडतील.

### ६.३.७ पंतप्रधानांचे अधिकार आणि कार्ये :

पंतप्रधान हे पद किती महत्त्वाचे आहे, याचा एव्हाना अंदाज आलेला असेलच. त्यांना भरपूर अधिकार असतात. त्याचप्रमाणे महत्त्वाच्या जबाबदाऱ्याही असतात.

#### १) मंत्रिमंडळाचा प्रमुख :

एकदा राष्ट्रपतींनी पंतप्रधानांची नेमणूक केली की मग मंत्रिमंडळातील इतर मंत्र्यांच्या नेमणूकीत पंतप्रधान महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांच्याच सल्ल्याने राष्ट्रपती इतर मंत्र्यांची नेमणूक करतात. यातून मंत्रिमंडळाच्या नेतेपदी पंतप्रधान असतात, हे सिद्ध होते. मंत्र्यांच्या नेमणूकीप्रमाणेच मंत्र्यांचे खातेवाटप पंतप्रधान करतात. सर्व मंत्र्यांना पंतप्रधानांच्या सूचनेप्रमाणे काम करावे लागते.

#### २) कॅबिनेटचा नेता :

मंत्रिमंडळातील ज्येष्ठ मंत्र्यांचा एक छोटा गट म्हणजे कॅबिनेट. मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री, उपमंत्री, राज्यमंत्री असतात. पण कॅबिनेटमध्ये कॅबिनेट मंत्री असतात, जे आपापल्या विभागाचे / खात्याचे प्रमुख असतात. कॅबिनेटमध्ये व्यापक, धोरणात्मक चर्चा होते. कॅबिनेटच्या बैठकांच्या अध्यक्षस्थानी पंतप्रधान असतात. कॅबिनेटच्या काही उप-समित्या असतात. संरक्षणाविषयक उपसमिती, अर्थविषयक उपसमिती इ. या उपसमितींच्या अध्यक्षपदी पंतप्रधान असतात.

**३) लोकसभेचे नेते :**

असा संकेत / परंपरा आहे की पंतप्रधान लोकसभेचा सभासद असावा. मात्र याला अपवाद असू शकतो. विद्यमान पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग राज्यसभेचे सभासद आहेत. जर पंतप्रधान लोकसभेचे सभासद असतील तर लोकसभेचे नेतृत्व आपोआप त्यांच्याकडे येते. या स्थितीत पंतप्रधान महत्त्वाच्या घोषणा लोकसभेत करू शकतात.

**४) संसदेचे नेतृत्व :**

पंतप्रधान जरी लोकसभेचे सभासद असले तरी त्यांच्यांकडे साऱ्या संसदेचे नेतृत्व असते. लोकसभेचे सभापती आणि राज्यसभेचे अध्यक्ष पंतप्रधानांशी चर्चा करून आपापल्या सभागृहाचे कार्यक्रम पक्के करतात.

**५) फेडरल पद्धत :**

भारतात अंशतः फेडरल पद्धत आहे. भारतात काही राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्था आहेत. उदा. योजना आयोग, राष्ट्रीय विकास परिषद इ. अशा ठिकाणी पंतप्रधानांना प्रांतांच्या नेत्यांबरोबर चर्चा करता येते.

**६) परराष्ट्रीय धोरण :**

आपले पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या काळापासून पंतप्रधान देशाच्या परराष्ट्र धोरणात रस घेतात. आपल्या देशात परराष्ट्र खात्यांसाठी वेगळा मंत्री असतो. पण महत्त्वाच्या धोरणांवर पंतप्रधानांची छाप जाणवते. पंडित नेहरूंनी अतिप्रशासनवादी धोरणांद्वारे भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचा पाया घातला. पंतप्रधानांना संयुक्त राष्ट्रसंघ, सार्क वगैरे महत्त्वाच्या संस्थाच्या बैठकींना उपस्थित राहता येते.

**७) मुख्य प्रशासक :**

देशाचे प्रमुख म्हणून पंतप्रधानांना प्रशासनावर लक्ष ठेवावे लागते. यासाठी त्यांना संरक्षण, व्यापार, वित्त, गृह वगैरे सर्व विभागांकडे लक्ष ठेवावे लागते. त्याचप्रमाणे भारताची परदेशात हेरगिरी करणारी रॉ (रिसर्च ॲन्ड ॲनॅलैसिस विंग), देशांत हेरगिरी करणारी इंटेलेजिन्स ब्युरो वगैरेसारख्या संस्थाकडून सतत महत्त्वाची माहिती पंतप्रधानांना मिळत असते.

**८) राज्यपालाची नेमणूक :**

देशातील महत्त्वाच्या नेमणूका जरी राष्ट्रपतीच्या स्वाक्षरीने होत असल्या तरी त्या मागे पंतप्रधानांचा सल्ला असतोच. थोडक्यात म्हणजे पंतप्रधानांच्या हातात राज्यपाल, राजदूत वगैरे नेमणूका असतात. याचप्रमाणे पंतप्रधान एखाद्या उद्योगसमूहाला खास मदत करू शकतात किंवा दुर्लक्ष करू शकतात.

**९) निवडणूका :**

लोकशाहीत निवडणूका अतिशय महत्त्वाच्या असतात. सत्ता संपादनासाठी निवडणूका जिंकणे महत्त्वाचे असते. पंतप्रधानपदी बसलेल्या व्यक्तीला निवडणूकांत सत्तारूढ पक्षाचे नेतृत्व

करावे लागते, दौरे काढावे लागतात, पक्षाचा प्रचार करावा लागतो. पक्षाला पुन्हा एकदा सत्ता मिळवून द्यावी लागते. यात पंतप्रधानांना महत्त्वाची जबाबदारी उचलावी लागते.

**१०) सत्तारूढ पक्षाचे नेतृत्व :**

परंपरेनुसार सत्तारूढ पक्षाचा नेता पंतप्रधान होतो. याचाच अर्थ असा की पंतप्रधान सत्तारूढ पक्षाचा नेता होतो. यामुळे पंतप्रधानांवर आणखी एक जबाबदारी येऊन पडते. आणि ती म्हणजे सरकार आणि सत्तारूढ पक्ष यांच्यात कडी म्हणून काम करणे.

**११) जनमत :**

अंतिमतः पंतप्रधानांना साऱ्या देशाचे नेतृत्व करावे लागते. या भूमिकेतून त्यांना जनमतावर प्रभाव टाकता येतो, समाजात पुरोगामी मूल्यं रूजवता येतात. याचे ताजे उदाहरण म्हणजे महिला आरक्षण विधेयक. सध्या सत्तारूढ असलेली कॉंग्रेस - प्रणीत आघाडी हे विधेयक संमत करून घेण्याच्या प्रयत्नांत आहे. या प्रकारे पंतप्रधान समाजात पुरोगामी वातावरण निर्माण करू शकतात.

## ६.३.८ पंतप्रधानांची भूमिका :

एव्हाना हे स्पष्ट झाले आहे की संसदीय शासनपद्धतीत पंतप्रधानांचे स्थान महत्त्वाचे असते. भारतासारख्या पारंपरिक समाजात पंतप्रधानांचे स्थान अतोनात महत्त्वाचे असते. मंत्रिमंडळातील प्रत्येक मंत्र्याला पंतप्रधानांच्या सूचना ऐकाव्याच लागतात. ते मंत्रिमंडळाचा, खात्यांची रचना, पुनर्रचना करतात. ते एखाद्या मंत्र्याला मंत्रीपदावरुन काढून टाकू शकतात. याबद्दल त्यांचा शब्द अंतिम समजला जातो. संसदेमध्ये पंतप्रधान चर्चेला दिशा देऊ शकतात, त्यात मौलिक भर घालू शकतात. मंत्रिमंडळाचा प्रमुख म्हणून ते राष्ट्रपती, संसद आणि मंत्रिमंडळ यांच्यातील कडी असतात.

येथे आपल्याला काही वस्तूस्थितीची चर्चा केली पाहिजे. पंतप्रधान या व्यक्तीला खूप अधिकार असतात. याचा अर्थ असा नव्हे की प्रत्येक पंतप्रधान शक्तीशाली असतो. यात काही इतर घटकही महत्त्वाचे असतात. जर सत्तारूढ पक्षाला स्पष्ट बहुमत नसेल आणि सत्तेसाठी इतर पक्षांवर अवलंबून राहावे लागत असेल तर पंतप्रधान फारसे अधिकार गाजवू शकत नाहीत. याप्रमाणे पंतप्रधानपदी बसलेल्या माणसाचे व्यक्तीमत्त्व कसे आहे, याचाही विचार करावा लागतो. श्रीमती इंदिरा गांधी यांच्यासारखी आक्रमक व्यक्तीमत्वाची व्यक्ती पंतप्रधानपदी बसल्यास त्यापदाचे अधिकार आपोआप वाढतात. त्याचप्रमाणे जर पंतप्रधानपदी लाल बहादूर शास्त्री यांच्यासारख्या सौम्य व्यक्तीमत्त्वाची व्यक्ती असल्यास त्या पदाचे अधिकार त्या मानाने कमी होतात.

भारतीय लोकशाहीचा विचार केल्यास पंतप्रधानपदाचे दोन टप्पे दाखवता येतात. १९७७ सालापर्यंत पंतप्रधानांना खूप अधिकार होते. पण १९७७-७९ दरम्यान सत्तारूढ असलेल्या जनता पक्षाच्या सरकारला अशी सत्ता वापरता आली नाही. तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांना सत्तारूढ पक्षाच्या आत सुरू झालेल्या सत्तासंघर्षाने रडकुंडीस आणले होते. असाच दुसरा टप्पा १९८९ साली होता जेव्हा व्ही. पी. सिंग पंतप्रधानपद होते. त्यानंतर

भारतात आघाडीची सरकारे आल्यामुळे पंतप्रधानपद कमकुवत झाले आहे. याचे कारण म्हणजे सत्ता टिकवण्यासाठी पंतप्रधानांना अनेक पक्षांना खूष ठेवावे लागते.

**आपली प्रगती तपासा :**

१) केंद्रीय मंत्रीमंडळातील प्रंतप्रधानांचे महत्त्व स्पष्ट करा.

## ६.४ मंत्रिमंडळ :-

संसदीय शासनप्रणालीत सामुहिक जबाबदारीचे तत्त्व महत्त्वाचे असते. याचा अर्थ असा की पंतप्रधानांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळ संसदेला सामुहिकरित्या जबाबदार असते. यातून असे सिद्ध होते की संसदीय पद्धतीत मंत्रिमंडळ हा महत्त्वाचा घटक असतो. कलम ७४(१) नुसार राष्ट्रपतींना सल्ला देण्यासाठी पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ असते. या कलमाद्वारे मंत्रिमंडळाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. जर विद्यमान सरकारचा संसदेत पराभव झाला तर नवे सरकार येईपर्यंत जूनेच सरकार काळजीवाहू सरकार म्हणून काम पाहते. भारतात एप्रिल १९९९ मध्ये अशी परिस्थिती निर्माण झाली होती. एप्रिल १९९९ मध्ये अटलबिहारी वाजपेयी सरकारच्या विरोधात अविश्वासाचा ठराव संमत झाला होता. लोकसभेच्या निवडणूका ऑक्टोबर १९९९ मध्ये झाल्या. दरम्यान वाजपेयी काळजीवाहू सरकार चालवत होते.

आपण राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांच्यातील संबंधांची चर्चा केली आहे. यात असे बघितले की राष्ट्रपतींना मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार कारभार करावा लागतो. याबद्दलची कायदेशीर भाषा काळजीपूर्वक वाचली तर असे दिसते की मंत्रिमंडळ राष्ट्रपतींना 'सल्ला' देते, 'हुकूम' नाही. कायदेशीररित्या विचार केल्यास 'सल्ला' नाकारता येतो. जर राष्ट्रपतींनी मंत्रिमंडळाचा सल्ला नाकारला तर काय होईल ? सुरूवातीला असे वाटत होते की अशी स्थिती उद्‌भवणार नाही. मात्र स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांना याबद्दल असमाधान होते. त्यांना याबद्दल स्पष्टता हवी होती. ही स्पष्टता ४२ वी घटनादुरुस्ती १९७६ मुळे आली. या दुरुस्तीमुळे राष्ट्रपतींना मंत्रिमंडळाचा सल्ला पाळणे बंधनकारक करण्यात आले. यामुळे भारतीय राष्ट्रपती 'होयबा' झाले. ते फक्त रबरस्टॉप आहेत, अशा तक्रारी झाल्या. ४४ वी घटनादुरुस्ती १९७९ मुळे यात किंचीत बदल करण्यात आला. आता राष्ट्रपती मंत्रिमंडळाचा सल्ला पूर्णपणे किंवा काही बदलांसह मंत्रीमंडळाकडे परत पाठवू शकतात. मंत्रीमंडळाने पुन्हा तोच किंवा काही बदल करुन सल्ला दिल्यास तो राष्ट्रपतीला मान्य करावाच लागतो. उदा. मार्च १९९१ मध्ये पंतप्रधान चंद्रशेखर यांनी पंजाबमध्ये निवडणूका घ्याव्या, असा सल्ला दिला. राष्ट्रपती आर. वेंकटरमण यांना हा सल्ला मान्य नव्हता. त्यांनी हा सल्ला परत पाठवला. मंत्रिमंडळाने हा सल्ला पुन्हा एकदा राष्ट्रपतींकडे पाठवला. तेव्हा मात्र राष्ट्रपतींना मान्य करावा लागला.

### ६.४.१ मंत्रिमंडळाची निर्मिती :

एव्हाना आपण संसदीय पद्धतीत मंत्रिमंडळाचे महत्त्व समजून घेतले. आता मंत्रिमंडळ निर्मितीची प्रक्रिया समजून घेतली पाहिजे. येथे आपल्याला दोन पायऱ्या दिसतात (१) राष्ट्रपतींनी केलेली पंतप्रधानांची नेमणूक (२) इतर मंत्र्यांची नेमणूक. जर सत्तारूढ पक्षाला / आघाडीला स्पष्ट बहूमत असेल तर पंतप्रधानांची नेमणूक हा केवळ उपचार असतो. कलम ७४(१) नुसार 'इतर मंत्र्यांची नेमणूक राष्ट्रपती पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार करतील'. या तरतूदीतून स्पष्ट जाणवते की, मंत्रिमंडळ बनवणे हा पंतप्रधानांचा खास अधिकार असतो. आधी उल्लेख केल्याप्रमाणे पंतप्रधान खातेवाटप करतात, मंत्रिमंडळाची फेररचना करू शकतात, एखाद्या मंत्र्याला बडतर्फ करू शकतात.

मंत्रिमंडळाच्या रचनेच्या विचार केल्यास तीन स्तर असल्याचे दिसते. 'कॅबिनेट मंत्री' , 'खात्याचे राज्यमंत्री' व 'उपमंत्री' अगदी क्वचित 'संसदीय सचीव' हा चौथा स्तर असू शकतो. यांची चर्चा खाली केली आहे.

**कॅबिनेट मंत्री :**

कॅबिनेट मंत्री म्हणजे खात्याचा प्रमुख. हे पद सहसा पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांना देण्यात येते. कॅबिनेट म्हणजे अतिशय महत्त्वाचे निर्णय घेण्याची यंत्रणा. यात अगदी निवडक मंत्री असतात. सहसा ही संख्या १५ - २० असते. ते स्वतंत्रपणे आपापल्या खात्यांचा कारभार करतात. मात्र महत्त्वाचे निर्णय, धोरणाबद्दल कॅबिनेट मंत्री पंतप्रधानांचा सल्ला घेतात.

**खात्याचे राज्यमंत्री :**

मंत्रिमंडळाचा हा दुसरा स्तर असतो. ते कॅबिनेट मंत्र्यांना मदत करतात. जर खाते मोठे असेल तर खात्याच्या राज्यमंत्र्यावर एखाद्या विभागाची स्वतंत्र जबाबदारी देण्यात येते. जर खाते मोठे नसेल तर हे मंत्री कॅबिनेट मंत्र्यांना दैनंदिन कामात मदत करतात.

**उपमंत्री :**

हा मंत्रिमंडळाचा तिसरा स्तर असतो. ते एक तर कॅबिनेट मंत्र्यांना किंवा राज्यमंत्र्यांना मदत करतात. त्यांच्याकडे स्वतंत्र जबाबदारी नसते.

**संसदीय सचीव :**

त्यांचे आदर्श नवीन म्हणजे 'प्रशिक्षणार्थी मंत्री'. या पदांवर तरूण राजकारण्याची नेमणूक केली जाते. याद्वारे त्यांना प्रशासनाचा अनुभव मिळतो.

### ६.४.२ कॅबिनेटचे अधिकार, कार्य आणि भूमिका :

भारतीय राज्यघटनेत ४३ वी घटनादुरुस्ती १९७८ येईपर्यंत 'कॅबिनेट' चा उल्लेख नव्हता. तोपर्यंत मंत्रिमंडळाचा उल्लेख व्हायचा. आतापर्यंत आपल्याला कॅबिनेटबद्दल सर्व माहिती आहे. महत्त्वाचे निर्णय घेण्याची, धोरण ठरवण्याची अंतिम स्थान म्हणजे 'कॅबिनेट' होय. कॅबिनेटच्या बैठकांना फक्त कॅबिनेट मंत्री उपस्थित राहतात. कॅबिनेटने घेतलेले निर्णय मंत्रिमंडळाने घेतले, असे मानण्यात येते. याशिवाय सर्व मंत्र्यांवर सामुहिक जबाबदारीचे तत्त्व लागू होते.

संसदीय शासनपद्धतीत कॅबिनेट ही सर्वोच्च यंत्रणा असते. कॅबिनेटची बैठक दर आठवड्याला होते. या बैटकीची कार्यक्रमपत्रिका (अजेंडा) कॅबिनेट सचीव तयार करतात. कॅबिनेट सचीव हे पद नोकरशाहीतील सर्वोच्च पद आहे, जे ज्येष्ठ आय. ए. एस. अधिकाऱ्याला मिळते. कॅबिनेट बैठकींचे इतिवृत्त कॅबिनेट सचीव तयार करतात. कॅबिनेटमधील निर्णय सर्वसहमतीने घेतले जातात. जर एखाद्या मंत्र्याला कॅबिनेटचा निर्णय मान्य नसेल तर त्याला राजीनामा द्यावा लागतो. यालाच सामूहिक जबाबदारीचे तत्त्व म्हणतात. जर एखाद्या मंत्र्याला कॅबिनेटचा निर्णय मान्य नसेल तर पंतप्रधान त्याला राजीनामा द्यायला सांगतात.

**कॅबिनेटची कार्ये :**

कॅबिनेटला खाली नमूद केलेली कार्य करावी लागतात :

**१) धोरण ठरवणे :**

आधी नमूद केल्याप्रमाणे कॅबिनेट ही धोरण ठरवणारी सर्वोच्च यंत्रणा आहे. कॅबिनेटमध्ये राष्ट्रीय, परराष्ट्रीय विषयांची चर्चा होते. आणि यातून धोरण ठरते. धोरणांवर आधारित निर्णय घेतले जातात आणि योग्य त्या विभागाकडे कळवण्यात येतात. ही जबाबदारी कॅबिनेट सचीवांची असते. जर एखाद्या राज्यमंत्र्याची किंवा उपमंत्र्याची उपस्थिती गरजेची असते तर त्या व्यक्तीला कॅबिनेट बैठकीला बोलावण्यात येते.

**२) नवीन कायदे :**

संसदीय पद्धतीत कायदा करणे ही सर्वात महत्त्वाची जबाबादारी असते. नवीन कायद्याचा कच्चा मसुदा कॅबिनेट बैठकीत चर्चेला येतो. येथे प्रस्तावित कायद्याच्या सर्व बाजू तपासल्या जातात. कच्चा मसुदा नंतर पक्का होतो आणि संसदेसमोर येतो.

**३) अंतिम नियंत्रण :**

धोरण ठरवल्याप्रमाणेच कॅबिनेटला देशाच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार आहे. कॅबिनेट नियंत्रणाद्वारे देशातील महत्त्वाची प्रकल्पे, योजना यांच्या अंमलबजावणीवर देखरेख केली जाते.

**४) समन्वय :**

आधी नमूद केल्याप्रमाणे कॅबिनेटमध्ये तपशिलवार चर्चा होते. यातून व्यापक पातळीवर समन्वय साधला जातो. योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करतांना काही अडथळे येऊ शकतात, कामाची पुनरूक्ती होऊ शकते. हे सर्व कॅबिनेटमध्ये चर्चेद्वारे सोडवले जाते.

**५) आर्थिक नियंत्रण :**

एका बाजूने जर कॅबिनेट म्हणजे धोरण ठरवणारी सर्वोच्च यंत्रणा असते तर दुसऱ्या बाजूने कॅबिनेट देशाच्या आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण ठेवते. कॅबिनेट बैठकांत योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा सतत घेतला जातो, जर खर्च हाताबाहेर जात असेल तर उपाययोजना केली जाते.

**६) राष्ट्रपतींची राजवट :**

कलम ३५६ नुसार राज्यांत राष्ट्रपतींची राजवट लागू करता येते. जर राज्य सरकार घटनेतील तरतूदीप्रमाणे चालत नसेल तर राज्य सरकार बडतर्फ करून राष्ट्रपतींची राजवट लादता येते. असे निर्णय कॅबिनेट बैठकीत घेतले जातात.

**७) नेमणूका :**

कॅबिनेट बैठकांत महत्त्वाच्या नेमणूका पक्क्या केल्या जातात. राज्यपाल, राजदूत, मुख्य निवडणूक आयुक्त वगैरे नेमणूकांबद्दलचे निर्णय कॅबिनेट बैठकांत घेतले जातात. यासाठी कॅबिनेटची नेमणूकांबद्दलची एक उपसमिती [कॅबिनेट कमिटी ऑन अपॉईंटमेंट्स] असते.

## ६.५ सारांश

अशा प्रकारे केंद्रीय मंत्रीमंडळाची रचना आहे. यात प्रंतप्रधान हा प्रमुख आहेत तर प्रत्येक खात्याचे तीन मंत्री असू शकतात. मंत्रीमंडळावर प्रंतप्रधानाचे नियंत्रण असते. तरी मंत्रीमंडळाचे कार्य कार्यक्षमतेने होण्याची जबाबदारी पंतप्रधानावर असते.

## ६.४ प्रश्न :

१. राष्ट्रपतीच्या कार्ये आणि भूमिकांचे मूल्यांकन करा.
२. भारतीय राजकारणातील पंतप्रधान पदाचे महत्त्व सांगा.
३. पंतप्रधानाची कार्ये आणि भूमिकेची विश्लेषणात्मक चर्चा करा.
४. टिपा द्या.
   १) पंतप्रधान
   २) मंत्रिमंडळ
   ३) राष्ट्रपतीची भूमिका

❖❖❖❖

# ७

# न्यायव्यवस्था - भारताचे सर्वोच्च न्यायालय
# (Judiciary - Supreme Court of India)

**प्रकरणाची रचना :**

७.० उद्दिष्ट
७.१ प्रस्तावना
७.२ भारतीय न्यायव्यवस्था
७.३ भारतातील सर्वोच्च न्यायालयाची रचना आणि कार्ये
७.४ न्यायालयीन स्वातंत्र्य
७.५ सारांश
७.६ प्रश्न

## ७.० उद्दिष्ट

भारतीय न्यायव्यवस्थेची रचना, कार्ये आणि न्यायालयीन स्वातंत्र्याचा अभ्यास करणे.

## ७.१ प्रस्तावना

१) स्वातंत्र आणि मुक्त न्यायव्यवस्था २) न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा हक्क ३) एकेरी न्यायव्यवस्था ही भारतीय न्यायव्यवस्थेची मुख्य वैशिष्ट्ये आहेत. भारतीय राज्यघटनेने भारतामध्ये संघराज्य पद्धतीची स्थापना केली आहे. तरीही संघराज्याची आणि घटकराज्यांची वेगवेगळी न्यायालयीन व्यवस्था न स्वीकारता एकेरी न्यायव्यवस्था भारतात प्रस्थापित केली आहे. देशात एकात्मता वाढावी हा त्यामागे उद्देश होता. भारतात एकेरी न्यायव्यवस्था (Single Judiciary) असल्यामुळे सर्वोच्च स्थानी सर्वोच्च न्यायालय आहे. त्याखाली उच्च न्यायालये, जिल्हा न्यायालये, तालुका न्यायालये आहेत. सर्वोच्च व उच्च न्यायाधीशांच्या नेमणूका राष्ट्रपती करतात. सर्वोच्च व उच्च न्यायालये संघराज्याचे व घटकराज्यांचे कायदे राबवितात. अशाप्रकारे सर्वोच्च न्यायालयापासून ते तालुका न्यायालयापर्यंत संपूर्ण न्यायालयीन व्यवस्था एकात्मतेच्या तत्त्वावर आधारलेली आहे. भारतीय लोकशाही व्यवस्थेमध्ये कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ आणि न्यायमंडळ अशी सत्तेची विभागणी करण्यात आली. कायद्याचा अर्थ लावून न्याय देणारी शासनाची शाखा म्हणजे न्यायमंडळ होय.

## ७.२ भारतीय न्यायव्यवस्था

भारतात राज्यघटना सर्वोच्च आहे. राज्यघटनेतील तत्त्वांप्रमाणे प्रत्येकाला कार्य करावे लागते. राज्यघटनेतील तत्त्वे तीच असली, तरी बदलत्या काळात या तत्त्वांची अंमलबजावणी होत असते. राज्यघटनेच्या तत्त्वांचा अर्थ लावून राज्यघटनेचे संरक्षण करण्याचे कार्य न्यायालय करते. भारतात एकेरी न्यायव्यवस्था आहे. भारतातील २८ राज्यांसाठी आणि ७ केंद्रशासित प्रदेशांसाठी एकूण २१ उच्च न्यायालये भारतात आहेत. अंतिम न्यायालयाची भूमिका सर्वोच्च न्यायालय करीत असते.

## ७.३ सर्वोच्च न्यायालय (Sypreme Court)

२६ जानेवारी १९५० ला सर्वोच्च न्यायालयाची स्थापना झाली.

### ७.३.१ सर्वोच्च न्यायालयाची रचना :

**१) न्यायाधीशांची संख्या :**

सर्वोच्च न्यायालयात मुख्य न्यायाधीश आणि २५ इतर न्यायाधीश असतात. संसदेला कायदा करून न्यायधीशांची संख्या वाढविण्याचा अधिकार आहे.

**२) न्यायाधीशांची नियुक्ती :**

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायधीशांची नेमणूक राष्ट्रपती करतात. पंतप्रधान व कायदामंत्र्याच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपती न्यायाधीशांची नेमणूक करतात. सरन्यायाधीशांची नेमणूक करतांना राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयातील इतर न्यायाधीशांचा सल्ला घेतात. साधारणपणे ज्येष्ठ न्यायाधीशांची नेमणूक सरन्यायाधीश म्हणून करण्यात येते. इतर न्यायाधीशांची नेमणूक सरन्यायधीशांच्या सल्ल्यानुसार करण्यात येते.

**३) न्यायाधीशांच्या नेमणूकीसाठी पात्रता :**

१) ती व्यक्ती भारताचा नागरिक असली पाहिजे. २) उच्च न्यायालयाचा कमीत कमी ५ वर्षे सतत न्यायाधीश असावा. किंवा उच्च न्यायालयात १० वर्षे सतत वकिली केली असली पाहिजे. ३) राष्ट्रपतींच्या मते, ती व्यक्ती सुप्रसिद्ध कायदेपंडित असावी. प्रत्यक्षात सर्वोच्च न्यायालयाचे सर्व न्यायाधीश उच्च न्यायालयातून ज्येष्ठतेच्या तत्त्वावर नेमले जातात.

**४) कार्यकाल :**

न्यायाधीशांचे निवृत्तीवय ६५ वर्षे आहे. त्यामुळे न्यायाधीशाला कार्यकालाची निश्चितता मिळाली आहे.

**५) पदच्युति (Removal) :**

न्यायाधीशांना त्यांच्या जागेवरून बडतर्फ करता येते. परंतु त्यासाठी घटनेने विशिष्ट प्रकारची कठीण प्रक्रिया सांगितली आहे. न्यायाधीशांवर गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमतेचा आरोप

असेल आणि तसा ठराव संसदेच्या दोन्ही सभागृहांनी एकूण सभासद संख्येच्या बहुमताने व उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सभासदांच्या २/३ बहुमताने मंजूर केल्यावरच राष्ट्रपती न्यायाधीशाला पदभ्रष्ट करण्याचा आदेश काढतात. सर्वोच्च न्यायालयाचे स्वातंत्र्य अबाधित राहावे यासाठी ही कठीण प्रक्रिया ठेवली आहे.

**६) वेतन :-**

घटनेनुसार न्यायाधीशांचे वेतन व भत्ते यासंबंधी तरतूद केलेली आहे. सध्या मुख्य न्यायाधीशाला १,००,००० (एक लाख रुपये) व इतर न्यायाधीशांना ९०,००० (नव्वद हजार रुपये) वेतन देण्यात येते. याशिवाय संसदेने ठरविलेले भत्ते व इतर निवासस्थान त्यांना मिळते. त्यांचे वेतन व भत्ते संचीतनिधीतून दिले जातात. न्यायाधीशांना निवृत्तीनंतर निवृत्ती वेतन मिळते.

**७) सेवानिवृत्तीनंतर व्यवसाय करण्यास बंदी :-**

न्यायाधीशाला सेवानिवृत्तीनंतर भारतातील कोणत्याही न्यायालयात वकीली करता येत नाही. कारण निवृत्ती झालेले ज्येष्ठ न्यायाधीश वकीली करू लागले तर संबंधित न्यायालयातील न्यायाधीशांवर दबाव येण्याची शक्यता असते. न्यायधीशांना निवृत्तीनंतर शासनाने दिलेले काम करण्यास मात्र घटनेने मनाई केली नाही.

**८) कर्मचारी :-**

सर्वोच्च न्यायालयाचा स्वतंत्र कर्मचारी वर्ग असतो. त्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती, सेवाशर्ती आणि नियंत्रण न्यायालयातर्फेच होते. त्या कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, निवृत्ती वेतन व प्रशासकीय खर्च भारताच्या संचीत निधीतून देण्यात येतो.

**९) सवलती :-**

न्यायाधीशांच्या सर्व कृतींवर व निर्णयांवर कोणाला कसलीही टीका करता येत नाही. जर कुणी न्यायाधीशांवर टीका करण्याचा प्रयत्न केला तर त्या व्यक्तीला किंवा संस्थेला शिक्षा देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे.

**१०) स्थान :-**

सर्वोच्च न्यायालयाचे मुख्यालय दिल्ली येथे आहे. न्यायालयाच्या कामकाजाची भाषा इंग्रजी आहे. भारताच्या एकेरी न्यायालयीन रचनेमध्ये सर्वोच्च न्यायालय अंतिम आणि श्रेष्ठ आहे.

**७.३.२ तक्ता :- सारांश**

सर्वोच्च न्यायालयाची रचना

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| न्याया-धीशांची संख्या | पात्रता | नियुक्ती | कार्यकाल | पदच्युति | वेतन | बंदी | कर्मचारी | सवलती | स्थान |

### ७.३.३ सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार, कार्ये आणि भूमिका
### (Powers, Functions and Role of the Supremen Court)

सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार व कार्ये यासंबंधी विस्तृत तरतूदी घटनेने केलेल्या आहेत. या तरतूदी पुढील पाच गटांमध्ये विभागता येतात.

**तक्ता :-**

सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार व कार्ये

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| प्रारंभिक अधिकार क्षेत्र | पुनर्निर्णयाचे अधिकार क्षेत्र | सल्ला देण्याचे अधिकार क्षेत्र | न्यायालयीन पुनर्विलोकन | अभिलेख न्यायालय |

१) **प्रारंभिक अधिकार क्षेत्र (Original Jurisdiction) :**

ज्या खटल्यांची सुरुवात सर्वोच्च न्यायालयातच होऊ शकते, इतर कोणत्याही न्यायालयात जे खटले प्रथम दाखल करता येत नाहीत त्यांना सर्वोच्च न्यायालयाचे प्रारंभिक अधिकार म्हणतात. सर्वोच्च न्यायालयाच्या या अधिकारक्षेत्रात पुढील खटल्यांचा समावेश होतो.

१) भारत सरकार विरुद्ध घटकराज्य यांच्यातील वाद.

२) भारत सरकार आणि काही राज्य विरुद्ध इतर राज्य यांच्यातील वाद.

३) दोन घटक राज्यांमध्ये निर्माण झालेला वाद.

४) कोणत्याही केंद्रीय कायद्याच्या घटनात्मक वैधतेचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयातच प्रथम सुनावणीला येऊ शकतो.

५) मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी घटनात्मक उपाययोजना या हक्कानुसार जे आदेश देण्यात येतात, ते सर्वोच्च न्यायालय देऊ शकते.

**२) पुनर्निर्णयांचे अधिकार क्षेत्र (Appellate Jurisdiction) :**

भारतामध्ये एकेरी न्यायव्यवस्था आहे. सर्वोच्च न्यायालय अंतिम न्यायालय आहे. भारतातील उच्च न्यायालयांनी दिलेल्या निर्णयांवर पुनर्निर्णय देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला प्राप्त झाला आहे. सैनिकी न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर मात्र ते अपील ऐकू शकत नाहीत. खालील दाव्यांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयात अपील करता येते. १) घटनात्मक दावे २) दिवाणी दावे ३) फौजदारी दावे.

**१) घटनात्मक दावे (Cases involving interpretation of the constitution) :**

उच्च न्यायालयाच्या दाखल्यानंतरच घटनात्मक विश्लेषणासाठी अशाप्रकारचे दावे सर्वोच्च न्यायालयात दाखल केले जातात.

### २) दिवाणी दावे (Civil Cases) :

दिवाणी दाव्यांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यासाठी कमीत कमी २० हजार रुपये अंतर्भुत खटलेच असावेत अशी अट होती. परंतु आता ती रद्द करण्यात आली आहे. उच्च न्यायालयाने असे प्रमाणपत्र दिले की दावा सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यायोग्य आहे किंवा त्यामध्ये कायद्याचा महत्त्वाचा भाग अंतर्भुत आहे, म्हणजे सर्वोच्च न्यायालयात अपील करता येते.

### ३) फौजदारी दावे (Criminal Cases) :

फौजदारी दाव्यांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयात अपील करतांना पुढील तरतूदी लक्षात घेण्यात येतात.

अ) उच्च न्यायालयाने आरोपीस निर्दोष सोडून दिल्यास.
ब) उच्च न्यायालयाने आरोपीस फाशीची शिक्षा दिल्यास.
क) उच्च न्यायालयाने दावा सर्वोच्च न्यायालयाने चालविण्यायोग्य असल्याचा दाखला दिल्यास.

### ४) सल्ला देण्याचे अधिकार क्षेत्र (Advisery):

राष्ट्रपतींना सर्वोच्च न्यायालय कायदेशीर सल्ला देऊ शकते. कायद्याचा प्रश्न उपस्थित झाल्यास असा सल्ला राष्ट्रपती मागतात. हा सल्ला गुप्त स्वरूपाचा असतो. तो सल्ला मानलाच पाहिजे असे बंधन राष्ट्रपतींवर नसते.

### ५) न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार (Judicial Review) :

कायदेमंडळाने केलेला कायदा आणि कार्यकारी मंडळाने केलेली कृती घटनेशी सुसंगत आहे किंवा नाही ते तपासून पाहणे आणि सुसंगत नसल्यास रद्द ठरविणे. म्हणजे न्यायालयाचा न्यायालयीन पुनर्विलोकनाचा हक्क होय. भारतात घटना सर्वोच्च आहे. घटनेच्या संरक्षणाची जबाबदारी न्यायालयावर आहे. ती जबाबदारी पार पाडण्यास व नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करता यावे म्हणून सर्वोच्च न्यायालयाला हा हक्क देण्यात आला आहे.

### ६) अभिलेख न्यायालय (Court of Record) :

सर्वोच्च न्यायालय अभिलेख न्यायालय म्हणून कार्य करते. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाचे सर्व निर्णय व कार्यपद्धती यांची काळजीपूर्वक नोंद ठेवली जाते. पुढे उद्‌भवणाऱ्या तशाच प्रकारच्या खटल्यांच्या सुनावणीच्या वेळी या नोंदी मार्गदर्शक म्हणून उपयोगात येतात. एकप्रकारे या निर्णयांना कायद्याचे स्वरूप येते. हे निर्णय भारतातील सर्व न्यायालयांना बंधनकारक असतात.

**७.३.४ सर्वोच्च न्यायालयाचे स्थान आणि भूमिका (Position and Role of Supreme Court) :**

जगातील इतर देशांच्या न्यायालयांपेक्षा भारतातील सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार आणि कार्याचे स्वरूप आणि विस्तार व्यापक आहे. भारतीय सर्वोच्च न्यायालय खालील महत्त्वाच्या भूमिका पार पाडते.

**१) संघीय न्यायालय (Federal Court) :**

भारतात संघराज्य पद्धती असूनसुद्धा केंद्र व राज्याचे अशी दुहेरी न्यायव्यवस्था नाही. त्यामुळे केंद्र व राज्य, राज्य व राज्य यांच्यातील वाद सोडविण्याचे कार्य सर्वोच्च न्यायालय करते त्यासाठीच सर्वोच्च न्यायालयाला प्रारंभिक अधिकारक्षेत्र दिले आहे. या अधिकारामुळे सर्वोच्च न्यायालय भारतात संघीय न्यायालयाची भूमिका करीत असते.

**२) घटनेचे संरक्षण (Guardian of the Constitution) :**

घटनेचे संरक्षण आणि सर्वोच्चता जबाबदारी न्यायालय पार पाडीत असते. त्यासाठीच न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला देण्यात आला आहे.

**३)** भारतात अंतिम न्यायालयाची भूमिका सर्वोच्च न्यायालय पार पाडते. (Final Court of appeal) आणि सर्वोच्च एकेरी न्यायव्यवस्थेच्या रचनेमध्ये भारतात सर्वोच्च न्यायालय अंतिम (Final) न्यायालय आहे.

**४)** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांना कायद्याचे स्वरूप प्राप्त होते. त्याचा उपयोग इतर न्यायालयांना करता येतो. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश इतर न्यायालयांना बंधनकारक असतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) भारताच्या सर्वोच्च न्यायालयाची अधिकार क्षेत्रे सांगा.
२) "सर्वोच्य न्यायालय" यावर टिप लिहा.

---

## ७.४ न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य (Independence of Judiciary)

भारतीय न्यायव्यवस्था मुक्त व स्वतंत्र आहे. त्यासाठी घटनेने खास तरतूदी केल्या आहेत.

### ७.४.१ न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य म्हणजे काय? :

न्यायाधीशांना कोणाचीही भीति न बाळगता किंवा कोणाच्याही दबावाला व प्रलोभनाला बळी न पडता (Without Fear and Favour) नि:पक्षपातीपणे कार्य करता यावे यासाठी न्यायव्यवस्था कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ आणि शासनाच्या इतर घटकांपासून त्यांच्या हस्तक्षेपापासून, व प्रभावापासून मुक्त असणे म्हणजेच न्यायालयीन स्वातंत्र्य होय.

### ७.४.२ न्यायालयीन स्वातंत्र्याचे महत्त्व :

राज्यघटना, मूलभूत हक्क आणि लोकशाहीचे रक्षण करण्याचे काम न्यायालय करतात. सर्वप्रकारची प्रलोभने, दबाव, हस्तक्षेपांपासून न्यायालये मुक्त असेल तरच नि:पक्षपातीपणे आपले कार्य करू शकतात. म्हणून स्वतंत्र व मुक्त न्यायव्यवस्था आवश्यक असते. त्याप्रमाणे घटनात्मक तरतूदी करुन भारतात स्वतंत्र व मुक्त न्यायव्यवस्था निर्माण करण्यात आली आहे.

### ७.४.३ न्यायालयीन स्वातंत्र्यासाठी घटनात्मक तरतूदी खालील प्रमाणे आहेत (Constitutional Provisions) :

### १) न्यायाधीशांची पात्रता व नेमणूक (High Qualifications and appointment)

न्यायाधीशांच्या नियुक्तीमध्ये राजकारण येऊ नये म्हणून न्यायाधीशांसाठी उच्च दर्जाची पात्रता याविषयीची तरतूद घटनेप्रमाणे आहे. उदा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांसाठी उच्च न्यायालयात ५ वर्षे न्यायाधीश किंवा १० वर्षे वकीली केली असली पाहिजे. न्यायाधीशांची नेमणूक राष्ट्रपती करीत असेल ती न्यायाधीशांची नेमणूक करतांना राष्ट्रपतींना सरन्यायाधीश आणि इतर न्यायाधीशांशी सल्लामसलत करावी लागते.

### २) न्यायाधीशांना कार्यकालाची सुरक्षा (Security of Tenure) :

घटनेने न्यायाधीशांचा कार्यकाल निश्चित केला आहे. वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत ते आपल्या पदावर राहतात. न्यायाधीशांचा पदच्यूत करण्याची प्रक्रिया अतिशय कठीण असल्यामुळे त्यांना आपल्या कार्यकालाची शाश्वती वाटते आणि कोणत्याही दडपणाखाली न येता ते काम करु शकतात.

### ३) भरपूर वेतन, सुखसोयी, भत्ते देण्यात येतात :

न्यायाधीश प्रलोभनाला, आणि भ्रष्टाचाराला बळी पडू नये म्हणून न्यायधीशांना भरपूर वेतन व भत्ते देण्यात येतात.

### ४) निर्भयतापूर्वक कार्य करण्याची शपथ (Oath to work fearlessly) :

प्रत्येक न्यायाधीशाला पदग्रहण करण्यापूर्वी निर्भयतापूर्वक कार्य करण्याची अणि घटनेचे रक्षण करण्याची शपथ घ्यावी लागते.

### ५) निवृत्तीनंतर वकिली करण्यास प्रतिबंध (Prohibition of Practice after Retirement) :

निवृत्तीनंतर कोणत्याही न्यायाधीशाला भारतातील कोणत्याही न्यायालयात वकिली करण्यास प्रारंभ केल्यास त्या न्यायालयातील इतर न्यायाधीशांवर दडपण येण्याची शक्यता असते. म्हणूनच घटनेनुसार न्यायाधीशांना निवृत्तीनंतर वकिली करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

### ६) स्वतःच्या कार्यप्रणालीसंबंधी नियम करण्याचा अधिकार (Powers to make rules to regulate their procedure) :

आपल्या न्यायालयीन अधिकारक्षेत्रामध्ये आदेश देण्याचा आणि आपल्या कार्यप्रणालीसंबंधी नियम करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे.

### ७) कर्मचारी वर्गावर नियंत्रण (Control over establishment) :

सर्वोच्च न्यायालयाचा स्वतंत्र कर्मचारी वर्ग असतो. न्यायालयातील कर्मचारी वर्गाची नियुक्ती मुख्य न्यायाधीशातर्फे होते. तसेच त्यांच्या सेवाशर्ती ठरविण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयालाच आहे.

### ८) टिकेपासून मुक्तता (Free from criticism) :

न्यायालयावर टिका करून, न्यायालयाचा अपमान करणाऱ्या व्यक्ती व संस्थांवर उचित कार्यवाही करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. त्यामुळे न्यायाधीश सर्वतऱ्हेचे दबाव, दडपण, धमक्यांपासून मुक्त राहू शकतात. अशाप्रकारे न्यायालयीन स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी घटनाकारांनी अनेक तरतूदी केल्या आहेत.

### ७.४.४ न्यायालयीन स्वातंत्र्याचा मार्गात निर्माण झालेले धोके :

१) शासकीय दादागिरी व त्यांची अनावश्यक लुडबुड - न्यायालयीन व्यवस्थेमध्ये हस्तक्षेप करण्याचा शासनाने अनेकदा प्रयत्न केला आहे. १९७४ मध्ये ज्येष्ठताक्रमानुसार सरन्यायाधीशांची नेमणूक करण्याऐवजी न्या. ए. एन. रे यांची सरन्यायाधीश पदावर नियुक्ती करण्यात आली होती. १९७५ ते १९७७ च्या आणीबाणीच्या काळात उच्च न्यायालयाच्या सुमारे १६ न्यायाधीशांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. अशाप्रकारे कार्यकारीमंडळ अति शक्तीशाली असेल तर न्यायालयीन व्यवस्थेमध्ये हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करतात आणि अशावेळी न्यायालयाचे स्वातंत्र्य धोक्यात येऊ शकते.

२) सर्वसामान्य मानवी प्रवृत्तीप्रमाणे काही न्यायाधीश भ्रष्टाचारी व जातीय प्रवृत्तीचे आढळतात. प्रलोभनाला ते बरेचदा बळी पडतात.

३) अनेक न्यायाधीश राजकीय महत्त्वाकांक्षा बाळगतात. निवृत्त झाल्यानंतर राजदूत, राज्यपाल पद मिळेल या आशेने कार्य करतात. त्यामुळे ते निपक्षपातीपणे कार्य करू शकत नाही.

४) न्यायाधीशांच्याही स्वतःच्या आवडीनिवडी, मूल्ये असतात त्याचा प्रभाव त्यांच्या कार्यावर पडतो.

## ७.५ सारांश

स्वतंत्र न्यायव्यवस्था भारतीय राजकीय व्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहे. आतापर्यंत भारतीय न्यायालयांनी स्वतंत्रपणे व मुक्तपणे राहून महत्त्वपूर्ण भूमिका केली आहे.

### ७.५.१ तक्ता :

न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य

- १ न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्याचा अर्थ
- २ महत्त्व
- ३ स्वातंत्र्यासाठी घटनात्मक तरतूदी
  - १) पात्रता
  - २) नेमणूक
  - ३) सुरक्षा कार्यकालीन
  - ४) वेतन भत्ते
  - ५) निर्भयतेची शपथ
  - ६) निवृत्तीनंतरचे प्रतिबंध
  - ७) स्वतंत्र कर्मचारी वर्ग व कार्यप्रणाली
  - ८) टिकेपासून मुक्तता
- ४ धोके
  - १) शासकीय लुडबुड
  - २) मानवी प्रवृत्ती
  - ३) न्यायधीशांची महत्त्वाकांक्षा
  - ४) न्यायाधीशाचा स्वभाव

## ७.६ प्रश्न

१) सर्वोच्च न्यायालयाची रचना यावर लिहा.

२) सर्वोच्च न्यायालयाची कार्ये आणि अधिकारांची चर्चा करा.

३) भारतीय न्यायव्यवस्था वैशिष्ट्यपूर्ण आहे स्पष्ट करा.

४) न्यायालयीन स्वातंत्र्य म्हणजे काय ? त्यासाठी राज्यघटनेमध्ये कोणत्या तरतूदी आहेत ?

५) टिपा :- १) न्यायालयीन पुनर्विलोकन
२) एकेरी न्यायव्यवस्था
३) सर्वोच्च न्यायलयाची भूमिका

❖❖❖❖

# ८

# संघराज्यात्मक संरचना आणि त्याचे बदलते स्वरुप
# (Indian Federal System)

**प्रकरणाची रचना :**

८.० उद्दिष्ट
८.१ प्रस्तावना
८.२ भारताची संघराज्याचे स्वरूप
८.३ भारतीय संघराज्याच्या केंद्राकर्षी प्रवृत्ती
८.४ सारांश
८.५ प्रश्न

## ८.० उद्दिष्ट :

भारतीय संघराज्यात २८ घटकराज्ये आणि ७ केंद्रशासितराज्याचा समावेश होतो. भारतीय संघराज्य इतर देशांतील संघराज्यापेक्षा वैशिष्ठपूर्ण आहे. त्यादृष्टीने भारतीय संघराज्याच्या स्वरूपाचा अभ्यास करणे आणि समजावून घेणे हे या पाठाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

## ८.१ प्रस्तावना :

जगातील राज्यव्यवस्था अभ्यासल्यानंतर असे दिसून येते की साधारणपणे दोन प्रकारच्या राज्यव्यवस्था आहेत. उदा. अमेरिका या देशात संघराज्य पद्धती आहे. इंग्लंडमध्ये एककेंद्री व्यवस्था आहे. भारतीय संघराज्य केंद्राकर्षी संघराज्य आहे. भारतीय संघराज्याला ‘अर्धसंघराज्य’ म्हणतात.

## ८.२ भारताची संघराज्याचे स्वरूप

### ८.२.१ भारतीय संघराज्याचे स्वरूप व वैशिष्ट्ये दाखविणारा सारांशरुपी तक्ता खालीलप्रमाणे आहे :

**केंद्राकर्षी स्वरूपाचे संघराज्य**

भारतीय राज्याची चौकट संघराज्याची आहे.
(Framework Federal)

वैशिष्ट्ये
१) दुहेरी शासन व्यवस्था – केंद्र / राज्य
२) केंद्र व राज्यात अधिकाराची विभागणी
३) लिखित राज्यघटना व घटनेची सर्वोच्चता
४) न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा हक्क

भारतीय राज्याचा आत्मा एककेंद्री आहे.
(Soul Unitary)

वैशिष्ट्ये
१) केंद्राकर्षी संघराज्य विशिष्ट हेतूने निर्मित आहे.
२) अधिकार विभागणी केंद्राकडे झुकणारी आहे.
३) संसदेला घटनादुरुस्तीचा अधिकार
४) एकच घटना
५) राज्यपाल - केंद्राकडून निर्वाचित
६) आणीबाणीच्या काळात एककेंद्री स्वरूप प्राप्त होते.
७) घटकराज्यांना समान प्रतिनिधीत्व नाही
८) एकेरी नागरिकत्व
९) एकेरी न्यायव्यवस्था
१०) अखिल भारतीय नोकऱ्यांवर केंद्राचे नियंत्रण
११) कलम ३५६

### ८.२.२ भारतीय संघराज्याचे स्वरूप (Nature of Indian Federation) :

भारतीय संघराज्यामध्ये संघराज्य व एकात्मपद्धतीचे मिश्रण दिसून येते. व्हिअर यांच्या मते भारतीय संघराज्य 'निम - संघराज्य' (Quasi-federal) आहे. काहींच्या मते भारतीय संघराज्य 'सौदेबाजीचे संघराज्य' (Bargaining Federation) आहे. भारतीय राज्याची चौकट (Frame) संघराज्याची आहे पण आत्मा (Soul) केंद्राकर्षी आहे.

### ८.२.३ भारतात केंद्राकर्षी प्रवृत्तीचे संघराज्य निर्माण करण्याची कारणे :

भारत भौगोलिक दृष्टीने आणि लोकसंख्येने मोठा विस्तार असलेला देश आहे. अशा देशात राज्य कारभाराच्या सोयीच्या दृष्टीने संघराज्य व्यवस्था योग्य होती. परंतु भारताचा मुख्य प्रश्न म्हणजे देशाचे ऐक्य व एकात्मता राखणे हा होता. भारतात विविध भाषा, धर्म, प्रादेशिक विविधता आहे. या विविधतेमुळे विघटनात्मक प्रवृत्ती निर्माण झाल्यास त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि देशाचे ऐक्य राखण्यासाठी केंद्रसरकार मजबूत असणे आवश्यक होते. म्हणून भारतात केंद्राकर्षी स्वरूपाच्या संघराज्याची निर्मिती करण्यात आली.

### ८.२.४ भारतीय संघराज्याची वैशिष्ट्ये :

#### १) दुहेरी शासन व्यवस्था (Two sets of govt) :

केंद्रसरकार आणि राज्यसरकार अशी दुहेरी शासनव्यवस्था भारतात आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये ('युनियन ऑफ स्टेटस') 'भारत हा राज्याचा संघ' आहे असा शब्दप्रयोग केला आहे. २८ घटकराज्ये आणि ७ केंद्रशासित प्रदेश भारतीय संघराज्यात आहेत. केंद्रसरकार व राज्यसरकार अशी दुहेरी शासनव्यवस्था भारतीय संघराज्याची आहे परंतु कोणत्याही घटकराज्याला भारतीय संघराज्यातून फूटून निघण्याचा अधिकार नाही.

#### २) अधिकारांची विभागणी (Division of powers) :

केंद्रसरकार आणि घटकराज्यसरकार यांच्यात अधिकारांची निश्चित विभागणी घटनेप्रमाणे करण्यात आली आहे. केंद्र आणि राज्य यांच्यात राज्यकारभाराचे विषय वाटून दिलेले आहेत ही विषयांची वाटणी खालीलप्रमाणे आहे. केंद्रसूचीत ९७, राज्यसूचीत ६६ व समवर्ती सूचीत ४७ विषय आहेत. केंद्रसूची केंद्रसरकारकडे आहे. राज्यसूची राज्यसरकारकडे आहे. आणि समवर्तीसूचीतील विषयांवर कायदे करण्याचा अधिकार दोन्ही शासनाला आहे. सर्व शेषसत्ता (Residary powers) केंद्रसरकारकडे आहेत.

#### ३) लिखित राज्यघटना आणि घटनेची सर्वोच्चता (Written Constitution and Supremacy of the Constitution) :

संघराज्यव्यवस्थेला निश्चितता आणि स्पष्ठता देण्याच्या दृष्टीने लिखित राज्यघटना आणि घटनेची सर्वोच्चता हे तत्त्व भारतीय व्यवस्थेत आहे.

**४) सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा आणि संघीय न्यायालय म्हणून भुमिका करण्याचा अधिकार आहे.** त्यामुळे सर्वोच्च न्यायालय घटनेची सर्वोच्चता राखण्याचे आणि केंद्र व राज्य सरकार यांच्यातील वाद सोडविण्याचे कार्य करते.

### ८.२.५ एकूण :

निष्कर्षतः असे दिसून येते की भारतीय राज्याची चौकट संघराज्याची आहे, संघराज्याची जी सर्वसाधारण वैशिष्ट्ये असतात ती भारतीय संघराज्यामध्ये वरीलप्रमाणे दिसून येतात. परंतु जगातील इतर देशांच्या संघराज्यापेक्षा भारतीय संघराज्यव्यवस्था खालील बाबतीत भिन्न आहे. भारतीय संघराज्य एककेंद्री व्यवस्थेकडे झुकणारे आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) भारतीय संघराज्याचे स्वरुप थोडक्यात स्पष्ट करा.

२) भारतीय संघराज्याची वैशिष्ट्ये लिहा.

## ८.३ भारतीय संघराज्याची केंद्राकर्षी प्रवृत्ती दाखविणारी वैशिष्ट्ये :

### १) संघराज्यनिर्मिती पद्धती (The Mode of Formation) :

अनेक सार्वभौम राज्ये एकत्र येऊन स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यासाठी परस्परात करार करून केंद्रसरकारला अधिकार देतात आणि इतर अधिकारांच्या बाबतीत स्वायत्त असतात. अशा पद्धतीने अमेरिकेतील संघराज्य अस्तित्त्वात आले आहे. भारतीय संघराज्य अशा प्रकारच्या ऐच्छिक करारातून निर्माण झाले नाही. १९३५ पर्यंत भारतात एककेंद्री व्यवस्था होती. १९३५ च्या कायद्याद्वारे संघराज्यव्यवस्था भारतात निर्माण केली होती. त्यानंतर ऐक्य आणण्याच्या दृष्टीने 'भारतीय राज्यांचा संघ' निर्माण करण्यात आला. केंद्रसरकार प्रबळ करण्यात आले.

### २) अधिकारांची विभागणी केंद्राकडे जास्त झुकणारी आहे :

भारतीय संघराज्यामध्ये केंद्र आणि राज्यात अधिकारांची समान विभागणी नाही. केंद्रसरकारकडे राष्ट्रीय दृष्टीने महत्त्वाचे असे ९७ विषय आहेत. राज्यसरकारकडे स्थानीय दृष्टीने महत्त्वाचे असे ६६ विषय आहेत. राज्यसभेने २/३ बहुमताने ठराव संमत केला तर संसद राज्यसूचीतील विषयांवरही कायदा करू शकते. समवर्तीसूचीतील ४७ विषयांवर केंद्रसरकार व राज्यसरकार यांना कायदे करण्याचा अधिकार असला तरी केंद्रसरकारचे कायदे सर्वोच्च समजण्यात येतात. सर्व शेषसत्ता केंद्राकडे आहेत. यावरून केंद्रकरकार आणि राज्यसरकार यांच्यात असलेली अधिकार विभागणी केंद्राकडे झुकणारी आहे असे दिसते.

### ३) घटनादुरुस्तीचा अधिकार संसदेला :

भारतात घटनादुरुस्तीचा अधिकार फक्त संसदेला आहे. राज्याच्या कायदेमंडळाला घटनादुरुस्तीचा अधिकार नाही. घटकराज्याचे नांव, सीमा बदलणे, नवीन घटकराज्य निर्माण करणे घटकराज्यांची संमती न घेताच केंद्रसरकार करू शकते. अमेरिकेतील संघराज्य पद्धतीत घटकराज्यांच्या संमतीशिवाय घटनेत दुरुस्ती केली जात नाही. अमेरिकेतील संघराज्यात घटकराज्यांना अधिक स्वायत्तता देण्यात आली आहे.

### ४) एकच घटना :

संपूर्ण भारताची एकच राज्यघटना आहे. अपवाद जम्मू काश्मीर राज्य. भारतात कोणत्याही घटकराज्याला स्वतःची स्वतंत्र राज्यघटना निर्माण करण्याचा अधिकार नाही.

भारतात केंद्र व राज्यांची मिळून एकच राज्यघटना आहे. अमेरिकेत घटकराज्यांची घटना वेगळी आहे.

**५) राज्यपाल :**

अमेरिकेत घटकराज्यांचे राज्यपाल (Governer) त्या राज्याच्या जनतेने निवडलेले असतात. भारतात मात्र राष्ट्रपती राज्यपालांची नेमणूक करतात व राष्ट्रपतींची इच्छा असेल तोपर्यंत ते आपल्या पदावर राहतात. वास्तवात राज्यपाल राज्याचा प्रमुख असतो. परंतु राज्यपाल केंद्राचा हस्तक म्हणून काम करतात. राज्यपालांद्वारे केंद्रसरकार आपले नियंत्रण अप्रत्यक्षपणे राज्यावर प्रस्थापित करते.

**६) आणीबाणीच्या काळात :**

भारतात आणीबाणीच्या काळात संघराज्याचे रूपांतर एककेंद्री शासनात होत असते. संपूर्ण भारतात केंद्रसरकारची सत्ता प्रस्थापित होते.

**७) घटकराज्यांना समान प्रतिनिधीत्व नाही :**

अमेरिकेतील संघराज्यात राज्यांना सिनेटमध्ये प्रत्येकी दोन प्रतिनिधी पाठविण्यात येतात. राज्य लहान किंवा मोठे असले तरी सर्व राज्यांना केंद्रामध्ये समान प्रतिनिधीत्व आहे. परंतु भारतीय संघराज्यात घटकराज्ये राज्यसभेत लोकसंख्येप्रमाणे प्रतिनिधी पाठवितात. त्यामुळे घटकराज्यांच्या हिताचे समान संरक्षण होत नाही.

**८) एकेरी नागरिकत्व :**

अमेरिकेतील संघराज्याप्रमाणे भारतात दुहेरी नागरिकत्वाची पद्धत नाही. भारतामध्ये एकेरी नागरिकत्व आहे. भारतातील प्रत्येक व्यक्ती फक्त 'भारतीय नागरिक' असतो. नागरिकत्वासंबंधीचे कायदे करण्याचा अधिकार फक्त केंद्रसरकारलाच आहे.

**९) एकेरी न्यायव्यवस्था :**

इतर संघराज्याप्रमाणे भारतात दुहेरी न्यायव्यवस्था नाही. भारताच्या एकेरी न्यायव्यवस्थेतेमध्ये सर्वोच्च न्यायालय अंतिम व सर्वोच्च न्यायालय आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतर्गत दुय्यम न्यायालये कार्य करतात.

**१०)** निर्वाचन आयोग, नियोजन मंडळ, अखिल भारतीय नोकऱ्या या महत्त्वपूर्ण आयोगांवर व मंडळांवर केंद्राचे नियंत्रण आहे.

**११)** कलम ३५६-प्रमाणे राष्ट्रपती एखाद्या राज्यामध्ये राष्ट्रपती राजवटीची घोषणा करु शकतात. घटनात्मक शासन अयशस्वी झाले आणि त्या राज्याची कायदा व सुव्यवस्था धोक्यात आहे असे सांगून त्या राज्यात राष्ट्रपती राजवट घोषीत करुन त्या राज्याचा कारभार केंद्रशासन आपल्याकडे घेऊ शकते. एखाद्या राज्यात सशस्त्र दल पाठविण्याचा अधिकारही केंद्रसरकारला आहे.

## ८.४ सारांश

भारतीय संघराज्याच्या या वैशिष्ट्यांवरून भारतीय संघराज्य केंद्राकर्षी आहे किंवा भारतीय राज्याची चौकट संघराज्याची आणि आत्मा एककेंद्री आहे हे स्पष्ट होते.

## ८.४ प्रश्न :

१) भारतीय संघराज्याचे स्वरूप स्पष्ट करा.

२) भारतीय राज्यघटना संघराज्यात्मक आहे ? कारणे द्या.

३) भारतात केंद्राकर्षी स्वरूपाचे संघराज्य आहे या विधानावर भाष्य करा.

४) टिपा :- १) भारतीय संघराज्यापद्धती.

२) भारतीय संघराज्यातील केंद्राकर्षी प्रवृत्ती.

❖❖❖❖

# ९

# केंद्र - राज्य संबंध

**प्रकरणाची रचना :-**

९.० उद्दिष्ट
९.१ प्रस्तावना
९.२ केंद्रराज्य कायदेविषयक संबंध
९.३ केंद्रराज्य कार्यकारी प्रशासकीय संबंध
९.४ केंद्रराज्य आर्थिक संबंध
९.५ केंद्रराज्य संबंधांचे बदलते स्वरूप
९.६ सारांश
९.७ प्रश्न

## ९.० उद्दिष्ट

भारतीय संघराज्याचे स्वरूप अभ्यासल्यानंतर संघराज्य व्यवस्थेचे कामकाज कसे चालते. त्यावरून केंद्र आणि राज्यांमध्ये कोणते संघर्ष उदयास आले आहेत. राज्यांची स्वायत्तत्ता म्हणजे काय इत्यादी समजून घेणे या पाठाचे उद्दिष्ट आहे.

## ९.१ प्रस्तावना

दिवसेंदिवस भारतात केंद्रसरकार आणि राज्यसरकार यांच्यात सहकार्यापेक्षा संघर्ष असल्याचे दिसून येते. राज्याच्या स्वायत्तत्तेचा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. वास्तविकपणे भारताची एकता आणि एकात्मता संरक्षित करण्याच्या उद्देशाने भारतीय घटनाकारांनी केंद्रसरकार मजबुत आणि शक्तिशाली बनविले होते. म्हणूनच भारतीय संघराज्य व्यवस्था केंद्राकर्षी प्रवृत्तीचे दिसून येते. १९६७ पर्यंत साधारणपणे केंद्र आणि राज्यांमध्ये सहकार्याचे संबंध होते. तोपर्यंत राज्याच्या स्वातत्तत्तेचा प्रश्न उद्‌भवला नव्हता. १९६७ साली आठ राज्यांमध्ये काँग्रेस सोडून इतर राजकीय पक्षांचे शासन प्रस्थापित झाले आणि राज्यांच्या स्वायत्तत्तेचा प्रश्न तेव्हापासून उदयास आला. केंद्रसरकार आणि राज्यसरकार यांच्यात संघर्ष व्हायला लागले. त्यादृष्टीने या प्रकरणामध्ये भारतीय संघराज्याची वास्तवात कामकाजापद्धती कशी आहे. विशेषतः २० व्या आणि २१ व्या शतकामध्ये केंद्र राज्य यांच्यात तणावाचे वातावरण का निर्माण झाले इत्यादीचा उहापोह या प्रकरणात केला आहे.

## १.२ केंद्र - राज्य संबध

भारतीय संघराज्याचे बाह्य स्वरूप म्हणजे राज्याची चौकट संघराज्याची आहे; परंतु भारतीय राज्याचा आत्मा एककेंद्री स्वरूपाचा आहे. केंद्र आणि राज्य संबंध स्पष्टता आणि निश्चितता यावी यादृष्टीने केंद्र आणि राज्यांमध्ये कसे संबंध असावे ते घटनेद्वारा निश्चित करण्यात आले आहे.

### १.२.१ केंद्र व राज्य सरकारांचे परस्पर संबंध खालीलप्रमाणे आहेत (Relationship between centre and state govts) :

भारतीय राज्यघटनेच्या कलम २४५ ते २९३ व ७ व्या परिशिष्टात केंद्र व राज्य सरकारे संबंधविषयक तरतूदी आहेत. हे संबंध निश्चित करतांना राष्ट्रीय एकात्मता आणि घटकराज्यांची स्वायत्तत्ता जपण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. केंद्र व राज्यांचे संबंध खालील प्रमाणे तीन प्रकारात विभागता येतात.

१) केंद्र व राज्य यांचे कायदेविषयक संबंध (Centre-state Legislative Relationship)

२) केंद्र व राज्य यांचे प्रशासकीय संबंध (Administrative Relationship)

३) केंद्र व राज्य यांचे आर्थिक संबंध (Financial Relationship)

### १.२.२ केंद्र व राज्य यांचे कायदेविषयक संबंध (Legislative Relationship):

राज्यघटनेच्या सातव्या परिशिष्टात केंद्रसरकार व राज्यसरकार यांच्यात केंद्रसूची, राज्यसूची व समवर्तीसूची अशाप्रकारे अधिकारविभागणी करण्यात आली आहे.

१) केंद्रसूची (Union List) सर्व भारताशी ज्या विषयांचा संबंध येऊ शकेल किंवा ज्या विषयांच्या बाबतीत देशभर एकच धोरण असावे अशी अपेक्षा होती ते राष्ट्रीय दृष्टीने महत्त्वाचे विषय केंद्रसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. या विषयांची संख्या ९७ आहे. संरक्षण, उद्योगधंदे, अणूशक्ती, पोस्ट तार, दळणवळण, रेल्वे इत्यादी विषयांवर कायदे करण्याचा अधिकार केवळ संसदेलाच देण्यात आला आहे.

२) राज्यसूची (State Line) यात ६६ विषयांचा समावेश आहे. साधारणपणे स्थानिक दृष्टीने महत्त्वाचे विषय उदा. पोलीस, तुरूंग, आरोग्य, शेती इत्यादी विषयांवर कायदे करण्याचा अधिकार घटकराज्यांच्या कायदेमंडळांना आहे.

३) समवर्तीसूची (Concurrent List) यामध्ये ४७ विषय असून त्यावर केंद्र व राज्य दोन्ही शासनांना कायदे करता येतात. केंद्र व राज्य यांच्या कायद्यात संघर्ष झाला तर राज्यसरकारचा कायदा रद्द समजला जातो. केंद्रशासनाने केलेला कायदा लागू करण्यात येतो.

४) शेषसत्ता (Residury power) वरील तीन याद्यांमध्ये समाविष्ट नसलेल्या विषयांना शेषसत्ता म्हणतात. यावर कायदे करण्याचा अधिकार केंद्रसरकारला आहे.

५) खालील विशिष्ट परिस्थितीत राज्यसूचीतील विषयांवरही कायदे करण्याचा अधिकार केंद्र सरकारला प्राप्त होतो. :-

अ) आणीबाणीच्या परिस्थितीत. ब) राज्यसूचीतील एखादा विषय राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाचा वाटला तर राज्यसभा २/३ बहुमताने ठराव संमत करून त्या विषयावर कायदा करण्याचा अधिकार संसदेला देऊ शकते. क) दोन किंवा अधिक घटकराज्यांच्या विधिमंडळांनी केंद्रसरकारला तशी विनंती केली तर. ड) परराष्ट्राबरोबर तह, करार यांचे पालन करण्यासाठी राज्यसूचीतील एखाद्या विषयावर कायदा करण्याचा अधिकार संसदेला प्राप्त होऊ शकतो. इ) एखाद्या घटकराज्यात घटनात्मक शासन अयशस्वी झाले आणि राष्ट्रपतींनी त्या घटक राज्यात आणीबाणी पुकारली तर तेथील विधिमंडळाचे सर्व अधिकार संसद स्वतःकडे घेते. ई) एखाद्या राज्यात कायदा आणि सुव्यवस्था ह्यांना धोका उत्पन्न झाल्यामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती नाहिशी करण्यासाठी केंद्रसरकारला सशस्त्र दल त्या घटकराज्यात पाठविण्याचा अधिकार आहे.

### १.२.३ निष्कर्ष :

केंद्र आणि राज्य यांच्या कायदेविषयक संबधांच्या बाबतीत राज्यघटनात्मक तरतूदी वरून असे दिसून येते की, केंद्र व राज्य यांच्या कायदेविषयक संबंधाच्याबाबतीत घटकराज्यांवर केंद्राचेच वर्चस्व आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) केंद्र व राज्य सरकारच्या कायदेविषयक सबंधावर भाष्य करा.

---

---

---

---

## १.३ केंद्र व राज्य प्रशासकीय संबंध (Administrative Relationship)

### १) विधिविषयक अधिकारांशी समांतर :

केंद्र व राज्यसरकारचे कार्यकारी अधिकार त्यांच्या विधिविषयक अधिकारांशी समांतर आहेत. म्हणजे संसदेला ज्या विषयांच्या बाबतीत कायदे करण्याचे अधिकार आहेत. त्या केंद्रसूचीतील विषयांवरील कायद्यांच्या अंमलबजावणीचे अधिकार केंद्रसरकारला आहेत. राज्याच्या कायदेमंडळांना राज्यसूचीतील विषयांवर कायदे करण्याचे अधिकार आहेत. त्याबाबतीत अंमलबजावणीचे अधिकार राज्यसरकारला आहेत.

**२) राज्यसरकारांना मार्गदर्शन करणे (Direction to state Govts) :**

शंसदेने निर्माण केलेल्या कायद्याच्या मार्गात अडचणी निर्माण होऊ नये म्हणून राज्यसरकारांनी आपली कार्यकारी सत्ता कशी वापरावी, ह्यासंबंधी केंद्रसरकार घटक सरकारांना सूचना देऊ शकते आणि त्या सूचनांचे पालन करणे घटकसरकारांवर बंधनकारक आहे.

**३) केंद्रसरकार राज्यसरकारांना आदेश देऊ शकते :**

राष्ट्रीय आणि लष्करी महत्त्वाच्या दळणवळणाच्या साधनांची उभारणी, त्याची सुव्यवस्था ठेवण्यासाठी केंद्रसरकार घटकसरकारांना आदेश देऊ शकते. त्या आदेशाचे पालन करणे घटकसरकारांवर बंधनकारक आहे.

**४) केंद्रसरकारची कार्ये राज्यसरकारवर सोपविणे :**

केंद्रीय कार्यकारी मंडळ आपल्या अधिकारक्षेत्रातील कोणतेही कार्य राज्यसरकारच्या संमतीने राज्यसरकारवर सोपवू शकते. उदा. सार्वत्रिक निवडणूकांच्या वेळी

**५) अखिल भारतीय नोकऱ्यांच्या बाबतीत :**

(IAS, IPS) या सेवेतील अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याचा, त्यांना प्रशिक्षण देण्याचा व राज्यांना त्यांच्या सेवा उपलब्ध करून देण्याचा अधिकार केंद्रसरकारला आहे. घटकराज्यातील प्रशासनामध्ये सर्व उच्चपदांवर या अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाते. ते केंद्रसरकारचे कर्मचारी असल्याने त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाईचा अधिकार राज्यशासनाला नाही.

**६) आंतरराज्यीय परिषद आणि व्यापार आयोग :**

राज्याराज्यातील वादग्रस्त प्रश्न, समान धोरणाचे प्रश्न, राज्य आणि केंद्र यांच्या हितसंबंधाची चौकशी करणे इत्यादीसाठी आंतरराज्यीय परिषद (Inter State Council) निर्माण करण्याचा अधिकार केंद्रसरकारला आहे.

राज्याराज्यातील व्यापार, व्यवसाय यासाठी आंतरराज्यीय व्यापार समिती निर्माण करण्याचा अधिकार संसदेला आहे.

**७)** केंद्रसरकारला कोणत्याही घटकराज्याच्या सुव्यवस्थेबाबतीत तेथील राज्यपालांकडून अहवाल मागविता येतो. प्रसंगी एखाद्या घटकराज्यात राष्ट्रपतीची राजवट निर्माण करण्याचा अधिकार केंद्रसरकारला आहे. (कलम ३५६ प्रमाणे) राष्ट्रपतींच्या राजवटीची मुदत किती काळपर्यंत असावी याचा निर्णय संसद घेते.

**९.३.१ निष्कर्ष :**

कायदेविषयक संबंधाप्रमाणेच प्रशासकीय संबंधांच्या बाबतीत केंद्रशासन राज्यांपेक्षा अधिक शक्तिशाली आहे.

## १.४ केंद्रराज्य आर्थिक संबंध (Financial Relationship)

केंद्र व राज्य यांचे प्रशासन सुरळीत चालावे, त्यांच्यात समन्वय व सहकार्य निर्माण व्हावे यासाठी त्या त्या राज्यांना आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी योग्य अशी आर्थिक परिस्थिती असणे आवश्यक असते. केंद्र व राज्य यांच्यात संघर्ष होऊ नये यासाठी केंद्र व घटक सरकारे यांच्या उत्पन्नांच्या बाबी घटनेप्रमाणे निर्धारित केल्या आहेत.

**१) करांची विभागणी :**

राज्यसूचीतील विषयांवरील कर राज्यांच्या वाट्याला व केंद्रसूचीतील विषयावरील कर केंद्राच्या वाट्याला आहेत. समवर्ती सूचीत कोणत्याही कराचा विषय समाविष्ट नाही. राज्याकडे जमा झालेली कराची रक्कम राज्य स्वत:कडे ठेवीत असते. केंद्रसरकारकडे जमा झालेल्या कराच्या रक्कमेतील काही हिस्सा राज्यांना दिला जातो.

**२) राज्यांना आर्थिक साहाय्य :**

राज्यांचे कराद्वारे मिळणारे उत्पन्न अपुरे असते म्हणून केंद्रसरकार आपल्या उत्पन्नातील काही भाग, आर्थिक साहाय्याच्या स्वरूपात राज्यांना देत असते. काही कर केंद्रातर्फे लावले जातात परंतु त्यांची वसुली राज्यसरकार करते व आपल्या खाती जमा करते. उदा. स्टँपकर, अबकारीकर. काही कर केंद्रसरकार बसविते व वसूलही करते आणि आलेले उत्पन्न राज्यसरकारला देत असते. उदा. रेल्वेभाडे.

**३) साहाय्यक अनुदान :**

केंद्रसरकार घटकराज्यांना काही साहाय्यक अनुदान देते. अर्थात याबाबतची रक्कम संसद ठरविते. आसाम राज्याला अनुसूचित जमातीसाठी खास अनुदानाची व्यवस्था आहे. सार्वजनिक कामासाठी केंद्र घटकराज्यांना अनुदानसाहाय्य देते. आसाम, बिहार, ओरिसा यांना ताग व तागापासून तयार केलेल्या वस्तूंच्या निर्यातीच्या मोबदल्यात साहाय्यक अनुदान देण्यात येते.

**४) घटकराज्यांना कर्ज :**

प्रत्येक घटकराज्याला केंद्रसरकारकडून कर्ज घेता येते. भारताबाहेरील देशांकडून राज्यसरकारला कर्ज घेता येत नाही.

**५) वित्तआयोग :**

राष्ट्रपती वित्त आयोगाची पाच वर्षासाठी निर्मिती करतात. या आयोगाचे अध्यक्ष व चार सभासद असतात. सभासदांची पात्रता संसद कायदा करून ठरविते. वित्त आयोगाची मुख्य कार्ये खालील आहेत.

१) केंद्र व राज्य यांच्यात किंवा राज्याराज्यात करांचे उत्पन्न कसे विभागले जावे यासंबंधी शिफारसी करणे. २) भारताच्या संचितनिधीमधून राज्यांच्या उत्पन्नाला जी साहाय्यक मदत द्यावयाची, ती कोणत्या निकषांच्या आधारे द्यावी यासंबंधीच्या शिफारसी करणे.

### ६) नियोजन मंडळ :

नियोजनमंडळामुळे राज्यांना केंद्रावर आर्थिक बाबतीत अवलंबून राहावे लागते. नियोजन विषयक धोरण निश्चित करतांना राज्यांना विश्वासात घेतले जात नाही. पंतप्रधान, मंत्री, कॅबिनेट सचिव यांचा समावेश नियोजन मंडळात होतो. राज्यांचा एकही प्रतिनिधी नियोजन मंडळात नसतो.

### ९.४.१ निष्कर्ष :

आर्थिक बाबतीत केंद्रसरकारचे घटकराज्यांवर नियंत्रण दिसून येते. बऱ्याच बाबतीत राज्यसरकारे केंद्रावर अवलंबून असल्याचे दिसून येते.

### आपली प्रगती तपासा :

१) केंद्र व राज्य सरकारच्या प्रशासकीय सबंधांचे विश्लेषण करा.
२) केंद्र व राज्य सरकारांचे आर्थिक अधिकार स्पष्ट करा.

---

---

---

---

## ९.५ केंद्र व राज्य संबंधांचे बदलते स्वरूप :

### ९.५.१ भारतीय संघराज्याची कार्यवाही

**(Working and Functioning of Indian Federation)**

भारतीय संघराज्याची आतापर्यंतची वाटचाल आणि प्रत्यक्ष कार्यवाही यावरून संघराज्यव्यवस्थेचे वास्तविक स्वरूप दिसून येते. त्यावरून भारतीय राज्यात दोन प्रकारचे कल (Aspects) दिसून येतात.

१) केंद्र व राज्य यांच्यात संघर्षाचा कल
२) केंद्र व राज्य यांच्यात सहकार्याचा कल

केंद्र राज्य संबंधातील मुख्य कल खालीलप्रमाणे आहेत :

१ संघर्षाचा कल

भारतीय संघराज्य व्यवस्थेच्या कामकाजामध्ये १९६७ नंतर फरक पडला. अकाली दल, तेलगुदेसम, द्रमुक या पक्षांनी केंद्र व राज्य सरकारच्या परस्परसंबंधाचा पुनर्विचार व्हावा अशी मागणी केली. त्यासाठी -

१९७७ साली - ए. व्हि. राजमन्नार यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्य समिती नेमण्यात आली होती.

१९७८ साली अकालीदलाने आनंदपूर साहेब ठराव पास केला होता.

१९८३ साली भारत सरकारने सरकारीया आयोग स्थापन केले. या आयोगाने १९८८ मध्ये केंद्र व राज्य संबंधांविषयक अहवाल सादर केला; तो अजूनही विचाराधीन आहे.

२ परस्पर सहकार्याचा कल

केंद्र व राज्य यांचे सर्वसाधारण परिस्थितीत साधारणपणे परस्पर सहकार्य असतेच.

**केंद्र व राज्य यांच्यातील तक्रारीची आणि संघर्षाची क्षेत्रे :**

१) राष्ट्रपती राजवट
२) राज्यपाल
३) आर्थिक मिळकतीची साधने
४) नियोजन मंडळ
५) केंद्रीय पोलीस दलाचा वापर इत्यादी
६) समवर्ती सूची
७) राष्ट्रपती राजवट
८) राज्यांना अधिक स्वायत्तत्ता हवी

## ९.५.२ केंद्र व राज्य शासनांच्या परस्परसंबंधातील तक्रारीची आणि संघर्षाची क्षेत्रे :

### १) राष्ट्रपती राजवट :

एखाद्या घटकराज्यामध्ये घटनात्मक शासनाची अयशस्वीता निर्माण झाल्यास राष्ट्रपती त्या राज्यात राष्ट्रपती राजवट घोषित करतो. या तरतूदींचा राजकीय कारणांसाठी किंवा एखाद्या राज्याचे शासन रद्द करण्यासाठी उपयोग होऊ नये असे राज्यांचे मत आहे. कारण बरेचदा केंद्रसरकारने या तरतूदीचा गैरवापर करुन काही राज्यांमध्ये राष्ट्रपती राजवट घोषीत केली होती.

**२) राज्यपाल :**

राज्यपालाची नियुक्ती राष्ट्रपती करतात व राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत राज्यपाल अधिकारावर राहतात. राज्यपाल केंद्राचा प्रतिनिधी म्हणून काम करतात. परंतु राज्यपालाने स्वतःच्या स्वधिकारांचाही उपयोग करावा; फक्त प्रेक्षकाची भूमिका करू नये अशी राज्यांची अपेक्षा आहे कारण राज्यपाल राज्याचा प्रमुख असतो.

**३) आर्थिक मिळकतीची साधने :**

केंद्र आणि राज्य यांच्यात आर्थिक संबंध घटनेद्वारा निश्चित करण्यात आले आहेत. परंतु आर्थिक अधिकारांची आणि मिळकतीची विभागणी योग्यप्रकारे अंमलात आणली जात नाही. राज्यांना केंद्रावर त्यासाठी अवलंबून राहावे लागते असे राज्यांचे मत आहे.

**४) नियोजन मंडळ :**

नियोजनमंडळाची भूमिका देखील केंद्र राज्य संबंधातील दुराव्याला व संघर्षाला कारणीभूत आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये आपले वाढते व संपूर्ण वर्चस्व प्रस्थापित करून नियोजनमंडळाने केंद्रीकरणाचा पाठपुरावा केलेला आहे. नियोजन मंडळाद्वारे केंद्रसरकार राज्यांवर आपला प्रभाव वाढवत आहे असे राज्यांना वाटते.

**५) केंद्रीय पोलीस दलाचा वापर :**

एखाद्या राज्यामध्ये केंद्रीय पोलीसदल पाठविण्याचा अधिकार राज्यांना आहे. बरेचदा केंद्र राज्यांना न विचारताच हे दल पाठवितात. खरे तर घटनेप्रमाणे शांतता व सुव्यवस्था राखणे हा राज्यसरकारचा विषय आहे. राज्याने मागणी केल्यानंतर असे पोलीस दल केंद्राने पाठविले तर केंद्र राज्य संबंधांना बाधा येणार नाही.

**६) समवर्तीसूची :**

समवर्तीसूचीतील विषयांवर केंद्रशासनाने केलेले कायदे त्याच विषयांवरील राज्यातील विधिमंडळाने केलेल्या कायद्यांपेक्षा श्रेष्ठ मानले जातात. बरेचदा केंद्रसरकार या सूचीतील विषयांचा उपयोग करून राज्यसरकारवर आपला प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करीत असतात. या सूचीवर नव्याने विचार करण्याची आवश्यकता बहुसंख्य राज्यांनी व्यक्त केली आहे.

**७) उद्योगधंदे व खाणी यावर केंद्राचे वर्चस्व :**

उद्योगधंदे व खाणी हे विषय राज्याच्या अधिकारात असावयास हवेत आणि जे उद्योगधंदे जनतेच्या हिताचे आहेत, तेवढेच केंद्रसरकारने नियंत्रित करावेत अशी मूळ घटनेमध्ये तरतूद आहे. काही खास उद्योगधंद्यासंबंधीचे कायदे करण्यास केंद्रसूचीने संसदेला अधिकार दिलेला आहे. परंतु सध्या बहुतेक उद्योगधंदे व खाणी केंद्राच्या अधिकारात आहेत.

**निष्कर्ष :**

वरील विषय केंद्र व राज्य यांच्यात तणाव आणि संघर्ष निर्माण करणारे आहेत. त्यामुळे राज्यांच्या राजकीय स्वायत्ततेला धक्का पोहोचतो असे घटकराज्यांना वाटते, त्यामुळेच अनेक राज्ये राज्यांच्या स्वायत्ततेची मागणी करतात.

**१.५.३ केंद्र व राज्य संबंधांची दुसरी सहकार्याची बाजू :**

सर्वसाधारणपणे केंद्र आणि राज्य यांच्यात सहकार्य आहे. केंद्र आणि राज्यांमध्ये घटनेप्रमाणे अधिकार विभागणी केलेली आहे आणि त्या विभागणीप्रमाणे घटकराज्ये आपल्या क्षेत्रात स्वायत्तता उपभोगतात. त्याचप्रमाणे राष्ट्रीय ऐक्य आणि एकात्मकता भारताच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. त्यादृष्टीने केंद्रसरकार शक्तिशाली करण्यात आले आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे भारतासारख्या नवीन व विकसनशील देशाला केंद्र व राज्य यांच्यातील सत्तेची ताठर विभागणी परवडणारी नाही. विकसनशील देशामध्ये केंद्र व राज्य यांच्यात सहकार्य असेल तरच प्रशासकीय कार्यक्षमता येते. शेवटी राज्यघटनेचा उद्देश लोकांना न्याय देणे आहे. केंद्र व राज्यशासनांच्या सहकार्यातूनच हे साध्य होणारे आहे. म्हणून संघराज्यात्मक व्यवस्थेतील महत्त्वाचा आशय हा स्पर्धात्मक नसून वेगवेगळ्या शासनांनी आपल्या अधिकारांचा सहकार्याने वापर करण्यात दिसून येतो. केंद्र व राज्य शासनांमध्ये सहकार्य वृद्धिंगत होण्यासाठी पुढील संस्थाचा उपयोग होऊ शकतो.

**१) नियोजनमंडळ :**

विकासाच्या योजना आणि त्यासाठी आर्थिक मदत मिळवण्यासाठी राज्यशासनांना नियोजन मंडळावर अवलंबून रहावे लागते. त्याचप्रमाणे नियोजनमंडळ अनुदानाच्या विभागणीवर वापरावर व योजनेच्या कार्यवाहीवर नियंत्रण ठेवते.

**२) राष्ट्रीय विकास परिषद :**

ही संस्था नियोजनमंडळाशी निगडीत आहे. या परिषदेची निर्मिती १९५२ मध्ये झालेली असून तिच्यामध्ये राज्यांच्या, केंद्राच्या व केंद्रशासित प्रदेशांच्या प्रतिनिधींचा समावेश आहे. नियोजन क्षेत्रांतील केंद्र व राज्य यामध्ये परस्पर सहकार्य वाढविण्यासाठी हे एक व्यासपीठ आहे. परिषद सर्व योजनांना व वार्षिक विभागणींना मंजुरी देते आणि वेगवेगळ्या राष्ट्रीय योजनांच्या कामकाजाचा आढावा घेते.

**३) विभागीय परिषदा :**

१९५६ च्या राज्यपुर्नरचनेच्या कायद्यातील शिफारसीप्रमाणे या परिषदा निर्माण केल्या आहेत. दोन किंवा अधिक राज्यांच्या विषयाच्या संबंधात सल्ला देण्याचे कार्य या परिषदा करतात. उदा. सीमातंटे, भाषिक अल्पसंख्यकांच्या समस्या, आंतर - राज्यीय आर्थिक व सामाजिक योजनांचा कार्यक्रम.

**४) ईशान्य विभागीय परिषद :**

आसाम, मणिपूर, मेघालय, नागालँड, त्रिपुरा ही राज्ये व अरूणाचल प्रदेश आणि मिझोराम या केंद्रशासित प्रदेशांमधील समान हितसंबंधाचा विचार ही परिषद करते.

## १.६ सारांश

भारतीय संघराज्याच्या कार्यवाहीतून एवढे स्पष्ठ होते की भारतात अनेकदा केंद्र आणि घटकराज्ये यांच्यात तणाव निर्माण होतो. भारतीय संघराज्य (A Union of States) आहे आणि हे संघराज्य केंद्राकर्षी स्वरूपाचे आहे. भारतीय संघराज्यातील केंद्र व राज्य एकमेकांचे शत्रू नाहीत तर राष्ट्रउभारणीच्या प्रक्रियेतील दोन्ही सहकारी आहेत. दोन्ही सर्वस्वी एकमेकांवर अवलंबून नाहीत आणि दोन्ही एकमेकांपासून फार स्वतंत्रही असू शकत नाहीत.

## १.७ प्रश्न

१) केंद्र आणि राज्य यांच्यातील बदलत्या संबंधांचा आढावा घ्या.
२) केंद्र आणि राज्या यांच्यातील तणावाची कारणे सांगा.
३) केंद्र - राज्य विधिविषयक संबंधाचा आढावा घ्या.
४) केंद्र - राज्य प्रशासकीय आणि आर्थिक संबंधांचे विवेचन करा.
५) भारतीय संघराज्याची कार्यवाही व त्यातून निर्माण झालेल्या समस्यांची चर्चा करा.
६) टिपा द्या.
    १) केंद्र व राज्य विधीविषयक संबंध
    २) केंद्र राज्य संघर्ष

❖❖❖❖

# १०

# लहान राज्यासबंधीची मागणी व राज्यांची स्वायत्ततेची मागणी

# (Demand for Smaller States and Demand for Autonomy)

**प्रकरण रचना :**

१०.० उद्दिष्ट
१०.१ प्रस्तावना
१०.२ लहान राज्याच्या निर्मितीची मागणी
१०.३ घटक राज्याच्या स्वायत्ततेची मागणी
१०.४ सारांश
१०.५ प्रश्न

## १०.० उद्दिष्टे

स्वातंत्र्यांनतर लगेचच विविध प्रांतातून भाषिक आधारावर राज्यांची पुनर्रचना करण्याची मागणी होऊ लागली. त्यासाठी आमरण उपोषण, हिंसक आंदोलने झाली. या पार्श्वभूमीवर भाषेच्या आधारावर घटक राज्यांची निर्मितीही झाली. परंतु अलिकडील काळात याच घटकराज्यांतील काही प्रदेश लहान राज्यांची मागणी करीत आहेत. तर घटक राज्ये केंद्रीय सत्तेच्या नियंत्रणापासून मुक्त राहण्यासाठी स्वायत्ततेची मागणी करीत आहेत. राष्ट्रीय एकात्मता, अखंडता यांचा विचार करता अशा मागण्यांची पार्श्वभूमी, कारणे, फायदे-तोटे इ. सबंधी माहिती करुन देणे व विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना देणे ही या पाठाची उद्दिष्ट्ये आहेत.

## १०.१ प्रस्तावना

भाषिक आधारावर निर्माण झालेल्या घटक राज्यातील विविध प्रदेशात विविध कारणांवरुन प्रादेशीक अस्मीता निर्माण होऊन वेगळ्या घटक राज्याच्या मागणी होत आहे. त्यासाठी हिंसात्मक आंदोलने होत आहेत. तर दुसऱ्या बाजूला केंद्रीभूत व केंद्राकर्षी संघराज्य पद्धतीमुळे राज्याच्या राज्यकारभारात हस्तक्षेप करण्याचा अधिकार केंद्राला प्राप्त होत आहे. काही वेळेस केंद्र या सत्तेचा गैरवापरही करीत आहे. या भावनेतून राज्यांना अधिक स्वायत्तता देण्याची मागणी होत आहे. या सर्व बाबींचा थोडक्यात आढावा या प्रकरणात घेतला आहे.

## १०.२ लहान घटकराज्य निर्मितीची मागणी

जेव्हा एखाद्या प्रादेशिक विभागातील लोकांच्या मनात आपल्या प्रदेशाबद्दल अस्मिता, आपुलकी, निर्माण होऊन आपण दुसऱ्या प्रदेशांपेक्षा सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक स्थितीनेही भिन्न आहोत अशी वेगळेपणाची सामुहीक भावना निर्माण होते तेव्हा प्रादेशिकवादाचा उगम होतो आणि त्यातूनच वेगळ्या किंवा स्वतंत्र राज्याची मागणी होऊ शकते. भारतात भाषिक प्रांतरचनेच्या आधारावर एक भाषा बोलणारांचे एक राज्य या आधारावर राज्यांची निर्मिती करण्यात आली. परंतु एक भाषिक राज्यातील विविध भागातील लोकांच्या समस्या सारख्याच असतात असे नाही. एक भाषिक राज्यातील काही प्रदेश विकसीत तर काही मागासलेले असतात. मागासलेल्या प्रदेशातील लोकांच्या विकासाकडे राज्य सरकार जाणूनबुजून दुर्लक्ष करीत असल्याची किंवा राज्यातील सर्वात मोठा निधी विकसीत प्रदेशांवर खर्च करीत असल्याने आपल्यावर अन्याय होत असल्याची भावना मागासलेल्या प्रदेशातील लोकांच्या मनात निर्माण होते. केवळ एक भाषा आहे म्हणून एकत्र राहण्यापेक्षा आपल्या प्रदेशाचे स्वतंत्र राज्य निर्माण व्हावे अशी मागणी केली जाते. अर्थात एकाच राज्यात प्रादेशीक भिन्नता असल्याने एका राज्याचे आणखी किती लहान-लहान राज्यात रुपांतर करावे यासबंधी काही अनुकूल तर काही प्रतिकूल विचार मांडले जातात.

वास्तविक भारताला स्वातंत्र्य मिळाले तेच देशाची फाळणी होवूनच. त्यामुळेच भाषिक प्रांतरचनेलाही राष्ट्रीय नेतृत्वाने विरोध केला. परंतु तरीही भाषिक आधारांवर राज्यांची निर्मिती झाली. आता प्रत्येक राज्यातील प्रत्येक प्रादेशीक विभागाचे वेगळे राज्य करणे राष्ट्रीय अखंडतेला आणि एकात्मतेला धोका निर्माण होऊ शकतो का? अशी शंका राष्ट्रहिताचा विचार करणाऱ्या प्रत्येकाच्या मनात निर्माण होतो. प्रादेशिक भिन्नता, मागासलेपणा, सांस्कृतिक-धार्मिक भिन्नतेच्या आधारावर एका राज्याचे अनेक लहान राज्यात रुपांतर केल्यास फुटीरतेला प्राधान्य मिळेल, एकात्मता धोक्यात येईल, आणि एका राज्याचे किती राज्यात रुपांतर करावयाचे याला मर्यादा रहाणार नाही. अशीही अनामिक भिती निर्माण होते. म्हणूनच काहींचा लहान-लहान राज्यांच्या निर्मितीला विरोध आहे.

असे असले तरी या प्रश्नाकडे दुर्लक्ष करता येत नाही. आज एकाच राज्यातील विविध प्रदेशात प्रचंड आर्थिक असमतोल निर्माण झालेला आहे. विकसीत प्रदेशात रस्ते, दळणवळण, वीज, उद्योग, शिक्षण, शेती यांची मोठ्या प्रमाणात भरभराट होत आहे. तर मागासलेल्या प्रदेशात या पायाभूत सुविधांचा अभाव असल्याने बेरोजगारी, दारिद्र या समस्या निर्माण झालेल्या आहेत. याशिवाय 'एक भाषिक राज्यात प्रगत भागाचे मागास भागावर वर्चस्व निर्माण होत आहे. प्रगत घटक मागासांचे शोषण करतात, सांस्कृतिक बहुमतवाले सांस्कृतिक अल्पमतवाल्यांवर अतिक्रमण करतात', याशिवाय मागास भागांना विकसीत भागांच्या बरोबरीने आणण्याचे प्रयत्नही प्रामाणीकपणे केले जात नाही हा आजपर्यंतचा सर्वच एक भाषिक राज्यांचा अनुभव आहे. त्यामुळेच आकारमान, विकासाचा स्तर, प्रशासकीय कार्यक्षमता, सामाजिक एकजिनसीपणा, राजकीय व्यवहार्यता या निकषावर मोठ्या राज्यांची लहान-लहान राज्यांची निर्मिती केल्यास ते राष्ट्रीय एकात्मतेला आणि अखंडतेला धोकादायक आहे असे म्हणता येणार नाही. इ.स. २००० मध्ये मागासलेल्या प्रदेशांना न्याय देण्यासाठी झारखंड, उत्तराखंड, व छत्तीसगड ह्या तीन लहान-लहान राज्यांची निर्मिती करण्यात आली.

**१०.२.१ लहान राज्यांचे फायदे :**

भौगोलिक दृष्टीने व लोकसंख्येच्या दृष्टीने मोठ्या राज्यांपेक्षा तुलनेने लहान राज्याचे अधिक फायदे असल्याचा आशावाद निर्माण केला जातो. उदा.

१) विशिष्ट भौगोलिक प्रदेशातील मर्यादित लोकसंख्येसाठी सरकार निर्माण झाल्यास स्थानिक प्रश्नांना प्राधान्य मिळेल व विकासाला गती प्राप्त होईल.
२) प्रादेशीक भाषेत शासकीय व्यवहार चालविण्यास प्राधान्य मिळेल.
३) जनता आणि सरकार यातील अंतर कमी होईल.
४) सत्ता व जबाबदारीचे विकेंद्रीकरण होऊन लोकांचा राजकीय सहभाग वाढेल.
५) विकास कार्यात लोकांचा सहभाग वाढेल आणि लोकशाही विकासाला चालना मिळेल.
६) स्थानिक लोकांसाठी बेरोजगारी व दारिद्र्य निर्मूलनाच्या योजना राबविणे शक्य होईल.

**१०.२.२ लहान राज्याचे तोटे :**

अतिलहान राज्ये निर्माण झाल्यास काही तोटेही सहन करावे लागतील.

१) लहान राज्यात नैसर्गिक साधन संपत्तीचा अभाव असेल तर उत्पन्नाच्या मार्गावर मर्यादा येतात. त्यामुळे प्रत्येक वेळी केंद्राकडे आर्थिक मदतीची याचना करावी लागेल. राज्याचे परावलंबित्व वाढेल.

२) राज्यांत सामाजिक, धार्मिक दृष्टीने तणावग्रस्त परिस्थिती असेल तर लहान राज्याचे सरकार त्यावर नियंत्रण करण्यास हतबल होऊ शकते. उदा. नक्षलवादग्रस्त प्रदेश असेल तर राज्याची सत्ता नक्षलवाद्यांच्या हातात जाण्याची भीती असते. थोडक्यात राज्यातर्गंत व बाह्य अशा दोन्ही परिस्थितीत संरक्षण, शांतता-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

**१०.२.३ लहान राज्यांच्या निर्मितीच्या मागणीसाठी झालेल्या महत्त्वाच्या चळवळी :**

**१) स्वतंत्र विदर्भ राज्याची चळवळ :**

संयुक्त महाराष्ट्रातील विदर्भ हा प्रादेशीक विभाग ऐतिहासीक दृष्टीने महत्त्वाचा आहे. विदर्भामध्ये नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, यवतमाळ, अकोला, बुलढाणा, अमरावती, गोंदिया, गडचिरोली या जिल्ह्यांचा समावेश होतो. भाषिक आधारावर मराठी भाषिकांच्या वेगळ्या राज्याची मागणी करताना 'महाविदर्भ' राज्याची चर्चा झाली होती. १९५३ मध्ये न्यायमूर्ती फाजल अली आयोगाने स्वतंत्र विदर्भ राज्याची निर्मिती करावी अशी शिफारस केलेली होती. मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र झाला नाही तर महाविदर्भ राज्याची निर्मिती करावी असेही ठरले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर विदर्भाला खास महत्त्व देण्यासाठी नागपूर ही महाराष्ट्राची उपराजधानी मानली जाते व दरवर्षी हिवाळी अधिवेशन नागपूर येथेच भरते.

असे असले तरी मराठी भाषिक महाराष्ट्र राज्यात विदर्भ हा प्रादेशिक विभाग मागासलेला राहिला आहे. विदर्भातील ५१% जमीन जंगलाखाली आहे. येथे जलसिंचित क्षेत्राचे प्रमाण अत्यंत कमी असल्याने शेती उत्पादन अनिश्चित असते. विदर्भात मोठ्या प्रमाणात कापसाचे उत्पादन होत असले तरी बहुतांश सुतगिरण्या विदर्भाच्या बाहेर आहेत. त्यामुळे शेतीबरोबरच औद्योगिक दृष्टीनेही विदर्भ मागासलेलाच आहे. गेल्या काही वर्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी विदर्भ हादरुन गेला होता. महाराष्ट्रातील राजकारणावर पश्चिम महाराष्ट्रातील

नेत्यांचा अधिक प्रभाव असल्यामुळे विदर्भाच्या विकासाकडे सातत्याने दुर्लक्ष झालेले आहे. याच कारणामुळे स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी केली जात आहे. बापूजी अणे, वीर बाबुराव हरकरे, बियाणी, जांबुवंतराव धोटे, इ. वैदर्भीय नेत्यांनी स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी लावून धरलेली होती. विदर्भ आंदोलन संघटित करण्यामागे "महाविदर्भ राज्य संघर्ष समिती" नावाची संघटनाही निर्माण केली होती. जानेवारी २०१० मध्येही विदर्भ राज्याच्या निर्मितीसाठी आंदोलन झाले होते. स्वतंत्र विदर्भ राज्याची निर्मिती करण्यासाठी "विदर्भ राज्य संग्राम समिती" स्थापन करुन त्याद्वारे आंदोलन सुरु केले होते. परंतु या आंदोलनांना काही अपवाद वगळता फारसा प्रतिसाद मिळाला नाही किंवा राजकीय क्षेत्रातही संयुक्त महाराष्ट्र समिती प्रमाणे त्यांना यश मिळाले नाही. त्यामुळे स्वतंत्र विदर्भाची मागणी सर्व राजकीय पक्षांनी दुर्लक्षीत केलेली आहे.

### २) तेलंगणा राज्याची मागणी :

भाषेच्या आधारावर पुनर्रचना झालेले आंध्रप्रदेश हे भारतातील पहिले राज्य होय. १९५३ मध्ये मद्रास प्रेसिडेन्सीच्या तेलगू भाषा बोलणाऱ्या प्रदेशाचे हे राज्य निर्माण करण्यात आहे. १९५६ मध्ये निजाम राजवटीचा भाग असलेले व नंतर हैद्राबाद राज्याचा भाग असलेला तेलगू भाषिक प्रदेश तेलंगणा हा आंध्रप्रदेशात समाविष्ठ करण्यात आला. मद्रास प्रेसिडेन्सी मध्ये असलेला प्रदेश पायाभूत सुविधांच्या दृष्टीने विकसीत होता तर निजामाच्या राजवटीतील तेलंगणा हा प्रदेश तुलनेने मागासलेला होता. म्हणूनच हा प्रदेश आंध्रप्रदेशात समाविष्ठ करतानाच १९५६ मधील संपूर्ण महसूल तेलंगणाच्या विकासावर खर्च करावा, पंधरा वर्षापासून तेलंगणा प्रदेशात रहाणाऱ्या व्यक्तीला शासकीय पदावर भरती करावे, इ. बाबतीत आंध्रप्रदेशाबरोबर करार झालेला होता. परंतु त्याचे योग्य पालन झाले नाही. त्यामुळेच १९६० पासून आंध्र प्रदेशाचे विभाजन करुन वेगळ्या तेलंगणा राज्याची निर्मिती करण्यात यावी अशी मागणी जोरदार करण्यात येऊ लागली. उस्मानिया विद्यापीठातील तेलंगणा भागातील विद्यार्थ्यांनीही या आंदोलनात सहभाग घेतला होता. वेगळ्या तेलंगणा राज्याची मागणी अधून मधून होतच आहे. २००१ मध्ये के. चंद्रशेखर राव यांनी तेलगू देशम् पार्टीतून बाहेर पडून तेलंगणा राष्ट्र समितींची स्थापना केली. त्यांनी याच संदर्भात केंद्रीय मंत्रीमंडळाचा राजीनामा दिला. आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन केंद्रीय मंत्रीमंडळाने १ डिसेंबर २००९ मध्ये सैद्धांतिक स्वरुपात वेगळ्या तेलंगणाला मान्यता दिली आहे. परंतु त्यासाठी संसदेच्या ⅔ बहुमताची आवश्यकता आहे. या निर्णयाची अमंलबजावणी झाली नाही. त्यामुळे आजही प्रश्न सुटलेला नाही.

### ३) इतर राज्याची मागणी :

एक भाषिक मोठ्या राज्यातून मागासलेल्या प्रदेशांकडून वेगळ्या राज्याची मागणी होणाऱ्या वरील दोन महत्वपूर्ण चळवळी असल्या तरी भारताच्या अनेक भागातील अनेक राज्यांच्या उपप्रदेशांकडून अशा मागण्या आहेत. उदा. उत्तर प्रदेश व मध्य प्रदेशातील खनिज संपत्तीने संपन्न असलेला तरी राजकीय उदासीनतेमुळे मागासलेला बुंदेलखंड हा भाग. बिहारमधील मिथीलांचल, छोटा नागपूर, आसाम राज्याशी सलग्न असलेला प्रदेश बोडोलंड, गुजरात मधील सौराष्ट्र, कर्नाटकातील कुर्ग, कर्नाटक व केरळ राज्यातील थोडा थोडा तुलू भाषिक प्रदेशाच्या 'तुलनाडू' राज्यस्थानात पूर्व व पश्चिम राज्यस्थान, इ. प्रदेशांकडून वेगळ्या व छोट्या राज्यांची मागणी होत आहे.

अर्थातच प्रादेशिक भिन्नता, मागासलेपणा, प्रादेशिक अस्मिता, भिन्न संस्कृती इ. न्याय आधारावर लहान राज्यांची मागणी होत असली तरी राज्याचा अति लहान आकार, नैसर्गिक

साधन संपत्तीची उपलब्धता, राज्याच्या संरक्षणाची क्षमता, आर्थिक क्षमता, राज्याच्या निर्मितीमागील उद्देश इ. घटकांचा विचार करुन लहान राज्यांच्या निर्मितीला मान्यता देणे आवश्यक आहे. तसेच लहान लहान राज्यांच्या निर्मितीतून राष्ट्रीय एकात्मता व अखंडता याला धोका निर्माण होणार नाही. लहान राज्याच्या मागणीबरोबरच संघराज्यातून फुटून बाहेर पडण्याचा छुपा हेतू, त्या प्रदेशातील सामाजिक आर्थिक विषमता, धार्मिक विविधता, त्यातील सलोख्याचे सबंध, किंवा राज्यनिर्मितीनंतर काही समस्या निर्माण होण्याची शक्यता इ. घटकांचा विचार करुन लहान-लहान राज्यांच्या निर्मितीबाबत सावधपणे निर्णय घेणे आवश्यक आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) लहान राज्यांच्या निर्मितीची मागणी आपणास योग्य वाटते का ? भाष्य करा.

२) "स्वतंत्र विदर्भ राज्य" चळवळीची माहिती द्या.

## १०.३ घटक राज्यांची स्वायत्ततेची मागणी (Demand for Autonomy)

### १०.३.१ स्वायत्ततेचा अर्थ :

भारतीय घटक राज्यांची स्वायत्तता याचा अर्थ 'केंद्रीय सत्तेचे घटक राज्यांवरील कमीत कमी नियंत्रण व घटक राज्यांच्या सरकारांना जास्तीत जास्त स्वातंत्र्य देणे होय'.

'भारतीय राज्यघटनेने केंद्रसरकारला दिलेली अतिरिक्त अधिकार कमी करणे व कायदेविषयक, कार्यकारी व न्यायविषयक सत्तेत राज्यांना अधिक अधिकार व सत्ता बहाल करणे केंद्राने राज्यसरकारच्या अशा अधिकार क्षेत्रात हस्तक्षेप न करणे म्हणजे राज्याची स्वायत्तता होय.'

स्वतंत्र भारताने राज्यघटनेने संघराज्य पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यात सत्ता-अधिकार यांची विभागणी करण्यासाठी केंद्रसूची, राज्यसूची आणि मध्यवर्ती सूची राज्यघटनेत स्पष्ट केलेली आहे. स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळी देशाची झालेली फाळणी व देशातील प्रादेशीक सामाजिक, आर्थिक विषमता व विविधता लक्षात घेऊन घटनाकारांनी देशाच्या अखंडतेला व एकात्मतेला अधिक महत्त्व दिले आहे. त्यातूनच केंद्र व राज्य सरकारांमध्ये सत्तेचे विभाजन करताना केंद्र सरकारला अधिक अधिकार व सत्ता दिलेली आहे.

स्वातंत्र्यानंतर १९६७ पर्यंत केंद्रात आणि घटक राज्यात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस या एकाच पक्षाची सरकारे असल्याने घटक राज्यांकडून अधिकाराबाबत किंवा स्वायत्ततेबाबत मागणी किंवा तक्रार केली गेली नाही. परंतु १९६७ नंतर केंद्रात आणि राज्यात वेगवेगळ्या

पक्षांची सरकारे निर्माण झाली. त्यामुळे राज्य सरकारांकडून केंद्रीय सत्तेच्या वर्चस्वासबंधी अनेक तक्रारी येऊ लागल्या. उदा. केंद्र शासनाच्या प्रतिनिधी म्हणून राज्यपालांचे पक्षपाती वर्तन, आणीबाणी सबंधीच्या तरतूदींचा गैरवापर करुन राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करणे, राज्यांचे अधिकार संकुचित करणे, राज्यातील सरकार दुसऱ्या पक्षाचे असल्यास राज्या-राज्यात भेदभाव करणे, इ. त्यामुळेच घटक राज्यांकडून राज्यांना अधिक स्वायत्तत्ता देण्याची मागणी होऊ लागली. या संबंधाने केंद्र राज्य सबंधाचा पुनर्विचार करण्यासाठी तसेच राज्यांना स्वायत्तत्ता कशी व किती प्रमाण देता येईल. या सबंधी विचार विनियमय होऊ लागला.

अनेक राज्यांनी राज्यशासनांना अधिक स्वायत्तता देण्यात यावी अशी मागणी केली होती. यासाठी राज्यशासनांनी आणि प्रशासकीय सुधारणा आयोगाने वेगवेगळ्या सूचना व प्रस्ताव दिले आहेत.

### १०.३.२ ए-अप्पादोराई व शिवराम यांचा प्रस्ताव :

आंतर - राज्यपरिषदेची स्थापना करावी अशी सूचना यांची होती. त्यांच्या मते या परिषदेचे सदस्यत्व भारताचे सरन्यायाधीश, माजी सरन्यायाधीश, भूतपूर्व पंतप्रधान व उपपंतप्रधान तसेच अटर्नीजनरल यांना देण्यात यावे. या परिषदेकडे पुढील महत्त्वाच्या बाबी द्याव्यात.

१) घटनेच्या ३५६ कलमाप्रमाणे राज्यात राष्ट्रपती राजवट सुरू करणे.
२) राज्यपालांच्या नेमणूका
३) आंतर - राज्य सीमा तंटे
४) राज्यविधानासभांनी मंजूर केलेले परंतु राष्ट्रपतींसाठी विचारासाठी राज्यपालांनी राखून ठेवलेले प्रस्ताव

या परिषदेने दिलेला सल्ला केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सल्ल्याच्या विरोधात असला तरी राष्ट्रपतींना तो बंधनकारक असावा असे अप्पादोराईचे मत होते.

१९९० साली राष्ट्रपतींनी अशाप्रकारच्या आंतरराज्य परिषदेची निर्मिती केली परंतु या परिषदेची रचना अप्पादोराई व शिवराम यांच्या सूचनाप्रमाणे केली नाही. या परिषदेचे अध्यक्ष पंतप्रधान आहेत व राज्यांचे मुख्यमंत्री या परिषदेचे सदस्य आहेत.

### १०.३.३ राजमन्नार समिती :

१९७० साली तामिळनाडू सरकारने पी. व्ही. राजमन्नार यांच्या नेतृत्वाखाली एका त्रिसदस्य समितीची स्थापना केली. या समितीने केंद्र - राज्यांच्या परस्परसंबंधांच्या प्रश्नाची नव्याने चौकशी करून त्याबाबत शिफारसी कराव्यात असे ठरले. या समितीच्या शिफारशी पुढीलप्रमाणे होत्या :-

१) आंतर - राज्यपरिषदेची तात्काळ निर्मिती करण्यात यावी.
२) राज्यांना त्यांचे स्वतःचे नियोजनमंडळ असावे.
३) वित्तीय आयोगाची कायम स्वरूपाची नेमणूक करण्यात यावी.
४) राज्यशासनांना करांमध्ये अधिक वाटा देण्यात यावा.

५) त्या त्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने व्यक्तीची शासनामध्ये इतरत्र कोणत्याही पदावर नियुक्ती होता कामा नये.

भारतसरकारने राजमन्नार समितीच्या शिफारशींचा स्वीकार केला नाही.

**१०.३.४ पश्चिम बंगाल शासनाचा प्रस्ताव :**

या प्रस्तावालाच 'ज्योती बसू निवेदन पत्रिका' असेही म्हणतात. या प्रस्तावानुसार राज्यशासनांना अधिक प्रमाणात स्वायत्तता देण्यावर भर आहे. त्यांच्या मते, १) शेषसत्ता (residuary powers) केंद्रशासनाऐवजी राज्यशासनाकडे देण्यात यावेत. २) राज्यसभेची निवडणूक प्रत्यक्ष पद्धतीने घेण्यात यावी इत्यादी सूचना त्यांनी केल्या होत्या.

**१०.३.४ केंद्र - राज्य संबंधांबाबत सरकारिया आयोगाच्या शिफारशी :**

८ जून १९८३ रोजी तीन सदस्यांचा एक आयोग भारत शासनाने केंद्रराज्य यांच्या परस्पर संबंधांच्या प्रश्नाचे परीक्षण करण्यासाठी स्थापन केला होता.

न्यायमुर्ती श्री. आर. एस. सरकारिया हे या आयोगाचे अध्यक्ष व इतर दोन सदस्य या आयोगावर होते. या आयोगाने केंद्र सरकार, राज्य सरकार, विविध राजकीय पक्ष, घटनातज्ज्ञ यांच्याशी सल्लामसलत केली व १९८७ साली त्यांनी आपला अहवाल केंद्रशासनाला सादर केला. या अहवालातील काही महत्त्वाच्या शिफारशी पुढील प्रमाणे आहेत .

१) केंद्रशासन मजबूत असावे यावर या आयोगाचा भर होता.
२) राष्ट्रीय विकास परिषदेची पुर्नरचना करण्यात यावी.
३) कायमस्वरूपी आंतर - राज्य परिषद निर्माण करण्यात यावी.
४) राज्याचा राज्यपाल राजकारणापासून अलिप्त असावा. त्याच्या नियुक्तीच्यावेळी मुख्यमंत्र्यांचा सल्ला घेण्यात यावा. निवृत्तीनंतर राज्यपाल कोणत्याही शासकीय पदावरील नेमणूकीला अपात्र असावा.
५) राज्यघटनेच्या कलम ३५६ चा, (राष्ट्रपतींची राजवट राज्यांमध्ये आणण्यासंबंधीचे आहे.) वापर कमीतकमी करण्यात यावा.

अशाप्रकारे केंद्र आणि राज्य शासनांच्या कार्यकारी, कायदेविषयक, प्रशासकीय व आर्थिक संबंधाबाबत सरकारिया आयोगाने २४७ शिफारशी केल्या होत्या. या आयोगाच्या बहुतेक शिफारशी शासनाने स्वीकारल्या आहेत.

## १०.४ सारांश

या प्रकरणातील लहान घटक राज्याच्या निर्मितीची मागणी आणि घटक राज्यांची स्वायत्ततेची मागणी या घटक राज्यांसबंधीच्या दोन्ही प्रश्नांची उकल अत्यंत संयमाने, चर्चा-विचारविनिमयाद्वारे तसेच घटनात्मक व शांततेच्या मार्गाने करणे आवश्यक आहे. लहान घटक राज्याचे काही फायदे असले तरी लहान या संकल्पनेची व्याप्ती निश्चित होणे आवश्यक आहे. अती लहान राज्ये देशाच्या एकात्मता आणि अखंडतेला धोका ठरतील ही भीती निराधार नाही. तसेच राष्ट्रीय संकटाच्या काळात राज्याची अधिक स्वायत्तता धोकादायक ठरु शकते. केंद्र

सरकारने घटनात्मकतेचा आदर करुन राज्याच्या त्यांच्या क्षेत्रातील स्वतंत्रता मान्य केल्यास, व पक्षीय राजकारणाचा मुद्दा बाजूला ठेवल्यास भारतीय राज्यघटनेने केंद्र-राज्यात केलेले सत्ताविभाजन हे सुद्धा राज्याच्या स्वायत्ततेस पुरेसे आहे असा निष्कर्ष या प्रकरणातून काढता येतो.

## १०.५ प्रश्न

१) लहान घटकराज्याच्या निर्मितीच्या मागणीची कारण मिमांसा स्पष्ट करुन त्याचे फायदे तोटे सांगा.

२) लहान घटकराज्याच्या निर्मितीच्या मागणी सबंधी झालेल्या चळवळींचा थोडक्यात आढावा घ्या.

३) घटक राज्यांच्या स्वायत्ततेचा अर्थ स्पष्ट करुन स्वायत्ततेच्या प्रश्ना सबंधीच्या वेगवेगळ्या आयोगांच्या शिफारशीची चर्चा करा.

४) टिपा लिहा.

अ) स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी.

ब) तेलंगणा राज्यासबंधीची चळवळ.

क) घटकराज्यांची स्वायत्तत्ता आणि केंद्रीभूत संघराज्य पद्धती.

❖❖❖❖